


रंभ अंक नऊ

७ जून १९६९

चाळीस पैसे




" काय ? गेल्या दहा वर्षांत एकही इन्कमटॅक्स रिटर्न भरलं नाही म्हणता ?
-- समजता कोण स्वतःला ? केंद्रीय मंत्री ? ...... "

७ जून १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे : अंक : पहिला

**संपादक : श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

दिनांक २४ मेच्या अंकातील वसू भगत यांनी 'चतुरंग' या बंगाली हौशी रंगभूमीच्या नुकत्याच मुंबईत झालेल्या नाटकांचा परामर्श घेतला आहे. अत्यंत वास्तववादी व स्पष्ट मत त्यांनी दिले. कुणीतरी हे करायला हवे होते हे नक्की.

परंतु मुंबईतील आमचे टिकाकार मित्र जेव्हा 'चतुरंग'वर त्यांच्या वर्तमानपत्रातील रकान्यांतून खोटी भरमसाट स्तुती करू लागलेले पाहिले, तेव्हा मात्र मन खटकले. पाहुणा झाला म्हणून त्याची स्तुतीच केली पाहिजे का? आपल्या रंगभूमीबद्दल लोकांचे मनात असलेले गैरसमज तसेच राहिले पाहिजेत का, असा विचार आला आणि थोडीशी चीडही आली. आपण खरे बोलूच शकत नाही का? 'चतुरंग'चे दार्शनिक स्वरूप पाहिल्यानंतर 'रंगायन' आदी किंबहुना मुंबईतील असंख्य हौशी संस्था निश्चित प्रागतिक आहेत, एवढेच नव्हे तर आम्ही तसूभरही मागे नाही, अशी खात्री पटते.

श्री. वसू भगत याचे पुनःश्च अभिनंदन.

**मे, ३१** **बापू लिमये**, कल्याण

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# मुंबई समाचार

सु. ल. सोमण

## रशिया, अमेरिका, भारत

रशियाचे पंतप्रधान श्री. कोसिजीन हे दिवंगत राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन ह्यांच्या देहावसानाच्या वेळी स्वत: जातीने आले होते. त्या वेळी त्यांचा नव्या दिल्लीत तीन-चार दिवस मुक्काम होता व त्यांनी बहुतेक सर्वत्र वरिष्ठ भारतीय नेत्यांशी बोलणी केली. त्यानंतर अवघ्या आठवड्यातच अमेरिकन परराष्ट्रमंत्र्यांनी अध्यक्ष निक्सन ह्यांच्या सूचनेवरून दिल्लीला भेट दिली. श्री. रॉजर्स ह्यांनी त्यानंतर लाहोरला पाकिस्तानचे प्रे. याह्याखान ह्यांची भेट घेतली. ह्या भेटीचे वृत्त कळताच कुठलाही वेळ न घालवता, काबूलला आलेल्या कोसिजीन ह्यांनी रावळपिंडीला अगदी अचानक भेट दिली. ह्या सर्वच भेटीगाठींना निश्चितच एक महत्त्व आहे आणि कदाचित त्या भारतीय परराष्ट्र धोरणालाही वेगळे वळण लावून जातील.

दोन्ही प्रमुख राष्ट्रांच्या नेत्यांनी भारताबरोबरच्या संबंधांबाबत खास उत्सुकता दाखवलेली नाही, असेच म्हणावे लागेल. पाकिस्तानला दिल्या जाणाऱ्या शस्त्रास्त्र मदतीबाबत, कोसिजीन ह्यांनी भारतीय प्रतिक्रियेला दाद घातली नाही. उलट आपल्या धोरणाचा पाठपुरावा केला आणि भारतीय मैत्रीत त्यामुळे काही बिघाड होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे सांगितले. गेल्या एक-दोन वर्षांपासून रशियाचे काश्मीर प्रकरणातले धोरणही उघड उघड बदलले आहे. भारतातल्या उजव्यांच्या वाढत्या प्रभावाबद्दलही त्यांनी नापसंती व्यक्तविली आहे. एकंदरीत क्रुश्चेव ह्यांच्या आमदानीतल्या भारत-रशिया मैत्रीत आणि आजच्या ह्या दोन राष्ट्रांच्या संबंधांत फार मोठा फरक पडला आहे. भारताचे आशियातले स्थान, त्याचा आकार, भौगोलिक स्थान व चीन-विरोधक म्हणून जरी व्यावहारिक

दृष्टया रशियाला भारत मैत्री आवश्यक वाटत असली तरी, त्यासाठी, पाकिस्तानला विरोध दर्शविण्याबाबत तो उत्सुक नाही. जुनी जिव्हाळ्याची भावना संपली आहे, उरला आहे व्यवहारवाद ! चीनच्या पाकिस्तानातल्या वाढत्या प्रभावामुळे, चीनला पायबंद करण्यासाठी, भारताच्या मैत्रीचीही पर्वा न करता रशिया पाकला शस्त्रास्त्र मदत देणारच !

आणि गंमत ही की, जवळजवळ अशाच कारणांनी अमेरिकाही पाकिस्तानात आपले बस्तान बसवू पाहत आहे. श्री. रॉजर्स ह्यांनी आपल्या भारत-भेटीत भारताचे मदतविषयक प्रश्न वगैरे कशांविषयीही नि:संदिग्ध आश्वासने दिली नाहीत. ही दोन अगदी भिन्न तत्त्वप्रणालींना मानणारी मोठी राष्ट्रे भारतीय उपखंडात जवळजवळ समान राजकारण खेळत आहेत. भारताशी जुजबी बोलणी करून, पाकिस्तानबरोबर तडजोड करण्याचे दडपण आणायचा ही राष्ट्रे प्रयत्न करतात. त्याच वेळी, पाकिस्तानात चीनचा प्रभाव रोखण्यासाठी, पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची अफाट मदत मात्र देतात. अशा परिस्थितीत वास्तविक भारताकडून स्वतंत्र कणखर परराष्ट्र धोरणाची आवश्यकता होती; परंतु वरील भेटीच्या वेळी दिसून आलेल्या गोष्टी मात्र सर्वस्वी विरोधी वस्तुस्थिती दर्शवितात.

काश्मीर प्रश्न, पाकला शस्त्रास्त्र मदत वगैरेंबाबत रशियाचे धोरण भारताच्या बाजूचे निश्चित नसतानाही ताज्या चिनी-रशियन लढयात मात्र रशियाला नि:संदिग्ध पाठिंबा दर्शविणारे वक्तव्य श्री. दिनेशसिंग ह्यांनी केले. हा शुद्ध अनुनय नाही का ? हिंदी महासागरातून ब्रिटिश आरमार निघून जाताच, तिथे वर्चस्व स्थापायचा मनसुबा रशियनांनी जाहीर केला आहे. त्याला भारताने विरोध का करू नये ? वास्तविक हिंदी महासागर हा निश्चित भारतीय नौ–दलाच्या अधिसत्तेखाली असायला हवा. भारताच्या सागरी संरक्षणाच्या दृष्टिकोणातूनही ! मग रशियन सूचनेवर मौन धारण करून भारताने काय साधले ? विशेषत: बदलत्या रशियन धोरणांच्या संदर्भात भारताचे मौन भारतालाच घातक ठरू शकणार नाही का ? चीनबाबतही भारत वाटाघाटींचे दरवाजे उघडे ठेवील असे वेळोवेळी जाहीर करीत असतानाही रशिया-चीन वादात घाईघाईने रशियाची बाजू उचलून धरून भारताने काय साधले ? तेही रशियाची बदलती धोरणे ध्यानात घेता ? किंबहुना रूसो-अमेरिकनांच्या उपखंडातल्या डावपेचांना भारत-चीन ह्या आशियातल्या दोन मोठ्या राष्ट्रांच्या सहकार्याने काटशह बसू शकेल. (ह्या ठिकाणी चीनपुढे मान तुकवून चीनशी सहकार्य करावे असे कुणीच म्हणणार नाही; परंतु स्वत्त्व-सार्वभौमत्व राखून तसे निर्माण करण्याचा प्रयत्न होऊच नये असेही नाही.) अमेरिकन नेत्यांबरोबरच्या वाटाघाटींतही भारताने झोळी पसरण्यापेक्षा अधिक काही केले नाही.

वडयांबरोबरच्या अनुनयाच्या धोरणाचा फेरविचार आता झालाच पाहिजे.

त्याची भारतविषयक बेफिकीर वागणूक पाहून तरी भारतीय धोरणाला नवीन वळण लागले पाहिजे. शेवटी राजकारणात कोणतीही दोन राष्ट्रे कायमची मित्र किंवा कायमची शत्रू असू शकत नाही. पण श्री. स. का. पाटलांनी नुकतेच म्हटल्याप्रमाणे, रशिया-अमेरिका ह्यांच्यावरील परावलंबित्वामुळे, भारतीय स्वातंत्र्यच धोक्यात मात्र केव्हाही येऊ शकेल.

## मलेशियातल्या दंगली

१९६५ च्या भारत-पाक संघर्षाच्या वेळी युनोत भारत ज्याला ‘ परम-मित्र ’ मानतो त्या रशियानेही तटस्थ धोरण स्वीकारले. परंतु त्या वेळी, पंतप्रधान टुंकू अब्दुल रहमान ह्यांच्या मलेशियाने मात्र काश्मीर प्रश्नावर व पाक-आक्रमणाबाबतच्या प्रश्नावर भारताची बाजू उचलून धरली. असे म्हणतात, भारतीय प्रतिनिधींपेक्षाही त्या वेळच्या मलेशियन प्रतिनिधीचे भाषण अधिक प्रभावी ठरले. त्या वेळच्या मलेशियाच्या धोरणामुळे पाकिस्तानने मलेशियाबरोबरचे राजनैतिक संबंध तोडले. भारताच्या ह्या छोटयाशा शेजारी मित्र-राष्ट्राला गेल्या आठवड्यात प्रखर दिव्यातून जावे लागले. जवळ जवळ यादवी युद्धाच्या सशस्त्र बंडाळ्या गेल्या आठवड्यात मलेशियात उसळल्या. आता त्या शमल्या असल्या तरी, मलेशियाच्या एकसंध स्वरूपाला त्यांनी जबरदस्त धक्का दिला आहे, एवढे मात्र निश्चित !


एक कोटीच्या आसपास वस्ती असलेल्या ह्या राष्ट्राला सध्याचे पंतप्रधान टुंकू अब्दुल रहमान ह्यांनी घडवले आहे. ह्या संघराज्यातून काही वर्षांपूर्वीच सिंगापूर




फुटून बाहेर पडले आहे. मलेशियात एकूण वस्तीच्या सुमारे पंचेचाळीस टक्के मलायी लोक आहेत. उरलेल्यांत पस्तीस टक्के चिनी, पंधरा टक्के भारतीय व उरलेले पाकिस्तानी, सिलोनी, ब्रह्मी वगैरे आहेत. शासनात मलायी लोकांचे वर्चस्व आहे, तर व्यापार-उदिमात चिनी व हिंदी आघाडीवर आहेत. 'युनायटेड मलायन नॅशनल ऑर्गनायझेशन', 'मलायन चायनीज असोसिएशन', 'मलायन इंडियन काँग्रेस' ह्या तीन प्रमुख जमातींच्या पक्षांच्या एकीकरणातून 'अलायन्स पार्टी' हा पक्ष उभा राहिला आणि टुंकूंच्या नेतृत्वाखाली तोच पक्ष आज मलेशियात सत्तेवर आहे. परंतु अलीकडे वांशिक-प्रांतिक हितसंबंधांना प्राधान्य देणारे नवे पक्ष स्थापन झाले. त्यांची चलती झाली. फार काय, त्यामुळे 'अलायन्स पक्षा'-वरही फार मोठा परिणाम झाला. (द्रमुक, शिवसेना, विभिन्न आघाड्या वगैरेंच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या भारतातल्या परिस्थितीशी ह्या मलेशियातल्या परिस्थितीचे साम्य चांगलेच जाणवेल.) नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत ह्या प्रांतीय-वांशिक पक्षांनी बरीच आघाडी मारली आणि अलायन्स पक्षाला जेमतेम कामचलाऊ बहुमत मिळाले. ११ घटक राज्यांपैकी चार राज्यांतून सत्ता विरोधी पक्षांच्या हातात गेली. अर्थातच भारताप्रमाणेच केंद्र-संघ राज्यांतल्या संघर्षालाही मलेशियाला आता तोंड द्यावे लागणार आहे.

ह्या निवडणुकांमध्ये चिनी-लोकांचा साफ फज्जा उडाला. अर्थातच सरकारांत आपल्याला प्राधान्य मिळणार नाही म्हणून त्यांच्यांत असंतोष माजला. ह्याचा फायदा विरोधी चिनी-वांशिक पक्षाच्या लोकांनी घेतला. दंगली माजवायला सुरुवात केली. चिन्यांच्या ह्या आगळिकीमुळे भडकलेल्या मलायनांनी चोहोबाजूंनी चिन्यांवर हल्ले चढवले आणि त्यांतूनच ह्या सशस्त्र दंगली उद्भवल्या. गेल्या काही वर्षांत


बिजली लॅम्प्स




अधिक चांगल्या प्रकाशासाठीं...
जास्त काळ टिकण्यासाठीं...
बिजली प्रॉडक्टस् (इन्डिया) प्रा. लि.
पुणे-१३

इंडोनेशिया व फिलिपाईन्स ह्यांच्याविरुद्ध मलेशियाला लढावे लागले. त्या वेळी, मलायी, चिनी व हिंदी ह्यांच्या राष्ट्रीय एकतेमुळेच मलेशिया तरून जाऊ शकला. आज मात्र मलेशियाच्या राष्ट्रीय एकात्मतेलाच ह्या ताज्या जातीय-वांशिक-प्रांतिक उद्रेकांमुळे तडे गेले आहेत. त्यातच ह्या नवीन फुटीर वृत्तींच्या पक्षांमुळे मलेशियातली केंद्रसत्ता पहिल्याइतकी प्रबळ राहिलेली नाही. अर्थातच टुंकू अब्दुल रहमान ह्यांच्यासारख्या कुशल संघटकाला—सर्वसंग्राहक नेत्याला देखील—फार मोठ्या दिव्यातून जावे लागणार आहे, ह्यात मात्र काहीच शंका नाही.

आश्चर्य हे की, भारताच्या ह्या मित्र-राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत आणि भारताच्या आजच्या अंतर्गत परिस्थितीत कमालीचे साम्य आहे. मलेशियातल्या घटनांपासून भारतीयांनाही बराच बोध घ्यावा लागेल !

# पुनरागमन !

एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले व भारतीय राजकारणात स्वतःचे निश्चित स्थान निर्माण केलेले दोन मातबर नेते लोकसभेत पुन: प्रवेश करीत आहेत. श्री. स. का. पाटील व श्री. व्ही. के. कृष्ण मेनन हे दोघेही १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीतून मुंबईत पराभूत झाले होते. योगायोगच म्हणावा लागेल, परंतु दोघेही एकाच वेळी, एक लाखाच्या मताधिक्यानेच पुन्हा लोकसभेवर निवडून जात आहेत. त्या दोघांचे जसे अनेक चाहते, समर्थक आहेत, तसेच त्यांचे असंख्य विरोधकही आहेत. असे असले तरी दोघांचेही स्थान वादातीत आहे. श्री. पाटलांच्या निवडणुकीमुळे सरकार पक्षाला बळकटी येणार आहे; तर श्री. मेनन ह्यांच्या पुनःप्रवेशामुळे विरोधी बाकांवर एक प्रभावी व्यक्तिमत्त्व स्थानापन्न होणार आहे म्हणूनच दोघांचीही निवड स्वागतार्हच मानली पाहिजे.

ह्या वेळी एक विचार मात्र नकळत डोकावून जातो ! आपल्या ध्येयधोरणांविरुद्ध निदर्शने होतात, प्रक्षोभ माजतात म्हणून सार्वमत घेणारी, सार्वमताचा कौल मानणारी फ्रान्सच्या माजी अध्यक्षांची—ज. द गॉलची—आठवण होऊन जाते. त्या पार्श्वभूमीवर, निवडणुकीत पराभव झाला असताही, वेळोवेळी कडवट टीका-निदर्शने होत असताही सत्तेला चिकटून राहायची धडपड करीत असलेले भारतीय नेतृत्व पाहिले की खेद होतो ! निराश वाटते !! ■■

# फॉस्फोमिन -



## अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग प्रतिकार-क्षमता वाढविते.





खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!




व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस् युक्त उत्तम फलास्वाद असलेलें हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® ® हा ई. आर. स्क्विब अॅण्ड सन्स, इन्कॉर्पोरेटेड, यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्राइवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

shilpi sc 50/67Mar



# मुक्ताफळे

## हा खेळ सावल्यांचा

कर्तृत्ववान माणसे अकाली ऐन तारुण्यात जावीत व म्हातारे, कर्तृत्व नको तेव्हा जावे, हा या देशाला मिळालेला मोठा शाप होय. परंतु शापाला उःशाप हा असतोच बरे ! डॉ. झाकीर हुसेन गेले. नको तेव्हा गेले. वस्तुत: १९६७ साली डॉ. राधाकृष्णन यांना पुन: आग्रह झाला असता तर ' देश के नाम ' आणखी दहा संदेश देण्यासाठी ते पाच वर्षे राष्ट्रपती राहिले असते. भारतीय नेत्रवैद्यांना बोंबलत ठेवून, मुद्दाम इंग्लडला जाऊन ते दूरदृष्टी घेऊन आले होते ! परंतु डॉ. झाकीर हुसेन तेव्हा म्हणाले, " आता मी उपराष्ट्रपती काही राहणार नाही. राष्ट्रपती होणार नसेन तर निवृत्त होतो. " त्यांचा हा आग्रह किती सार्थ होता पाहा. तेव्हा त्यांनी आग्रह धरला म्हणून ना निदान दोन वर्षे तरी ते या पदावर राहिले ?

अर्थात इंदिराजींचा आधार नसता तर ते या पदावर राहणे कठीण होते. सुदैवाने इंदिराजींच्या पदरी हुकमी मत असल्याने या पदावर ते निवडून आले आणि हूं की चूं न करता दोन वर्षे राहिले. डॉ. झाकीर हुसेन यांच्यावर लिहिताना ना. ग. गोरे लिहितात--

" हेच पहिले राष्ट्रपती की ज्यांच्या कारकीर्दीत घटनेतील २४५ ते २६३ कलमांचा वापर करण्याची खऱ्या अर्थाने वेळ आली ! त्या संघर्षामध्ये राष्ट्रपतीच्या अधिकारांचा वापर करून ज्या ज्या गोष्टी करण्यात आल्या , त्यांवर डॉक्टर साहेबांच्या बुद्धिमत्तेचा किंवा कर्तृत्वाचा काही ठसा उमटला होता असे म्हणता येणार नाही...देशात काही निकोप व खंबीर प्रथाही घालून देणे शक्य होते, पण तसे डॉक्टर साहेबांच्या हातून घडले नाही. "

देशावर ' ठसे ' उमटवण्याचे काम इंदिराजी, मोरारजी नेकीने करीत असताना डॉ. झाकीर साहेबांनी ' ठसा ' उमटवला नाही, याबद्दल टीका करण्यात काय बरे

अर्थ आहे ! पंतप्रधान होण्यासाठी उपपंतप्रधानकीचा सौदा कसा करावा, याची निकोप, व खंबीर प्रथा डॉ. झाकीर हुसेन यांच्याच अध्यक्षतेखाली सुरू झाली नाही काय ? आमच्या मते ठसा उमटावा, काही कर्तृत्व करावे या अपेक्षेने डॉ. झाकीर हुसेन यांची निवड झालीच नव्हती ! भारतातील मुसलमानांचे मन हलावे, भयमुक्त मनाने त्यांनी भारतीय जीवनाशी समरस व्हावे यासाठी डॉ. झाकीर हुसेन यांची निवड केलेली होती. ना. ग. गोरे सांगतात की, आदर्श भारतीय मुसलमान म्हणून सर्वसामान्य मुस्लीम जनतेने डॉ. झाकीर साहेबांना मान्यताच दिली नाही. त्यांच्या शोकसभेत तर मुसलमानांची अल्पसंख्या ही मनाला दंश करून जाणारी होती ! फक्त दोनच वर्षांत ही किमया घडली नाही; याचा आपण अंतर्मुख होऊन विचार केला तर 'दोन वर्षे' कमी पडली, हे आपल्या लक्षात येईल. या मोठ्या कार्यासाठी हे 'शॉर्ट टर्म प्लॅनिंग' फुकट गेले तरी 'लाँग टर्म प्लॅनिंग' करून पाहणे अगत्याचे आहे. नव्या राष्ट्रपतीच्या नावांचा विचार करताना ही गोष्ट मार्गदर्शक ठरावी.

पण इतिहासातून आपण काही शिकत नाही, हेच खरे ! 'व्ही फॉर व्हिक्टरी' या अंदाजाने, व्ही. व्ही. गिरी यांनी डॉ. झाकीर साहेबांचीच बांग दिली– "आता यापुढे मला उपराष्ट्रपती राहता येणार नाही !" आली पंचाईत ! 'गिरी आताच पाउणशे वर्षांचे आहेत. अजून पाच वर्षे जाणे कठीण आहे' असे काही वृत्तपत्रांनी लिहिले. इंदिरा गांधींचे माजी पब्लिक रिलेशन्स ऑफिसर श्री. व्हर्गिस यांनीच म्हणे ही 'बॉडी-लाईन' बोलिंग सुरू केली ! बॉडीची शाश्वती कुणी देऊ नये हे जितके खरे तितकीच देहाची शाश्वती द्यायला हरकत नाही, अशी उदाहरणेही काही कमी नाहीत ! या मुद्यावर डबल व्ही गिरींची दांडी उडेलसे दिसत नाही. जगजीवनराम यांचे नाव 'हरिजन' म्हणून पुढे आले, ते बहुधा 'गिरी 'जनाला खाली बसवण्यासाठीच. परंतु जगजीवनराम यांनी जाहीर केले– "मी जनसामान्यांचा आहे आणि गरीब व दलितांमध्ये राहणेच मला आवडेल !" इंदिराजी, यशवंतराव, स्वर्णसिंग, मोरारजी यांचा पर्यायाने 'गरीब' व 'दलित' असा गौरव करून जगजीवराम यांनी आपले मंत्रिमंडळातील आसन अधिक घट्ट केले आहे. या दलित व गरीब मंडळींत राहूनच त्यांनी बांधवांचे हित करावे.

विनोबांचे नाव, व्ही. बी. नाईक या म्हैसुरी गांधीवाद्याने सुचवले, तर जयप्रकाश नारायण यांना काही समाजवाद्यांनी पुढे घुसविण्याचा प्रयत्न केला. विनोबांची अशी थट्टा लोकांनी का बरे करावी ? "पांडुरंगा, तुझ्या देवळात हरिजनांना प्रवेश नाही तोपर्यंत मी माझ्या जागी बरा," असे म्हणणारे विनोबा–किमानपक्षी जगजीवनराम-राष्ट्रपती झाल्याखेरीज राष्ट्रपती कसे होतील ? शिवाय "दिशा लक्षात न घेता कसेतरी हातपाय फिरवीत राहण्याने, मार्ग आक्रमिला जात नाही," असे त्यांचे मत असल्याने इंदिरा सरकारशी त्यांचे जमेल तरी कसे ? जयप्रकाश

राष्ट्रपती झाले तर शेख अब्दुल्लांना उपराष्ट्रपती करावे लागेल. नाहीतर दोघांना वारंवार भेटणे अशक्य होईल व काश्मीरचा प्रश्न सुटणार नाही ! तेव्हा शेख अब्दुल्ला हे उपराष्ट्रपती व्हायला तयार झाल्याखेरीज जयप्रकाशांना राष्ट्रपतिपदासाठी विचारणे, हा त्यांचा अपमानच होय !

१९७२ साली काँग्रेसपक्षाला राष्ट्रपतींच्या निवडणुकीत काही मदत अपेक्षित आहे. पाच कोटी मुसलमान किंवा आठ कोटी हरिजन-गिरीजन यांपैकी एकातरी 'गठ्ठ्या 'वर झडप पडणे आवश्यक आहे. या दृष्टीने राष्ट्रपती एक तर हरिजन हवा किंवा यवन हवा, असे आमचे मत आहे. जगजीवनराम यांच्यापेक्षा थोर हरिजन तूर्त भारतात आहे, असे आम्हांस वाटत नाही. ते तर नाही म्हणतात, तेव्हा आता काय करावे, हा प्रश्न आहे.

" मी परत येण्यापूर्वी राष्ट्राध्यक्ष नक्की करू नका हं, " असे बजावून निजलिंगप्पा मा. टिटो यांना भेटायला गेले आहेत. यावरून ते मा. टिटोलाच यासंबंधी विचारणार आहेत की काय, अशी शंका येते. परंतु मा. टिटोची निवड कोसिजीन यांना आवडेल, असे आम्हांस वाटत नाही. लिंडन जॉन्सन हे आता रिकामे आहेत, परंतु कोसिजीन यांना जॉन्सनचे नाव काढताच क्रोधाने मूर्च्छाच येईल.

या सर्व अडचणींतून मार्ग काढण्यासाठी आतापर्यंत वापरलेले नेहमीचे तंत्र वापरले तर एका दगडात अनेक पक्षी मरतील, असे आम्हांस वाटते. कन्नमवार गेले आणि त्यांची जागा ताई कन्नमवारांना मिळाली. ना. पाडवींसारखे काँग्रेसी मंत्री गेले तरीदेखील त्यांच्या धर्मपत्नींना त्यांची जागा मिळते. आमच्या दृष्टीने बेगम झाकीरसाहेबांची निवड ही सर्व दृष्टींनी योग्य होईल ! इंदिरा गांधींचे व बेगमसाहेबांचे उत्तम जमेल.

शहाजहान बेगमसाहेबांचे नाव पुढे झाले तर डबल व्ही. गिरी उपराष्ट्रपतिपदावर राहणार नाहीत. बेगम शहाजहान या राष्ट्रपती झाल्या तर मोरारजींना खूप ठेवण्यासाठी तारकेश्वरी सिंहांना उपराष्ट्रपती करावे, असे आम्हांस नम्रपणे सुचवावेसे वाटते.

—ग्यानबा


स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २



# अंधार-उजेड

**अनिल हवालदार**

## ||| ओपन्जन |||

बहुतेक वेळा हल्ली चित्रपट पाहिल्यानंतर समाधानाची भावना मनात तरळत नाही. आतून काही गलबलून उठत नाही. काहीतरी सपक–खोटा प्रकार समोरच्या रुपेरी पडद्यावर आपण तीन तास पाहतो. कधी समोरची भाषा हिंदी असते, तर कधी मराठी. इंग्रजी भाषेत पूर्वी काही चांगले पाहायला मिळायचे. पण तिथेही आता बलदंड स्त्रिया नि पुरुष स्वतःच्या देहाचे नको इतके प्रदर्शन करीत अतर्क्य गोष्टी करताना दिसतात. याच असमाधानातून मला वाटते, मुंबईत 'फिल्म सोसायटी'ची निर्मिती झाली. आपल्याला न समजणाऱ्या अशा जगातल्या विविध भाषांतील उत्तम चित्रपट हे फिल्म क्लब दाखवायला लागले. यांतूनच सत्यजित रे भारतात लोकप्रिय झाले.

अशाच एका 'सुचित्रा' नामक फिल्म क्लबने परवा एक आगळा बंगाली चित्रपट दाखविला. हा चित्रपट पाहून बाहेर पडलो, तेव्हा डोक्यात अनेक विचारांचा कल्लोळ होता. तेवढेच त्या चित्रपटाने अंतर्मुख बनवले होते. त्याच वेळी आम्हाला नवे वास्तववादी चित्रपट हवेत म्हणजे नक्की काय हवे याचे उत्तरही मिळाले होते. सत्यजित रे यांनी चित्रपटात वास्तववाद प्रस्थापित केला तरी त्यांनी निवडलेल्या कथा वहिवाटीतल्या होत्या. त्यांची हाताळणी चाकोरीबाहेरची होती; पण अगदी या घटकेचे ज्वलंत प्रश्न घेऊन खास नव्या वास्तववादी तंत्रातून चित्रपट सादर करण्याचे धाडस तपन सिन्हा यांनी केलेले परवा पाहिले.

या चित्रपटाचे नाव 'ओपन्जन !' याचा अर्थ सगेसोयरे. रक्ताचे नाते हे

शेवटी खरे, ही आपली भावना. हा आपला संस्कार. पण ह्या भावनेला—ह्या संस्कारालाही—मारी ठरणारा असतो माणुसकीचा गहिवर. मुंबई—कलकत्त्यासारख्या महानगरांमध्ये सध्याच्या यंत्रजीवनात रक्ताचे नाते पाण्यापेक्षा पातळ होते. इतके की, त्याचे स्वार्थाच्या घाणेरड्या घामात रूपांतर होते. पण याच बकाल शहरांमध्ये रक्ताच्या नात्याशिवाय असे काही लागेबांधे जडलेले दिसतात—मानवतेची मूल्ये अशी काही जपलेली दिसतात—की, जीवनाविषयी निराश होता होता आशेचा किरण चमकून जातो. तपन सिन्हांनी नेमका हाच विषयी ' ओपन्जन 'मध्ये मांडला आहे.



तपन सिन्हा

या चित्रपटाची नायिका आहे एक म्हातारी. पन्नाशी उलटून साठीच्या घरात गेलेली. मोठी गोष्टीवेल्हाळ, भोळीभाबडी. पण ह्या जगातला स्वार्थ तिला चटकन् उमजतो. नवरा मरून गेलेला. खेडेगावात एका प्रचंड ओसाड वाड्यात ही म्हातारी एकटीच राहते. ना मूल, ना बाळ ! चित्रपट सुरू होतो तोच मुळी तिच्या लग्नाच्या पहिल्या विचित्र रात्रीच्या प्रसंगाने. तपन सिन्हांनी ' डिझॉल्व्ह 'च्या व्यापात न पडता ' कट् टु कट् ' पद्धतीने सबंध चित्रपटाची कथा सांगितली आहे. ह्या पद्धतीत प्रेक्षकाला पाहताना एकदम खटके बसले तरी कथेला विलक्षण वेग येतो. पन्नास वर्षांपूर्वीच्या कथनातून आपण एकदम आजच्या घडीला पोचतो. आणि......

आणि इथून कथा वेगाने धावत राहते. त्यात अनेक पात्रे प्रवेश करतात. त्यांची पूर्वायुष्यातील निवेदने येतात. पुन्हा वर्तमानाचे कथन दिग्दर्शक करू लागतो. त्यात पन्नास वर्षांपूर्वीच्या नवरा—बायकोच्या नात्याचे दर्शन घडते. आजचे कलकत्ता दिसते. आजची तरुण पिढी संतापलेली—जीवनातल्या एका चुकीसाठी सबंध आयुष्याचा सारीपाट उधळला म्हणून खंतावलेली—चांगले करायची इच्छा असूनही वाइटाकडे नाइलाजाने झुकलेली. आजच्या कलकत्त्याच्या राजकीय जीवनाचे विदारक दर्शन घडते. नुकत्याच घडलेल्या रवींद्र सरोवरप्रकरणातील घटनांच्या शक्याशक्यतेचा अंदाज बांधता येतो. आधुनिक जीवनात पैशाच्या मागे लागलेली मिळवती जोडपी जीवनातल्या रसरसत्या आनंदाला पारखी झालेली याच चित्रपटात पाहायला मिळतात. आणि याच चित्रपटात पाहायला मिळतात ते गुंड ठरलेले आजचे कॉलेज विद्यार्थी ! त्यांची साऱ्यांना जरब असलेली दिसते. त्यांच्याजवळ गावठी बाँब आहेत, पिस्तुले आहेत. त्यांच्या घनघोर मारामाऱ्या होतात; पण हीच ' गुंड ' मुले दोन अश्राप कोवळ्या जिवांचा आपुलकीने सांभाळ करताना दिसतात. खेड्यातून आलेल्या त्या माबड्या म्हातारीला आदराने ' ठाकुर माँ ' म्हणून हाक मार-

तात. तिच्या दूध-फळांची रोज जातीने सोय करतात. त्यांना माणुसकी समजते. चीड आहे ती खोटयाची, दांभिकतेची. तेव्हा ती गुंड ठरतात. त्या ' गुंड ' मुलांमध्ये त्या म्हातारीला अमाप गुण भरलेले दिसतात. ' मला अशी तुमच्यासारखी शंभर मुले हवी होती,' असे ती मनापासून म्हणते. त्यांना खाऊपिऊ घालते. मायेचा पाठी-वरून हात फिरवते. त्या दोन अश्राप कोवळया जिवांना आधार देते. एका भुता-टकीच्या घरात हे माणुसकीचे झरे खळखळताना दिसतात......

ह्या सान्या गोष्टी दाखविताना तपन सिन्हांनी हे बरे, हे वाईट असे सांगितलेले नाही. आज जसे आहे तसे ते दाखवीत गेलेत. पण ही वास्तववादी कथनाची गुंफण विलक्षण कलात्मक आहे. बारकावे तर एवढे की, म्हातारीच्या जुन्या काळाचे चित्रण करताना अभिनयसुद्धा जुन्या धाटणीचा; पण त्या गुंड तरुणांचे चित्रण हॉलिवुडच्या ' वेस्ट साइड स्टोरी 'ची आठवण करून देणारे. मुले कॉलेजच्या वर्गाची नासधूस करीत असताना एक मुलगा तालासुरावर गिटार वाजवताना दिसतो. उपहासाचे मार्मिक दर्शन. त्याचप्रमाणे गावठी बाँबचा चेंडू करून मैदानात तो झेलण्याचा खेळ खेळत ती तरुण पोरे गाणे म्हणतात, तेही पाहायला विलोभनीय वाटते. म्हातारी-बरोबर रात्री गप्पांच्या अड्डयावर एक पोरगा त्याच भावविवशतेने टागोरांची ' आई-मुला 'ची कविता म्हणून दाखवताना घेतलेला प्रसंग कुठेतरी अंतःकरण हलवतो.

एक ना दोन ! अशी सौंदर्यस्थळे या चित्रपटात जागोजागी विखुरलेली दिसतात. आणि हे सारं मुद्दाम केलंय असं वाटत नाही. जुनीजाणती अभिनेत्री छायादेवी म्हातारीचे काम जेवढे समरसून करते तेवढीच समरसता त्या तरुण पोरांमध्ये आहे. त्यात ' छुटी 'चा नायक एका दुय्यम भूमिकेत दिसतो. सध्या ' आशीर्वाद 'मध्ये गाजलेली सुमिता संन्याल एका छोटया भूमिकेत दिसते. पण ही नट-नटचांची नावे लक्षातच राहत नाहीत.

लक्षात राहते ती म्हातारी. माणुसकीने थबथबलेली. त्या मुलांवर प्रेम करण्या-साठीच जन्माला आलेली आणि त्यांच्याच दंगलीत अखेर चुकून गोळी लागून ठार झालेली.

लक्षात राहतो रवी. उंचापुरा, देखणा दिसणारा, त्या तरुणांच्या टोळक्यांचा नायक. हुशार असलेला, पण जिच्यावर प्रेम केले तिचा दुसऱ्या एका तरुणाने अपमान केला म्हणून त्याला ठोकून काढणारा. त्यासाठी तुरुंगात गेलेला. बी. एस्सी. च्या परीक्षेला ऐन वेळी बसू न शकलेला. सारे आयुष्य त्याच्या मनाविरुद्ध वाकडया वाटेला गेले तरी त्या गल्लीतल्या दोन लहान अनाथ मुलांना प्रेमाने सांभाळणारा. आईचा चेहरासुद्धा आठवत नाही म्हणून काकुळतीने म्हातारीला सांगणारा. "एका छोटया चुकीची एवढी मोठी शिक्षा ?" असे तो कळवळून म्हातारीला विचारतो तेव्हा त्याच्या उद्‌गारांतली आर्तता आणि डोळयांतले भाव


'देवदास 'मधल्या सैगलच्या याच शब्दांची प्रकर्षाने आठवण करून देतात. रवी म्हणजे आजच्या भारतीय तरुणाची मूर्तिमंत शोकांतिका. या भारतात नव्या पिढीची उमेद कशी मातीमोल होत आहे त्याचे हा चित्रपट म्हणजे प्रतीक !

चित्रपटाची अखेर तर अद्याप डोळ्यांसमोरून हलत नाही. साश्रू चेहऱ्यांनी ते सारे तरुण भान हरपून गोळी लागून कोसळलेल्या ठाकुर-माँच्या कलेवराकडे पाहताहेत. पोलीस त्यांना निर्दयपणे आपल्या गाड्यांमध्ये कोंबतात. अँब्युलन्समध्ये म्हातारीचे प्रेत ठेवले जाते. तिथे उभी असतात ती दोन छोटी मुले. ज्यांचा बाप तुरुंगात आहे–आई मेलीय. त्यांचे पोशिंदे होते ते तरुण आणि मायेचा ओलावा होता त्या म्हातारीचा. ती कावऱ्याबावऱ्या नजरेने हा सारा प्रकार पाहत असतात. पुन्हा आपले छत्र हरपल्याची त्यांना जाणीव होते आणि ती दोघे त्या अँब्युलन्समागे धावू लागतात. मैदान मागे पडते, रस्ते धावू लागतात, गाडी वळणावळणाने पुढे जात असते आणि ती दोन इवलीशी पोरे एकटक नजरेने गाडीकडे पाहत अनवाणी पायांनी धावत असतात...! अश्रू आवरणे कठीण जाते हे सारे पाहताना !!

वास्तववादी चित्रपटनिर्मितीच्या दृष्टीने 'ओपन्जन' हे एक पुढचे पाऊल आहे. विषय मांडण्यात निर्भयता आहे. ज्या कौतुकाने आज आम्ही चेकोस्लोवाक आणि पोलिश चित्रपट पाहतो, त्याच कौतुकाने तपन सिन्हांच्या ह्या कलाकृतीचे कौतुक केले पाहिजे. जगातल्या नावाजलेल्या चित्रपट महोत्सवांमध्ये हा चित्रपट कात्री न लावता आवर्जून पाठविला पाहिजे. या घटकेला तपन सिन्हांच्या पूर्वीच्या कलाकृती मला चटकन आठवत नाहीत, इतकं ह्या चित्रपटानं भारून टाकलंय. नाहीतरी कलावंतांच्या पूर्वीच्या कामगिऱ्या प्रकर्षाने आठवतात केव्हा ? नव्या कलाकृतीत ते कमी पडतात तेव्हा ! पण इथे तपन सिन्हांनी काहीतरी आगळेच केले आहे. पटकथा, संगीत आणि दिग्दर्शनाची तिहेरी कामगिरी त्यांनी फारच बहारीने पार पाडली आहे.

आज असे अंतर्मुख करणारे, डोक्यात विचारांचा कल्लोळ उसळविणारे, तरुणांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना हात घालणारे 'ओपन्जन 'सारखे चित्रपट आम्हांला हवे आहेत. अशा चित्रपटांना खर्च येतो 'मुरळी मल्हारी रायाची' किंवा 'धर्मकन्ये'-इतकाच ! ■■

चंद्रशेखर मराठे



# ट्रॅक्टर आणि बॉयलर

## वीजनिर्मितीची प्रगती

ग्रामीण भागातील शेती व उद्योग या दोन्ही क्षेत्रांच्या विकासासाठी विद्युतशक्तीची आवश्यकता फार आहे. यामुळे विद्युतिकरणाच्या कामास आपल्या नियोजनात नेहमीच महत्त्व दिलेले आहे. चौथ्या योजनेत विद्युतीकरण योजनांसाठी २०८४ कोटी ५० लाख रु. ची तरतूद करण्यात आलेली आहे. या खर्चाची वर्गवारी अशी—

| | |
|---|---|
| केंद्राच्या योजना | २५२ |
| केंद्रपुरस्कृत योजना | १४ |
| केंद्रशासित प्रदेश | ७४·२ |
| राज्य सरकारे | १७४४·३ |
| | २०८४·५ |

योजनेच्या एकूण खर्चापैकी ही रक्कम १४ टक्के भरते. १९७३–७४ पर्यंत २२ दशलक्ष किलोवॅट वीज निर्माण करण्याची क्षमता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. नियोजनास सुरुवात करण्यापूर्वी आपली विद्युतनिर्मितीची क्षमता २·३० दशलक्ष किलोवॅटएवढी होती. १९६८–६९ अखेर ती १४·५ दशलक्ष किलोवॅट एवढी झाली.

राज्यवार पाहता विजेच्या उपलब्धतेमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला लागतो. दुसरा क्रमांक उत्तर प्रदेशचा व तिसरा पश्चिम बंगालचा लागतो. दुसऱ्या व तिसऱ्या योजनेत बऱ्याच विद्युतिकरण योजना लांबणीवर पडल्या हे खालील आकडेवारीवरून दिसून येईल—

| | उद्दिष्ट | साध्य (दशलक्ष किलोवॉट) |
|---|---|---|
| दुसरी योजना | ६·९० | ५·६५ |
| तिसरी योजना | १२·६९ | १०·१७ |

ग्रामीण विद्युतिकरणाच्या कार्यक्रमांच्या अंतर्गत डिसेंबर १९६८ अखेर ६२,८६० खेड्यांना वीज पुरवण्याचे काम पूर्ण झाले होते. देशाच्या एकूण खेड्यांपैकी ११

टक्के खेडयांत आता वीज गेली आहे. १९६८–६९ अखेर वीजपुरवठा होणाऱ्या खेडयांची संख्या ६९,००० वर जाईल.

मार्च १९६९ अखेर १०,७०,००० पंपसेटस्‌ना वीजपुरवठा करण्यात येऊ लागला. १९६६–६७ ते १९६८–६९ या तीन आर्थिक वर्षांत कार्यान्वित असलेल्या पंपसेटस्‌ची संख्या ५,१०,००० वरून १०,७०,००० वर गेली हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९७३–७४ अखेर १२,४०,००० पंपसेटस् विजेच्या साहाय्याने कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट आहे. सर्वांत जास्त पंपसेटस् तामीळनाडूत आहेत. त्या खालोखाल महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, म्हैसूर यांचा क्रमांक लागतो.

विजेच्या दरडोई वापरात पश्चिम बंगालचा क्रम पहिला लागतो व त्या खालोखाल महाराष्ट्राचा लागतो. विजेचा दरडोई वापर १९६०–६१ साली ३८ केडब्ल्यूएच होता तो १९६८–६९ अखेर दुपटीने वाढून ७७·३ केडब्ल्यूएच एवढा झाला. विजेच्या एकूण वापराची कारणांनुसार वर्गवारी अशी–

(शेकडा डक्के)

| | १९६०–६१ | १९६५–६६ | १९६८–६९ |
|---|---|---|---|
| औद्योगिक | ७४·४ | ७३·८ | ७३·० |
| घरगुती | ९·० | ७·८ | ८·० |
| पाणीपुरवठा | ५·० | ६·२ | ६·६ |
| इतर | ११·६ | १२·२ | १२·४ |
| | १०० | १०० | १०० |

पाणीपुरवठ्यासाठी होत असणाऱ्या विजेच्या वापरात थोडी वाढ झाली आहे असे दिसून येईल.

वीजनिर्मितीबाबतचा पुढचा टप्पा म्हणजे अणुभट्टीनिर्मित वीज हा होय. या महिन्यात तारापूर येथे आण्विक वीज उत्पादनाच्या कामास प्रारंभ झाला. तेथील भट्टीची क्षमता ४०० मेगॅवॅट आहे. अणुशक्ती मंडळाने आण्विक वीजनिर्मितीसाठी येत्या पाच वर्षांत ३२० कोटी रु. ची योजना आखली आहे. राजस्थान व तामीळनाडू येथील संकल्पित आण्विक वीज भट्ट्यांच्या उभारणीसाठी १२० कोटी रु. चा खर्च येईल. या योजनेच्या पूर्तीनंतर देशातील आण्विक वीज उत्पादन १२ लाख मेगॅवॅटएवढे होईल.

प्रादेशिक विभाजनातील असमतोल विजेच्या उपलब्धतीतही दिसून येतो. हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

| राज्य / प्रदेश | १९६८–६९ अखेर उपलब्ध वीज मेगॅवॉट |
|---|---|
| आंध्र प्रदेश | ६६७·०० |

| | |
|---|---|
| आसाम | १६३·८० |
| बिहार | ३०२·०० |
| गुजरात | ६७·६० |
| हरियाना<br>पंजाब | ११९५·५० |
| जम्मू काश्मीर | ४३·५० |
| केरळ | ५५१·०० |
| मध्यप्रदेश | ७६२·५० |
| महाराष्ट्र | १६७३·५० |
| म्हैसूर | ८१७·४० |
| ओरिसा | ५०५·५ |
| राजस्थान | ५२९·५ |
| तामीळनाडू | ११५१·०० |
| उत्तर प्रदेश | १३६४·०० |

■■




# PAG

# पूना आर्टिस्ट्स गिल्ड

**वसंत सहस्रबुद्धे**

---

पुण्यातील एक रविवारची सायंकाळ. २५ मे हा दिवस...दिवसभर कडाक्याच्या उन्हाळा टाळून घरात हुश्श–हुश्श करीत सुस्तपणाने दुपारचा वेळ काढून झाल्यावर आता संध्याकाळच्या वाऱ्याच्या झुळका अंगावर घेत फिरण्यासाठी बाहेर पडलेले स्त्री-पुरुषांचे घोळके संथपणाने सरकत आहेत...

टिळकपथावर वाहने व रंगीबेरंगी वस्त्र प्रावरणातील नागरिकांचा नेहमीचा आट्यापाट्या चालला आहे...अभिनव कलाविद्यालयाच्या भव्य वास्तूच्या प्रवेशद्वाराजवळ कमान उभी केली आहे. तरुण, प्रौढ, वृद्ध आणि बालही प्रवेशद्वारातून आत जात आहेत. काही बाहेरही उभे आहेत. कसला स्वागत समारंभ आहे ? लग्नाचा...? छे ! छे ! चित्रकलाप्रर्शनाचा. येथे आहेर, प्रेझेंट वगैरे काही नको...फक्त दहा पैसे प्रवेश मूल्य द्यायचे. प्रवेशद्वारातून आत शिरताच समोरच्या टेबलावर प्रवेशपत्रिका घेता येते. ती घेऊन होताच उजव्या हाताला तळघरात जाण्यासाठी जिना आहे. त्या जिन्याने खाली येताच समोर तीन दालनात हे कलाप्रदर्शन सामावलेले आहे.

पुण्यातील सुमारे बहात्तर कलावंतांनी वेगवेगळ्या शैलीच्या आपल्या एकशे-एकतीस कलाकृती या प्रदर्शनांत ठेवल्या आहेत. पुण्यामध्ये चित्रकला प्रदर्शन हा विषय आता नवीन राहिलेला नाही. वर्षातून तीन चार तरी कलाप्रदर्शने पुण्यात भरवली जातात. नागरिकांचा प्रतिसादही त्यांना चांगला मिळत असतो; तथापि ही सर्व प्रदर्शने बहुत करून एका चित्रकाराच्या कलाकृतींची असतात. (one man show) आजपर्यंत कलावंतांना एकत्रीतपणे एका ठिकाणी आपली चित्रे प्रदर्शित करण्याची संधी फारशी मिळत नव्हती.

म्हणून सर्व चित्रकारांना एकत्र आणून त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन मांडून सर्वांना संधी उपलब्ध करून द्यावी, कलावंतात परस्पर सहकार्य निर्माण व्हावे, त्यातून एक आदर्श अशी संघटना तयार व्हावी, तिच्यातर्फे प्रात्यक्षिके, सहली, व्याख्याने, चित्र-कलेवर परिसंवाद व्हावेत अशा दृष्टिकोणातूनच ' पूना आर्टिस्ट्स गिल्ड 'ची सुमारे



मेंढपाळ

दोन वर्षांपूर्वी स्थापना झाली. 'पॅग'चे सोळा संस्थापक सभासद असून जवळ जवळ पन्नास चित्रकार सभासद नोंदवले गेले आहेत. या संस्थेचे हे चौथे प्रदर्शन आहे. चित्रकलेच्या प्रांतातील बहुतेक सर्व 'नवे-जुने' प्रकार यात अंतर्भूत आहेत.

डाव्या बाजूच्या पहिल्या दालनातील 'मॅरेज' हे श्री. सावंत यांचे कॉंपोझिशन वैशिष्टयपूर्ण वाटते. पूर्वीच्या काळी असणाऱ्या लाकडी बाहुल्यासारख्या आकृतीची रचना ही या चित्रातील विशेष गोष्ट आहे. तसेच 'नृत्य' हे (क्र. ४८) श्री. जगताप यांचे चित्र नृत्यातील जोष व गती उत्तम व्यक्त करते. 'दिवाळी' हे सौ. जगताप यांचे नवचित्र रेषांचे लालित्य, रंगसंगती व आशय यांचे उत्तम मिश्रण दाखवते.

उजव्या बाजूच्या पहिल्या दालनातील Shephards (४५८) हे डॉ. सावंत यांचे चित्र ठसठशीत रेषा, वैशिष्टयपूर्ण रंगसंगतीमुळे लक्षात राहते.

श्री. ग. ना. जाधव याचे जलरंगातील व्यक्तिचित्र (क्र. ४२) हे जाधवांच्या कुंचल्याचे सामर्थ्य, त्यांचे जल रंगावरील प्रभुत्व दर्शवून जाते.

'To the festival' ही श्री. सुदाम डोके यांची चित्ररचना त्यांची खास शैली, रचनेतील साधेपणा व रेषांचा डौलदार विलास व्यक्त करते. श्री. शरद

त्रिभुवन यांचे Drowning Moon (क्र. ९७) हे चित्र तरल मोहक रंगसंगती वातावरण व कुंचल्याचा आकर्षक विलास यांसाठी लक्षात राहते. चित्रकार खटाव-करांचा ' गणेश ' (क्र. ६२), कुमारी कावूर यांचे ' दिवाळी ' (क्र.११८) हे बाटिक शैलीचे चित्र, कवठेकर यांचे ' मृगजळ ' (क्र. ७३) हे चित्र, हे आधुनिक शैलीचे चित्र परिणामकारक वाटते. श्री. डेंगळे यांचे ' समर ' (क्र. १०२) हे चित्र रचनेचे वैशिष्ट्य, ठसठशीत रंगाचे विविध आकार यांमुळे परिणामकारक वाटते.

' हस्तकला ' हे एक चित्रकलेचे उपांग या खेपेपासून प्रदर्शनात अंतर्भूत केले आहे, तथापि त्या विभागातील कलाकृतींची संख्या मर्यादित आहे. उल्लेखनीय असे त्यात फारसे दिसत नाही. काही शिल्पाकृती या प्रदर्शनात आहेत, पण त्यांची संख्या फारच थोडी आहे. शैलीही जवळजवळ एकच वाटते. Still Life या विभागातील कलाकृती फारच थोडया आहेत. गेल्या २/३ प्रदर्शनाच्या मानाने या खेपेस आलेल्या कलाकृतींत शैलीची विविधता चांगली आहे. अहमहमिकेने पुढे येऊन आपल्या कलाकृती प्रदर्शनासाठी पाठवण्याची उत्साही वृत्ती चित्रकार मंडळींत वाढते आहे हे या प्रदर्शनावरून दिसून येते. ही संस्थेच्या (PAG) दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे......

' पूना आर्टिस्ट्स गिल्ड 'ची स्थापना होण्यापूर्वी अशा तऱ्हेचे प्रयत्न काही चित्रकारांनी अनेकदा पूर्वी करून पाहिले होते; पण ही ' आवळचांची ' मोट बांधण्याचे चिकाटीचे काम यशस्वी होऊ शकले नव्हते. परवा परवापर्यंत बसमध्ये अगर चित्रपटगृहांत आपल्या शेजारी बसलेला इसम आपला व्यवसाय बंधू आहे, कलावंत आहे, याची पुसटही कल्पना एकमेकांना नसे. पुण्यात असलेले जवळ जवळ दीडशे चित्रकार (यात हौशी, व्यावसायिक, शिक्षक हे सर्व प्रकार समाविष्ट ! ) आपापल्या व्यवसायांत, उद्योगांत मग्न असत. परस्परांचा परिचय व्हावा ! आपण केव्हातरी एकदा एकत्र येऊन बसावे, बोलावे, हसावे, खेळावे, अडचणी समजावून घ्याव्यात, द्याव्यात या गोष्टींचा विचारही करीत नसत. आता ' पॅग 'च्या प्रयत्नास थोडे यश येऊलागले आहे. सभासद वाढत आहेत. त्यांना नवी जाणीव येत आहे. आपण एकत्र येऊन आपल्या कलेच्या व स्वतःच्या विकासासाठी, उन्नतीसाठी संघटित व्हावे ही भावना निर्माण होते आहे. यामध्ये अर्थातच बुजणारी, बुजवणारी मंडळी बाहेरून गंमत पाहत आहेत. असोत बिचारी ! त्यांना कळकळून सांगणे एवढेच की, आमच्यांत या. आम्हांला समजावून घ्या. कारण तुम्ही सर्वजण शेवटी ' पॅग 'चे सभासद होणार आहातच. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या रसिकजनांची गर्दी पाहिली म्हणजे खात्री वाटते की, पुण्यातील सर्व चित्रकारांना व रसिकांना एकत्र आणण्याचे ' पॅग 'च स्वप्न हे स्वप्न राहणार नाही निश्चित !

■■

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते


तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये



# वन्ना पार्टी, रंडा कॉफी!

## दादूमिया

मला कम्युनिस्ट्स् व कम्युनॅलिस्ट्स या विजिगीषू लोकांच्यात पहिल्यापासून विशेष रस. त्यांचा उत्कर्ष व विकास कसा होत गेला व जात आहे, ह्याचा नीट डोळस दृष्टीने अभ्यास करणे हा माझा आवडता छंद आहे. माझ्या अनुभवाने आजचे कम्युनिस्ट्स् कम्युनिस्ट नाहीत व कम्युनॅलिस्ट कम्युनॅलिस्टही नाहीत.

केरळवर माझे विशेष प्रेम. आमच्या वॉर्डात केरळच्या डझनभर 'अम्मा' नर्सेस म्हणून काम करीत. त्यांच्यामुळे मी मल्याळी भाषा शिकलो. भाषा आली की, त्या प्रदेशाच्या लोकांवर, वाङमयावर व संस्कृतीवर आपोआप प्रेम बसते. माझ्या प्रॅक्टिसमध्ये माझ्या मल्याळी भाषेच्या ज्ञानामुळे केरळच्या लोकांचा भरणा आपोआप वाढला. त्या लोकांशी जसजशी माझी दोस्ती होत गेली, तसतसा एक प्रश्न मला जास्तजास्त सतावू लागला. तो प्रश्न असा ' हे मल्याळी लोक एवढे साधे, एवढे सुशिक्षित व एवढे सुसंस्कृत. शिवाय मोठे धार्मिक. संस्कृतीचे अभिमानी. पण ते कम्युनिस्ट कसे झाले ? '

माझा कम्युनिझम्‌मधील रस पाहून पंडितजी मागे एकदा मुलाखतीत म्हणाले होते, " अमुक एक व्यक्ती कम्युनिस्ट आहे हे तू मला सांगू नकोस. पण ती व्यक्ती कम्युनिस्ट का झाली आहे, ते मात्र मला जरूर सांग. " पंडितजींच्या ह्या मंत्राने मला एक नवीन दृष्टी आली होती. अमुक व्यक्ती अशी का वागते, हे आता मी ह्या नव्या दृष्टीमुळे सांगू शकतो. माणसाचे मनोविकार जाणण्याची शक्ती आपल्यात आली की, त्याची भीती नष्ट होते, उलट प्रीती निर्माण होते. अर्थात् हे संशोधन धाष्टर्याचे असते. एकदा माझी संपूर्ण बडबड दुसऱ्या खोलीत टेप होत होती ! मला ते ज्ञान दुसऱ्या दिवशी झाले ! !

'माणूस'च्या वाचकांना दा दूमिया परिचयाचे आहेत. त्यांचा 'रसगुल्ले आणि बॉम्ब्स' हा बंगालवरील लेख बहुतेकांच्या स्मरणात असेलच. त्याच थाटात त्यांनी सांगितलेली ही केरळ कथा.

प्रवासात मी नेहमीच नशिबवान ठरलो आहे. काही चांगली माणसे माझ्याकडे चालत येतात. मुंबई ते त्रिवेंद्रम या विमान प्रवासात एक गोरा माझा सहप्रवासी होता. बऱ्याच वादावादीनंतर कळले की तो पोलीश इन्फर्मेशन ब्युरोचा डायरेक्टर होता. त्याला माझे बरेच मुद्दे पटले म्हणून की काय, त्याने दुसऱ्या दिवशी मला त्रिवेंद्रमच्या मुख्य हॉटेलात चहासाठी बोलाविले. त्याच्यामुळे तेथील कम्युनिस्ट पुढाऱ्यांची ओळख झाली व केरळचे राजकीय अंतरंग जाणून घेण्यास विशेष कष्ट पडले नाहीत. नबुद्रीपादांबरोबर 'मोपलास्थान' या विषयावर चर्चा करण्याचे भाग्य मिळणे याला नशीब नाही तर दुसरे काय म्हणावयाचे ?

केरळात कम्युनिझमविषयी बिलकुल भीती कशी नाही, याचे मला आश्चर्य वाटे. त्याची मोठी गंमतीदार कथा मी केरळात ऐकली. त्रावणकोर संस्थानाचे सुप्रसिद्ध दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर स्त्रियांच्या बाबतीत जरा 'हे' होते. त्यांचे लक्ष विशेषत: तरुण सुंदर स्त्रियांकडे असे. अशा स्त्रियांचे नवरे त्यांच्या अमदानीत 'कम्युनिस्ट' ठरविले जात व त्यांची रवानगी राष्ट्रद्रोही (का एय्यरद्रोही ?) म्हणून तुरुंगात होई. साहजिकच त्यांच्या अमदानीत अशा कम्युनिस्टांची संख्या फार वाढू लागली. इतकी की कम्युनिस्ट याचा केरळमध्ये थोडासा विनोदी अर्थ लावला जाऊ लागला : सुंदर स्त्रीचा नवरा तो कम्युनिस्ट. मला थट्टेने सांगण्यात आले, "केरळात कम्युनिझम् ही economic ideology नव्हती it was a domestic issue !"

१९५६ नंतर त्रावणकोर संस्थान केरळात विलीन झाले. साहजिकच जुना कम्युनिस्ट 'अर्थ' त्याबरोबरच संपुष्टात आला. केरळ कमुनिस्ट झाले त्याचे श्रेय



**' सुंदर स्त्रीचा नवरा म्हणजे कम्युनिस्ट '**

अर्थातच काँग्रेस पक्षाच्या व समाजवादी पक्ष्याच्या नालायक, ढोंगी व स्वार्थी अमलास आहे हे सांगणे नलगे. कम्युनिस्टांचे आजचे सारेच्या सारे पुढारी एके काळचे जुने काँग्रेसी पुढारी होते. मोतीलाल नेहरूंनी आनंदभुवन काँग्रेसला देऊन टाकले (आज ती इंदिरा गांधींची प्रायव्हेट प्रॉपर्टी आहे–इती डॉक्टर लोहिया !) असे कौतुक आपण ऐकतो. त्यापेक्षा किती तरी पटीने नंबुद्रीपादांनी काँग्रेससाठी त्याग केला होता. केरळची कम्युनिस्ट पार्टी जुन्या केरळ काँग्रेसचा डावा हिस्सा होय. हा मामला इतर प्रांतात दिसून येत नाही. उदाहरणार्थ, डांगे वा रणदिवे पहिल्यापासून कम्युनिस्टच होते. नंबुद्रीपाद व त्यांचे साथी इतर काँग्रेसी सहकाऱ्यांना साहजिकच चांगले ओळखून आहेत ! कदाचित् म्हणूनच भारतात प्रथम सत्तेवर येण्याचा मान (?) केरळच्या कम्युनिस्ट पक्षाकडे जातो.

कम्युनिस्टांच्या मतप्रणालीचे आकर्षण दक्षिणेत आजचे नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कम्युनिस्टांनी काँग्रेस पक्षात शिरकाव करून घेतला व पक्षातील साऱ्या अधिकाराच्या जागा फटाफट ताब्यात घेतल्या. (हिंदु महासभेस हे तंत्र का जमले नाही ?) ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन व ऑल इंडिया किसान सभा पाहता पाहता त्यांच्या ताब्यात गेली. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचीही तीच दशा ! हे तंत्र विशेषतः तीन प्रांतांत जास्तीत जास्त यशस्वी ठरले. ते प्रांत म्हणजे तामीळनाडू, आंध्र व केरळ. कम्युनिस्टांना प्रवेश देण्याचे पुण्यकर्म कोणी केले ? त्रस्त समंध ऊर्फ समाजवादी महात्मा जयप्रकाश नारायण यांनी. मिनूमसानी आज 'स्वतंत्र' असले तरी त्या वेळेस समाजवादी होते. त्यांनी कम्युनिस्ट कावा उघडकीस आणला. कम्युनिस्टांचे एक गुप्त पत्रकच त्यांनी 'Expose' केले. १९४० साली सारे कम्युनिस्टस काँग्रेसमधून वेचून वेचून बाहेर फेकले गेले. १९४१ साली जर्मनीने रशियावर हल्ला चढविला. साऱ्या भाईंचे मत एका सेकंदात बदलले.

१९४२ च्या 'पीपल्स एज'मध्ये रणदिव्यांनी पाकिस्तान 'झालेच पाहिजे,' असा प्रचार सुरू केला. काँग्रेसशी दुष्मनी व मुस्लीम लीगशी सोयरीक हा नवा मार्ग कम्युनिस्टांनी पत्करला. सारे मोपले मुस्लीम लीगचे पाईक. जिनामियांचा घोडा विनमध्ये होता. त्यांना सक्रिय पाठिंबा दक्षिणेत फक्त दोघांचा-मुसलमान व 'जय मॉस्को' म्हणणारे स्टॅलिनचे अनौरस दाक्षिणात्य पुत्र. मात्र १९४७ पर्यंत स्वातंत्र्याच्या चळवळीचा असा काही जोर होता की, काँग्रेस पक्षास सारी बहुसंख्य मते पडत असत. साऱ्या युनियन्समध्ये व सर्वच बाजूंनी साम्यवाद्यांचा पराभव होत होता. धार्मिक दंगे, आझाद हिंद फौजेची सरशी व पराभव, नाविकांचा प्रक्षोभ, जातीयतेतून जन्म घेणाऱ्या कत्तली—या मार्क्सच्या आर्थिक तत्त्वज्ञानात कुठे बसतच नव्हत्या. बिचारा मार्क्स भारतात जन्मला नव्हता. साम्यवाद्यांना तोंड उघडायला जागा नव्हती व संधीही. रणदिव्यांना १९४८ मध्ये तेलंगण्यात अशी संधी मिळाली, पण सरदार पटेलांनी परशुरामाच्या उत्साहात दक्षिणेकडील पृथ्वी निःकम्युनिस्ट करून सोडली. १९५० पर्यंत सी. पी. आय. ची सभासदसंख्या १९४८ साली ९०,००० होती ती १९५१ मध्ये २०,००० झाली. आणि AITUC ची संख्या ७,००,००० पासून १,००,००० वर खाली घसरली.

रणदिव्यांचे लगेच Devaluation झाले. आंध्र प्रदेशाचे राजेश्वर राव चढले व रणदिवे-पंत गेले. १९५१ च्या जूनमध्ये कम्युनिस्टांनीसुद्धा 'सत्य व अहिंसा' हेच आपले धोरण आहे, असा नवा पवित्रा जाहीर केला. रणदिव्यांचा माओ-त्से-तुंग होण्याचा चान्स १९४८–४९ मध्ये गेला. पाकिस्तानचा द्वि-राष्ट्रवाद तर साम्यवाद्यांचा भारत हा अनेक राष्ट्रांचा समूह आहे हा सिद्धांत पहिल्यापासून प्रसिद्ध होता. पटेल असेस्तोवर भारत एक आहे हा काँग्रेसचा सिद्धांत होता. त्यामुळे साम्यवाद्यांना तोंड उघडायला संधीच नव्हती. ते गेल्यावर कम्युनिस्टांनी नेहरूंना उचलून धरले व आपला जुना सिद्धांत पुन्हा जोरात मांडण्याच्या तयारीस ते लागले.

ए. एम्. डायकॉव्ह हा कम्युनिस्टांचा भारतीय राजकारणावरील निष्णात तज्ज्ञ समजला जातो. त्याचे त्या वेळचे उद्गार मननीय आहेत. "It is only the Communist Party of India which has put forward the slogan of a consistently democratic solution of the national question, i. e. the right of all nationalities of India to self-determination, including the right of secession and the formation of independent states." आंध्र प्रदेशात रामलु उपवासात मेला त्याचा आनंद कम्युनिस्टांना कोण झाला. त्यांनी ओळखले, आपली संधी आता वाट चालू लागली! त्यांनी याच तत्त्वास उचलून युनायटेड प्रोग्रेसिव्ह ब्लॉक त्या वेळच्या त्रावणकोर–कोचीन संस्थानांत स्थापून चांगलेच यश संपादन केले. एकदा हात चांगले पोळले



दक्षिणेकडील पृथ्वी निःकम्युनिस्ट केली.

असल्यामुळे समाजवादी पक्षाने साम्यवाद्यांशी दक्षिणेत हातमिळवणी केली नाही. नेहरूंचे ' हिंदी–चीनी भाई भाई ' हे गीत चालू होते, त्याच वेळेस दाक्षिणात्य भाईभाईचे ' नेहरू झिंदाबाद ' हे गीत एकीकडे व दुसऱ्या बाजूस ' काँग्रेसको हटाओ ' या घोषणा चालूच होत्या.

कम्युनिस्टस वाटले त्यापेक्षा बिलंदर निघाले. त्यांनी नेहरूंना लोकशाही निवडणुकींच्या कुस्तीत चीत करून मानाची ढाल केरळमध्ये जिंकून घेतली. फक्त पस्तीस टक्के मते खिशात घालून त्यांनी सत्ता काबीज केली ! नेहरू जातीयवादी व सामाजिक समस्यांचे मांडवल करून निवडणुका जिंकतात ना ? मग आपणही त्याच मार्गाने जाऊ या, असा पक्का निर्धार साम्यवाद्यांनी केला. त्यांच्यापाशी आणखी दोन शस्त्रे होती. अहिंसेचा बुरखा घेऊन ते हिंसामय लढा निवडणुकांच्या क्षेत्रात देऊ शकत होते; आणि मुख्य म्हणजे स्थानिक समस्या हाती घेऊन ते लोकांना पेटवू शकत होते, अगदी काँग्रेसच्या विरुद्ध. सत्तेच्या लढाईत सारे गुन्हे माफ असतात हे तत्त्व साम्यवाद्यांनी चांगले उचलले आहे. उगीच मोठाल्या तत्त्वांच्या व राष्ट्रवादी स्वप्नांना तेथे वाव नाही. जनमताचे अचूक मानसशास्त्रीय निदान त्यांनी केलेले आहे आणि जनता भोळी असते. पेटवाल तशी पेटते. उगीच जनसंघाच्या उमेदवाराने तारा सप्रे यांच्याविरुद्ध मार खाल्ला का ? पण हे मानसशास्त्र समजले पाहिजे ना ? साम्यवादी म्हणतात, जो ना समझे वो अनाडी. लक्षात ठेवा, कम्युनिस्टस बिलकुल अनाडी नाहीत.

अमेरिकन असो, रशियन असो का ब्रिटिश असो, ह्या परदेशी लोकांचा अभ्यास शास्त्रशुद्ध असतो. स्वतंत्र व साम्यवादी लोकांना या शास्त्रशुद्ध अभ्यासाचा फायदा मिळतो. काँग्रेसला या बाबतीत जुना अनुभव आहे. लीग 'खतरे में है!' या घोषणेवर बाजी मारून जाते. समाजवादी पक्ष व जनसंघ ? एक पक्ष अनुभवाने शिकत आहे, दुसऱ्याची तबियत अनुभवाने खालावत आहे. केरळात व बंगालमध्ये निवडणुका परदेशी मदतीवर–आर्थिक, तांत्रिक व मनुष्यबळ–जिंकल्या जातात हे चिरंतन सत्य आहे.

नेहरू जिवंत असताना कम्युनिस्टांनी १९५७ ची निवडणूक केरळमध्ये कशी जिंकली हे पाहणे सर्वांत महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एका दशकातच काँग्रेस या प्रांतात एकदम अप्रिय झाली का ? उत्तर त्रिवार 'नाही' असे आहे. मग हा चमत्कार कलियुगात कसा घडला ? याचे उत्तर जर समजले तर केरळात कम्युनिस्ट नेहमीच सत्तेवर राहतील का, या प्रश्नाचे कोडे आपोआप उलगडेल.

"कम्युनिस्टांचे राष्ट्रवादी बनण्याचे तंत्र अभ्यास करण्यासारखे आहे," मला त्रिवेंद्रममधील एक मल्याळी पत्रकार सांगत होते. ते केरळातील 'इंडियन एक्स्प्रेस'चे तेथील काम बघतात. "काँग्रेसविरोधी वातावरण त्यांनी त्या वेळेस मल्याळी राष्ट्रवाद whip up करून निर्माण केले. 'केरळ झालाच पाहिजे,' या घोषणेत मोठी जादू होती बघा. एक काळ काँग्रेसने एकभाषीय प्रांतांची मागणी केली होती. त्यामुळे कम्युनिस्ट पार्टी केरळ, आंध्र, बंगाल किंवा महाराष्ट्र येथे राष्ट्रीय पक्ष म्हणून समजला जाऊ लागली." खुद्द नंबुद्रीपादांचे म्हणणे तेच आहे : "येथे समाजवादी चळवळ तर पूर्वीपासून आहे. परंतु कम्युनिस्ट पार्टीस ऑल-केरळा राजकीय अस्तित्व व पुढारीपण स्वतंत्र केरळा चळवळीमुळे प्राप्त झाले." याचा अर्थ, तुमच्या यशप्राप्तीसाठी तुम्हांला चांगल्या चळवळीची निवड करावी लागते !

१९५१ मध्ये कम्युनिस्ट पार्टीने पुढील मागण्या आपल्या निवडणुकांच्या जाहीरपत्रकांत मांडल्या : १. मद्रास प्रांतापासून मलबार प्रांत स्वतंत्र करावा, कारण तेथे मल्याळी भाषा बोलली जाते. २. त्रावणकोर-कोचीन येथील राजेशाही नष्ट करावी. ३. केरळ राज्याच्या सीमा निश्चित् कराव्या. ४. चहा, रबर व मिरी यांच्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा केरळ सरकारास मिळावा. ५. केरळ युनिव्हर्सिटी, मल्याळी विश्वकोष व मल्याळी रेडिओ केंद्राची स्थापना. ६. या साऱ्यांसाठी कम्युनिस्ट पक्षास लोकांनी लोकपक्ष म्हणून निवडणुकीत मते द्यावीत. केरळ कम्युनिस्ट पार्टीने आपल्या पक्षात मोठमोठे साहित्यिक व नट आणले. सुशिक्षित मतदारांवर साहित्यिकांचा व सामान्य माणसावर नटांचा किती प्रभाव असतो हे काय वर्णावे म्या पामराने ?

१९५२ साली नंबुद्रीपादांनी 'The National Question in Kerala' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात केरळातील मल्याळी लोकांची अस्मिता जागृत करण्यात

आली आहे. हेच कार्य महाराष्ट्रात गो. नी. दांडेकर, अत्रे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे वगैरे मंडळींनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी केले होते. प्रादेशिक संस्कृती ही इतरांपेक्षा निराळी आहे, ती इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे, दिल्लीने आमच्या संस्कृतीची गळचेपी चालविली आहे, आमच्यासारखे त्यागी व विरागी वीर आणि उत्तुंग व उच्च दर्जाचे साहित्यिक व कलाकार इतरत्र नाहीत–महाराष्ट्रात त्या वेळेस जो मसाला मराठी लोकांना खाद्य म्हणून पुरविला गेला त्याच वेळेस त्याच सुरात व त्याच ठेक्यात केरळात हीच सारी विधाने, ह्या साऱ्या घोषणा ऐकू येत होत्या.

सोव्हिएट युनियनची ' ग्रँड् स्ट्रॅटेजी ' मी जी म्हणतो ती हीच ! फक्त ब्रिटिश साहेबाला दोष द्यायला नको. त्या कुप्रसिद्ध ' झोडा व राज्य करा ' या धोरणासाठी. ' महाराष्ट्राची अस्मिता ' या सुप्रसिद्ध लेखावर मी एके काळी बेहद्द खूष होतो. केरळची अस्मिता, तामीळनाडूची अस्मिता, आंध्राची अस्मिता हे सारे प्रादेशिक साहित्य त्याच जोषात, त्याच काळात या ठिकाणी प्रसिद्ध झालेले जेव्हा मी ऐकले व वाचले त्या वेळेस माझ्या मनात आले :' ज्या वेळेस आम्ही आमच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेसाठी, देशाच्या एकतेसाठी, आर्थिक समृद्धीसाठी, कष्ट करावयास कमरा कसावयास पाहिजे होत्या त्या वेळेस ही प्रादेशिक अस्मितेची कोण बेवकुफी आम्ही चालविली होती ? लेकिन अभी क्या ? खैर, छोड दो !"

एक विष उतरविण्यासाठी आमच्या शास्त्रात दुसरे विष देतात. १९५६ साली नंबुद्रीमहाराज मुख्य मंत्री झाले. प्रादेशिकवादाचा तो महान् विजय होता. पण त्यावर कडी केली काँग्रेसच्या धुरंधर मुत्सद्यांनी. प्रादेशिकवादावर त्यांनी जातीयवादाचे इंजेक्शन दिले. काँग्रेस कम्युनिस्टांना हटवू शकली खरी पण, प्रादेशिकवाद, प्रादेशिक भाषावाद व जातीयवाद यांची भुते मात्र जास्तच धिंगाणा घालू लागली. "आपसे हम भी कुछ कम नहीं हैं ।" हे दाखविण्यासाठी गेल्या निवडणुकीत कम्युनिस्टांनी आपली सारी शक्ती (' इभ्रत ' म्हणत नाही कारण ती केरळात कोणासच नाही !) पणास लावून काँग्रेसची पाठ जमिनीस टेकवली.

इतरांस ' जातीयवादी ' म्हणत म्हणत स्वतः जास्तीत जास्त जातीयवादी राजकारण खेळण्याचे काँग्रेसचे तंत्र कौतुकास्पद आहे. तेथे कम्युनिस्टांचे परदेशी तज्ज्ञदेखील धाईस आले. देशी बिमारीवर पुष्कळ वेळा देशी इलाज जास्त लागू पडतो तो असा. दीनदयाळ उपाध्याय किंवा डॉ. लोहिया जे साफ पडले ते याच तंत्राच्या ज्ञानाच्या अभावी. आज कम्युनिस्टांनी ह्या तंत्राचा खास अभ्यास खास परदेशी तज्ज्ञाच्या शास्त्रशुद्ध पद्धतीने केला आहे हे नमूद केले पाहिजे. केरळचा जातीयवाद एक खास चीज आहे.

केरळमध्ये आर्थिक विषमता जरूर आहे. त्यापेक्षाही तेथील सामाजिक विषमता जास्त चिंतनीय व क्रूर आहे. कारण गरिबी केरळमध्ये प्राचीन कालापासून चालत आली आहे. त्याउलट इस्लाम व ख्रिस्ती धर्मांच्या आगमनाने सामाजिक विषमतेच्या



**आमच्यासारखे साहित्यिक इतरत्र नाहीत.**

विरुद्ध लोकांत जागृती उत्पन्न झाली आहे. केरळात अस्पृश्यता कल्पना करवणार नाही इतकी होती. अस्पृश्यास हमरस्त्यावर चालण्यास कायद्याने बंदी होती. त्याची सावली स्पृश्य हिंदूवर पडली तर स्पृश्य हिंदू दोनदा स्नान करी व अस्पृश्य चार वेळा ! हाच अस्पृश्य मुसलमान वा ख्रिस्ती झाला की स्पृश्य हिंदूच्या घरात पुढील दरवाजाने त्यास प्रवेश मिळू शकत असे. नाहीतर फक्त मागच्याच. मी अस्पृश्य असतो तर नक्कीच ख्रिस्ती झालो असतो ! मुसलमान होण्यापेक्षा ख्रिस्ती होण्यात नोकरी मिळण्याचा फायदा ब्रिटिशांच्या काळी ( व आज थोडाथोडा ) होता ! अस्पृश्य घरात जन्म घेणे हे आपल्या हाती नसते ना ? तरीही उच्च वर्णीय हिंदूंनी या अस्पृश्यांना गेली हजार वर्षे छळून छळून काढले. एका सिरीयन ख्रिस्ती प्रोफेसराचे शब्द अजून माझ्या कानी घुमत आहेत. तो म्हणाला, " आज मी येथील प्रसिद्ध कॉलेजात इंग्रजी विभागाचा मुख्य आहे. खरंच, ख्रिस्तानं आम्हा अस्पृश्यांना इभ्रत दिली ! "

या अस्पृश्यांवर पहिली प्रकट सहानुभूती कोणी दाखविली ? दोन नंबुद्री ब्राह्मणांनी. पहिला ब्राह्मण थोर शंकराचार्य म्हणून अमर झाला. दुसरा आज मुख्य मंत्री आहे. या अस्पृश्य एझवांना नंबुद्रीपादांनी १९५२ सालपासून कॉंग्रेस पक्षातून पळविले आहे. आपल्याकडे जसे सामान्यांतून संत निर्माण झाले त्याप्रमाणे केरळात एझवा वर्गाने कवी व संत निर्माण केले आहेत. केरळात राष्ट्रवादाची ललकारी याच कवींनी जाहीर पुकारली व ब्रिटिशांना हादरवून टाकिले. केरळच्या लोकसंख्येत यांची बहु-

संख्याक म्हणून गणना होईल. अस्पृश्यांत एझवा हे जरा जास्त सुधारलेले— आपल्याकडे महार असतात ना, त्याप्रमाणे. सामाजिक विषमतेविरुद्ध झगडा जेव्हा जेव्हा उत्पन्न झाला तेव्हा तेव्हा हे एझवा कम्युनिस्टांशी संपूर्णपणे सहकार देण्यासाठी पुढे आले आहेत. आज कम्युनिस्टांची सारी मदार या एझवा व नायर या बहुसंख्य मतदारांवर अवलंबून आहे.

नायर म्हणजे आपल्याकडील मराठे लोक. जन्मजात क्षत्रिय, पण आज नांगर हाती धरणारे. ब्राह्मणांच्या खालोखाल यांना मान आज आहे. पण वृत्तीने संकुचित, स्वार्थी व अस्सल जातीयवादी. आपल्याकडे मराठा नाही का श्याहाण्णव कुळी व खालचा असे वर्गीकरण करीत ? महारास दूर ठेवून त्यास रोटीबेटी व्यवहार नाकारीत ? बस्स्, त्याचाच पण जास्त शिकलेला बंधू म्हणजे नायर. आज जगात एकही खंड असा शिल्लक नाही की, जेथे नायर नर्स, स्टेनो किंवा कारकून म्हणून नोकरीस चिकटलेला नाही. नायरांत बंधुभाव फार. एक नायर आत आला की, मालक सोडून थोड्या वर्षांत सारे नायर झालेच समजा ! नारायण गुरू हे नायरांचे सर्वस्व. ह्यांनी नायर लोकांना स्फूर्ती दिली, शिक्षण दिले, संघटनेचा मंत्र दिला, शेतीविषयी आस्था निर्माण केली व नायरांना श्रीमंत बनविले. मला या नायर वर्गाविषयी फार प्रेम वाटते. कारण श्रीमंतीबरोबर नायरांना देवाने रूप, बुद्धी व सौजन्य दिले आहे. हे का, असे मी सारखे विचारत होतो. चटकन् मला कोणी उत्तर सांगेना. तुम्हाला आपोआप कळेल असे जो तो म्हणे.

जेव्हा कारण कळले तेव्हा आश्चर्याचा धक्का बसला. पूर्वी नंबुद्री ब्राह्मणाच्या घरी फक्त मोठ्या मुलासच नंबुद्र्याची पोरगी बायको म्हणून मिळे. बाकीच्या सर्व भावांना नायर बायका. तेव्हा 'दो, तीन या बस्स्' हा प्रकार नव्हता. त्यामुळे साऱ्या नायर लोकांत शंकराचार्यांच्या वंशजांचे अस्सल रक्त खेळत आहे. हा प्रकार महाराष्ट्रात असता तर किती बरे झाले असते, असे मला शंकरराव मोऱ्यांना सांगण्याचा फार मोह होत आहे. अरेरे, ते आज हयात नाहीत. महाराष्ट्रातील जातीयवाद नष्ट करण्याची ही दवा त्यांना खचित आवडली असती !



नायर बायको

केरळच्या राजकारणात दुसरे महत्त्वाचे मतदार म्हणजे ख्रिस्ती व मुसलमान. दोघेही आत्यंतिक व धर्मलंड. दोघेही अल्पसंख्याक व

म्हणून दिल्लीचे लाडके. येथील ख्रिस्ती हे इ. स. बावन्न सालापासूनचे जुने आहेत. अर्धे रोमन कॅथॉलिक व अर्धे सिरियन. एकाची निष्ठा रोमपाशी, दुसऱ्याची सिरिया-मधील चर्चपाशी. दोघेही धनाढ्य व परदेशी पैशांवर अवलंबून राहणारे. हे सिरियन ख्रिस्ती, पंचवीस लाखाच्या आसपास आहेत. रोमन कॅथॉलिक खालचे लोक बाटून ख्रिस्ती बनलेले. सिरियन जरा उच्च वर्णीय. अस्सल म्हणून जास्त अभिमानी. केरळचे राजकारण व अर्थकारण आज या सिरियन ख्रिस्त्यांच्या तिजोरीत अडकलेले आहे. त्यांच्या पुष्कळशा चालीरिती आपल्यासारख्या आहेत! लग्नाचा सारा सोहळा मराठी ब्राह्मणाच्या लग्नसमारंभाप्रमाणे!" We were once Nambudris," असे तेथील एका तरुण इंजिनीअरने मला मोठ्या अभिमानाने सांगितले. त्याचे पिताश्री भारतातील भूगोल विषयावरचे श्रेष्ठ तज्ज्ञ समजले जातात. रोमन कॅथॉलिकांप्रमाणे हे सिरियन ऊर्फ सेंट थॉमस ख्रिस्ती एवढे आंधळे वाटले नाहीत. सारे एकजात शिकलेले. त्यामुळे दृष्टिकोण शास्त्रीय. एका पाद्रयाने मला, "God is the greatest tranquillizer" असे चक्क सुनावले! मी खवचटपणे, "But which God? Christian or Hindu?" असे विचारताच तो म्हणाला, "Depends on who looks at him!"

केरळात ख्रिस्ती २१ टक्के आहेत. मुसलमान फक्त १८ टक्के आहेत. ख्रिस्त्यां-पेक्षा मुसलमान अडमुठ्ठे, अशिक्षित, अपरिपक्व व आळशी आहेत. असे लोक श्रीमंत कोठून असणार? मात्र ते भरपूर व्यवहारवादी आहेत. मुस्लीम लीगचे ते सारेच्या सारे भगत आहेत. पूर्वी त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी काँग्रेसशी सोयरीक केली होती. आज त्यांचा शैय्यासोबत करणारा कम्युनिस्ट पक्ष आहे. मुस्लीम लीग ही एकजात साऱ्यांची लाडकी बीबी का होऊ शकते याचे मला कोडे आहे. दिल्लीचे पन्नास लीगी मुसलमान काँग्रेस सोडून जनसंघात आले त्याचा काय हर्षवायू झाला होता त्या पक्षाच्या साप्ताहिकास! गुरुजींनीच झाडले म्हणून ठीक. नाहीतर–

लाडकी बीबी जास्तीत जास्त फायदे कसे उपटायचे ते चांगले जाणते. 'मोपला-स्तान' देणार असाल तर आम्ही तुमच्याबरोबर युनायटेड फ्रंटमध्ये येऊ, अशी पहिली बोली त्यांनी करून घेतली. नंबुद्रीमहाराजांनाही मी ही आठवण करून देतांच ते माझ्यावर खवळले. "काश्मीरसाठी नाही का तुम्ही प्राण टाकत? सेक्युलर म्हटले की अल्पसंख्याकांना सवलती आल्याच." नव्या मोपलास्तानात ५६ टक्के मुसलमान वस्ती आहे, ती उद्या ८६ टक्के होणारच. नाही झाली तर तो 'पाक' इस्लामला कलंक म्हणावयाचा. मी एका कम्युनिस्ट पत्रकारास म्हणालो, "बेट्या इतिहासापासून एवढे तर शीक!" त्याने थंडपणे उत्तर दिले, "तुला काय वाटते मला कळत नाही का?" त्याने व नंबुद्रीपाद्रास विरोध करणाऱ्या मार्क्सिस्ट कम्युनिस्ट नेत्यांनी मला सुनावले, "डॉक्टरसाहेब, ही खुर्चीची हाव बरं. मुस्लीम लीगचे १५ मध्ये फक्त दोनच मंत्री आहेत. पण मोपलास्तान दिले नाही तर

नंबुद्रीपाद– he will be on street tomorrow ! ”

लाडकी बीबी सध्या का खूष आहे माहीत आहे ? काँग्रेसनेही बीबीस ऑफर देऊ केली आहे, “ प्यारी, मोपलास्तानचाच दागिना पाहिजे आहे ना ? तो आम्ही देऊ. त्यापेक्षाही मौल्यवान. पण आमच्याकडे ये. ” समाजवादी सर्वांत नादान. त्यांच्याही तोंडाला पाणी सुटले आहे. “ आम्हाला चान्स द्याल काय ? ” असा त्यांचा सवाल आहे. उद्या उठून काँग्रेस-समाजवादी-लीग ही युती सत्तेवर आली तर मला नवल वाटणार नाही.

पट्टम थाणू पिल्ले हे तेथील बडे प्रस्थ ! नायर लोकांचे ते शिवाजी. गोरे, उंच, अतिशय बुद्धिवान् व रूपवान्. असली माणसे नेहरू नेहमीच वेचून निवडीत. मी त्यांना संभाषणाच्या ओघात एक प्रश्न–जो मला फार वर्षे मनास वेदना देत होता-विचारला “ पिल्लेसाहेब, नेहरूंनी तुम्हांला गव्हर्नर बनवून विकत घेतले असा प्रवाद आहे. तो खरा का खोटा ?” प्रश्न ऐकून त्यांना संतापापेक्षा खेद जास्त झाला. समाजवादी पुढारी किती नादान व स्वार्थी आहेत त्याचे अनेक किस्से त्यांनी मला सुनावले. ते इथे देता येणे स्थलाअभावी शक्य नाही. पण एक गोष्ट खरी की समाजवादी चळवळ या देशात नादान समाजवादी पुढाऱ्यांनी आपल्या हातांनी नष्ट केली. एके काळचा हा हुकूमशहा मुख्य मंत्री या अव्यवहारी समाजवादी चाळयांना कंटाळला व त्रासून चिडून राज्यपालपद स्वीकारता झाला. स्वतःचा एस. एम. जोशी होण्यापेक्षा राज्यपाल होणे काय वाईट ?

मराठी राजकरणी व केरळचे राजकरणी यांच्यांतील एक मोठा फरक मला जाणवला. मराठी लोक व्यवहारवादी आहोत असे भासवितात. खरे ते जास्त संवेदनाशील व साहित्यिक (कविमने वगैरे भानगडी) होण्याच्या लायकीचे असतात. उत्तम उदाहरण कै. काका गाडगीळांचे. मल्याळी राजकारणी पुरुष इमोशनल, सेंटिमेंटल वगैरे भासवितात, पण खऱ्या अर्थाने व्यवहारी असतात. यास ऐतिहासिक कारण आहे. शंकराचार्यापासून ते ह्या नव्या साम्यवादी नंबुद्रचांयापर्यंत केरळवर सारखे कोणानकोणाचे परकीय वर्चस्व आहे. त्यामुळे स्वधर्म व स्वनिष्ठा टिकविण्यासाठी तेथे व्यवहारवाद (वेस्टर्न सिव्हिलायझेशनमधील जडवाद) शिकविण्यासाठी कोणीनकोणी रामदास सारखा जन्म घेत आहे. इंग्रजांचे राज्य व मुसलमानी अंमल यांच्यामध्येसुद्धा डच व पोर्तुगीज यांचे वर्चस्व झालेच ! त्याचा फायदा एवढा झाला आहे की, लोक राजकीय हक्कांसाठी कमालीचे जागृत आहेत. पुरुषांना वेळ जायला राजकारणासारखा विषय नाही. पण बायका ? त्यांनीही नेहरू-गांधी-जयप्रकाशनारायण-चव्हाणांची मढी उकरून त्यावर चर्चा करावी ? मी माझ्या यजमानांच्या मुलीस शेवटी वैतागून म्हटले, “ तुमच्या येथे साड्यांची व दागिन्यांची दुकाने नाहीत वाटते ?”

राजकारणाची आवड निर्माण होण्यास दुसरी दोन नैसर्गिक कारणे आहेत

केरळात. गरिबी व शिक्षण. आशियात जपाननंतर सुशिक्षित लोकांचे प्रमाण फक्त केरळातच एवढे दिसून येते. गरिबी तर केरळमध्ये पाचवीसच पूजली आहे. पूर्वी त्रिवेंद्रम्‌मध्ये उत्कृष्ट संग्रहालय (म्युझियम) होते. आज काँग्रेस हे दुसरे म्युझियम बनले आहे—श्रीमंत लोकांचे बाकीचे पक्ष गरीब, छेः, दरिद्री. एखादी गरिबाची पण सुंदर मुलगी पाहिली की, कसे खटकते तसेच केरळकडे पाहून वाटते. आमचे केरळ कसे काय आवडले, असे मला तेथील मुख्य मंत्र्यांनी विचारताच मी उत्तर दिले, "तुमचं केरळ अत्यंत सुंदर आहे. ते प्रांत नाही, ती एक सुंदर हिरवी बाग आहे. आणि कमालीची स्वछ बाग आहे. People have very clean habits, even your slums are beautiful." पांढरे शुभ्र कपडे घालायची व रोज दोन-तीन वेळा आंघोळ करण्याची हौस असलेले मल्याळी लोक अतिशय हुशार वाटले मला. एवढे शिक्षणाचे प्रमाण इतरत्र आढळत नाही. त्याचप्रमाणे सुशिक्षित बेकारांचे प्रमाणही भारतात जास्तीत जास्त आढळते ते या प्रांतात. नोकरी नाही म्हणून टाईम पास करण्यासाठी केवळ शिकणाऱ्यांची संख्या लाखांत आहे! केरळात शहर व खेडे हा भेदभाव नाही. सारा प्रांत म्हणजे एक मोठी बाग आहे. पर्वतावरसुद्धा शेती करतात. त्यामुळे शेतीसाठी जागाच शिल्लक नाही. शेती नाही, नोकरी नाही, उद्योगधंदा करण्यासाठी भांडवल नाही, मग करायचे काय? तर शिक्षण व वृत्तपत्रांचे वाचन.

मागे मी बाळ ठाकरे यांच्याकडे मद्रासी बनून गेलो होतो. त्यांनी मुंबईतील मराठी माणसांची समस्या समजावून सांगितली. मी त्यांना इंग्रजीत म्हणालो, "पण आमची समस्या त्याहून विकट आहे. एवढे सुशिक्षित बेकार दर वर्षी तयार होत आहेत. शिक्षण तरी का घ्यायचे? तर केरळात नाही पण इतर प्रांतात नोकरी मिळावी म्हणून. हंड्रेड अँड फिफटी रुपीज् वुईथ माय वोऽन टाईपराऽयटर! मला सांगा, मुंबईत जर यायचे नाही तर जायचे कुठे आम्ही?" बाळ ठाकऱ्यांजवळ फक्त सहानुभूती होती, प्रश्नाचे उत्तर नव्हते. मी थोड्या वेळाने माझे मराठी रूप व मराठी बोली प्रकट केली. असे हसलो आहोत आम्ही दोघे! ठाकरे नंतर म्हणाले, "मला कळतंय् ही फार मोठी समस्या आहे. But that is not my fault."

केरळात आज साडेसात लाख सुशिक्षित बेकार आहेत. पाच-सहा हजार डिग्रीवाले व दहा-पंधरा हजार डिप्लोमावाले इंजिनीयर्स बेकार आहेत. हजाराच्या आसपास डॉक्टर लोक निराश्रित आहेत! त्यांत अर्ध्या लेडी डॉक्टर्स! (गरजूंनी त्रिवेंद्रम येथे जास्त चौकशी करावी.) त्यामुळे पदवीधर ही केरळची सर्वांत मोठी Export commodity आहे. सुमारे पंचवीस-सव्वीस लक्ष मल्याळी लोक आज केरळच्या बाहेर नोकरीधंदा (धंदा नोकरीचाच!) करतात. बाळ ठाकऱ्यांकडे सुमारे साडेतीन लाख, ज्योती बसूंकडे दोन लाख, अण्णा दुराईंच्या वंशजांच्या

उरावर सहा लाख व रावणाच्या लंकेत नऊ लाख हे केरळचे रामभक्त हनुमान आज दिसून येतात. अंदमान म्हणजे सारे मल्याळीच. फार काय, गुजराथ रिफायनरीचे नाव ऐकले आहे ना? पण ती खऱ्या अर्थाने केरळा रिफायनरी आहे! अमेरिकेत व ब्रिटनमध्येही यांचे टाईपरायटर्स आज वेगाने उडताना दिसून येतात. जमिनीप्रमाणे मानवी उत्पादनही अत्यंत सुपीक. भात खाण्याचा हा परिणाम आहे की काय कोण जाणे! पण वृत्तपत्रांच्या खालोखाल सेल आहे कामशास्त्रावरील पुस्तकांचा!

वृत्तपत्रांचे तर वेड आहे या लोकांना. कोणीही उठावे व वर्तमानपत्र काढावे. अक्षरशः प्रत्येक गल्लीचे एक वर्तमानपत्र आहे! वर्तमानपत्रे व नियतकालिके यांची संख्या ४०३ असून ४९ दैनिके व ५४ साप्ताहिके आहेत. कम्युनिस्टांपाशी वृत्तपत्रे चालविण्यासाठी पैसा नाही म्हणून दिवसभर एका जीपवर लावलेल्या भोंग्यातून त्यांचा प्रचार सतत चाललेला असतो. कम्युनिस्ट 'राष्ट्रीय' समजतात स्वतःस. डी. एम. के. प्रमाण फुटून निघायची त्यांच्या तोंडात भाषा नाही. साहजिकच त्यांच्या मुख्य वृत्तपत्राचे नाव 'देशाभिमानी' आहे. ह्या कम्युनिस्टांना महाराष्ट्राप्रमाणे फटाफट पूर्व जर्मनी किंवा झोकोस्लोवाकियामधून रोटरी मशिने का मिळत नाहीत, ते कोण जाणे!

काँग्रेसपाशी पैसा भरपूर होता. साहजिकच सारी महत्त्वाची वृत्तपत्रे आजही त्याच पक्षापाशी आहेत. मातृभूमी, केरळ कौमुदी व मल्याळ मनोरमा ही सुंदर नावे असलेली रसिक पत्रे ख्रिस्ती मिशनऱ्यांची व म्हणून काँग्रेसची आहेत. ती ख्रिस्ती आहेत यास्तव अजून काँग्रेसी म्हणून टिकून आहेत. नाहीतर कम्युनिस्टांनी केव्हाच त्यांचे स्वरूप बदलवून टाकले असते. मुस्लीम लीगचा चाँद येथील सुशिक्षितांत तळपताना दिसून येतो. खरंच, भारताप्रमाणे केरळातही अल्पसंख्याक राहण्याचा फायदा आहेच. काय बिशाद आहे लीगच्या 'चंद्रिका' या वृत्तपत्राच्या कार्यालयास कोणी हात लावायची? साधा मजूरसुद्धा चार-दोन वृत्तपत्रे सहज वाचतो. पदवीधर तर मद्रासचा हिंदू, मुंबईचा टाईम्स व दिल्लीचा स्टेट्स्मन सकाळच्या प्रहरी पुरा करतो, पण निराळ्या कारणांसाठी—कुठे नोकरीसाठी आपण 'वाँटेड्' आहोत का ते पाहण्यासाठी.

राजकारणी कोठलेही असोत, ते सारे एकाच जातीचे, जाड चामडीचे व नफ्फट! एवढी सुशिक्षित जनता, जागृत जनता, तेव्हा राजकर्त्यांनी जपून असावयास पाहिजे का नाही? पण काँग्रेसवाले परवडले एवढे हे कम्युनिस्ट राजकारणी ढोंगी, स्वार्थी व लाचखाऊ आहेत! लाच खाणे आज तेथे officially allowed आहे!! नाही खाल्ली तर तुम्ही डिसमिस् होता—हा स्वतः खात नाही व आम्हांला खाऊ देत नाही म्हणून तो आपोआपच बाहेर फेकला जातो.

लाचलुचपत आज केरळच्या जीवनाचा स्थायीभाव होऊन बसली आहे. मुलांच्या

शिक्षणाचा असाच खेळखंडोबा होऊन बसला आहे. पूर्वी केरळच्या शिक्षणाचा दर्जा भलताच उंच होता. आजचे शिक्षण politics–oriented आहे, knowledge–oriented नाही, अशी सर्वत्र ओरड आहे. परवा ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या पोरांची शेवटच्या वर्षाची परीक्षा झाली. या मुलांना गव्हाचे रोपटे व तांदळाचे रोपटे यांत फरक कळत नव्हता. केरळात गहू कोठे होतो म्हणून मुद्दाम विचारले तर म्हणे गहू हे केरळाचे staple diet आहे! पदवी मिळाल्याशी तुम्हांला कारण आहे ना, ती हमी आम्ही देतो, तुम्ही पोरांनो, आमचे स्वयंसेवक म्हणून काम करा, असे जो तो पक्ष म्हणणार. कसले शिक्षण अन् कसली शिस्त? या विषयावर नंबुद्रीपाद यांच्या मुलाशी माझे बोलणे झाले. तो एम. ए. (अर्थशास्त्र) करीत आहे. बिचारा बापाच्या पक्षीय पापांविरुद्ध किती बोलणार? त्याला म्हटले, "Please don't enter this but, best way, go to the states for higher studies!" रशिया-ऐवज़ी अमेरिकेला जा असे सांगण्यातली माझी खोडी त्याला समजली व त्याने हसून सांगितले, "ज्ञान परीश्रमीकम्!" (I will try)

मल्याळी भाषा मराठीला बरीच जवळ आहे. नंबुद्री-ब्राह्मणांमुळे साऱ्या केरळवर ब्राह्मणी संस्कृतीची छाप आहे. त्रिवेंद्रम् शहर म्हणजे बर्व्यांच्या अमदानीपूर्वीचे जुने पुणे! ब्राह्मणी संस्कृतीच्या, सुसंस्कृततेबरोबर शाब्दिक जंजाळाची खाज, कटकटी स्वभाव, चिकित्सक वृत्ती, 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' ही बेफिकिरी व ज्ञानार्जनासाठी कोठेही व कोणाच्याही हलाखीच्या स्थितीत कष्ट उपसीत बसण्याची जन्मजात हौस हे अवगुणही केरळात भरपूर दिसतात. ब्राह्मण व्यापारी बनला तरी तो नंतर व्यापारी हुन्नरीवर भाषणे ठोकील, त्यावर पुस्तके लिहील! जातीचा बनिया तेवढा वेळ व्यापारावर केंद्रित करून जास्त पैसा कमवील! केरळच्या रक्तात ही बनियेगिरी जवळजवळ नाहीच. व्यापार-उद्योग चेट्टीयार व गुर्जर-मारवाडी लोकांच्या ताब्यात आहे. मल्याळी लोकांनी मराठी लोकांप्रमाणे नोकरी करावी व आर्थिक उन्नतीच्या गप्पा माराव्यात! एक सबंध वर्षभर खपून पगारवाढ किती तर दहा रुपये! पण नोकरदार व्यक्तीस त्यात केवढा अभिमान वाटतो!! रक्तातच हुन्नर नाही त्याला केरळीय माणसाचा दोष काय? नोकरीवाल्यांना भाषणे, चर्चा व आव्हाने द्यायला-घ्यायला भरपूर वेळ असतो. तेथे आर्थिक धोरण नेहमीच तुटीचे! पहिल्या दहाच दिवसांत पुंजीपतीचे devaluation होऊन नोकरीवाला माणूस समाजवादी अगर साम्यवादी बनतो. व्यापारी माणूस कधी साम्यवादी ऐकला आहे? त्याला वेळच मिळत नाही असल्या उलाढाली करायला. तो अर्थात धंद्यात यशस्वी असला पाहिजे. नाहीतर लगेच तो ट्रेड युनियनचा सेक्रेटरी होतो!

केरळच्या कम्युनिझमच्या व्यथेची ही सामाजिक पार्श्वभूमी जर समजावून घेतली तर तेथल्या साम्यवादाचे विशेष कुतूहल अगर भय वाटत नाही. भारतात

खरा साम्यवाद मला अजून पाहावयाचा आहे. आपला साम्यवाद 'रोटी के वास्ते' आहे, त्यात चिनी वा युरोपियन दम नाही. मुकी मेंढरे कोणी हाका—काल कॉंग्रेस धनगर होती, आजचा मेंढपाळ कम्युनिस्ट आहे. म्हणून मी उद्योगमंत्री थॉमस यांना विचारले, "But are you a true Communist?" तेव्हा ते माझ्या-वर भडकले. त्यांनी संतापून मला विचारले, "What do you mean?"

मी त्यांना माझे कम्युनिस्टांचे वर्गीकरण सांगितले : (१) सैद्धांतिक (२) संधिसाधू व (३) आंधळे भगत. थॉमस हे तेथील जुने निष्ठावंत साम्यवादी सम-जले जातात. त्यांना माझे वर्गीकरण व इतर प्रांतांतली खरीखुरी उदाहरणे आवडली. आम्ही नंतर खूप जवळ आलो व खूप गप्पा मारल्या. "आम्ही सत्तेवर येताच तुम्ही म्हणता त्याप्रमाणे संधिसाधू लोक पक्षात खूपच घुसले. त्यांना आज हुसकून काढणे अवघड आहे." मला थॉमस म्हणाले, "आमचे नाव बदनाम करण्यासाठी विरोधकांना त्यांचा चांगला उपयोग होणार आहे नजीकच्या भविष्यात." थॉमस यांचे म्हणणे अगदी खरे आहे. ते जपानला गेले होते. जपानी पद्धतीवर केरळात छोटे उद्योगधंदे सुरू करावे यासाठी त्यांनी बऱ्याच योजना मांडल्या. पण त्यांचे ऐकतो कोण? जो तो शॉर्ट टर्म योजनांच्या मागे आहे. "आज पेरा व उद्या उगवलं पाहिजे. देशबिश हम कुछ जानते नहीं हैं. आम्ही आमचे फक्त मतदार जाणतो." या संधिसाधू राजकारण्यांचे हे तत्त्वज्ञान आज नंबुद्रीपाद यांना चांगलेच भोवते आहे. कसला विकास, कसलच्या योजना आणि कसली तत्त्वनिष्ठा? साम्य-वादही लोकशाहीत degenerate कसा होतो त्याचे केरळ हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

लोकशाहीच्या निवडणुकीच्या आखाड्यात उतरले की, प्रत्येक पावलागणिक पैसे पेरावे लागतात. संधिसाधू राजकारणी पक्का व्यवहारवादी असतो. एक रुपया invest केला की शंभर रुपये परत आले पाहिजेत, हा त्याचा साधा हिशेब. त्यांत छपवाछपवी नाही, शुद्ध व्यापार. नंबुद्रीपाद किंवा थॉमस (किंवा त्यांचे रशियन वा चिनी 'बाप') या संधिसाधू लोकांच्या हातात असतात. सिद्धांतांवर का कधी निवडणुकी लढविल्या जात असतात? तेथे पाहिजे जातीचेच! बॅ. नाथ पै किंवा गोरे–जोशी यांच्यासारखे 'शांत व सोज्वळ" पुढारी मागे पडतात याचे कारण हेच. दलालाशिवाय व्यापारात यश नाही आणि दलाल सात्त्विक व शुद्ध चारित्र्याचा असावा, अशी अपेक्षा करणे भाबडेपणाचे नाही का?

आज कम्युनिस्ट पक्षाच्या नावाखाली केरळात सरळ सरळ लाच घेतली जाते. नंबुद्रीपाद त्यापैकी एक पैसाही उचलीत नाहीत हे खरे. पण त्यांचे लेफ्टनंट्स् लक्षा-धिपती होत आहेत त्याचे काय? पोलिस व्हायचे आहे, टाक पन्नास रुपये. बस कंडक्टरच्या नोकरीसाठी तोच भाव. मास्तर, प्रोफेसर यांचा भाव तीनशे रुपये. इन्स्पेक्टर, हेड् ऑफ दि डिपार्टमेंट वगैरेसाठी हजार दीडहजारांची दक्षिणा. सारांश

[ पान ६९ पाहा

# थडग्याजवळची लिली

उल्हास लुकतुके

कबरस्तानासारखे शांत कोर्ट. संगमरवरी थडग्यासारखे न्यायाधीश. गुळगुळीत आणि थंड. इकडे तिकडे झाडझाडोरा माजावा तशी गर्दी. जिवंत असून उदास. आजूबाजूच्या निरर्थक उदासतेला हसणारे एखादेच लिलीचे फूल. पांढरं शुभ्र. आरोपीच्या पिंजऱ्यात प्रशादजी. पांढऱ्या स्वच्छ कपड्यांत. निर्भय. प्रसन्न. हसरा. थडग्याजवळ असून हसरा.

शपथविधी.

" नाव ?"

" मनुष्यदत्त. "

कारकुनाने लिहून घेतले. बारीकसे जिवाणू पाल्यात सळसळावे तशी गर्दीत हशाची सळसळ.

" वडिलांचं नाव ! "

" मनुष्यदत्त. "

पुन्हा सळसळ.

" नीट उत्तरं द्या. आडनाव ?"

" मनुष्यदत्त "

गर्दीच्या मनाला चरका. प्रशादजी हे काय करतोय ? पण लिली निर्भय आणि हसरी. थडग्याजवळ असून हसरी.

" खरं नाव सांगा. "

" झूठ, थोडेही बोल रहा हूँ न्यायदेवता ? सौगंध खायी है. न्यायदेवताके सामने. क्या मैं और आप मनुष्यदत्त नहीं हैं ?"

" नाव काय ?" आवाजात जरब.

" अगर मनुष्यताका विभाजन और नामकरण करने पर तुलेही हो न्यायदेवता तो लीजिये, प्रशाद कैलाश दुवेदी. "

" काय करता ? "

" संघर्ष. सतत संघर्ष. विषमता से सतत संघर्ष." उंचावलेली मान. फुगलेली छाती. लिलीच्याऐवजी डेलियासारखा फुललेला चेहरा.

" कोर्टाची बेअदबी केल्याचा खटला होईल. धंदा काय करता. ?"

" पैदाईशसे बेकार." हशा. चेहऱ्याचा डेलिया.

" ऑर्डर. ऑर्डर. "

आरोप—संपात गाडी अडवल्याचा.

" गुन्हा कबूल ?"

" कबूल भी और नाकबूल भी. "

" ? "

" गाडी तो जरूर रोकी थी न्यायदेवता, लेकिन क्या अन्याय के खिलाफ आवाज उठाना गुनाह है ?"

सजा. सश्रम कारावास. स्मशानात शांतता. झाडझाडोरा उसासला. थडगे निथून गेले. काळा झगा सावरत. काळा रंग सुतकाचा रंग. थडग्याजवळ राहून लिली हसत होती.

पूर्वी एकदा झोपडपट्टीची पाहणी करायला गेलो होतो. 'चक्र'च्या पलीकडे झोपडपट्टी पाहिली नव्हती. 'अजगर'च्या बाहेर विकृती अनुभवली नव्हती. जिमखान्याबाहेर पुणे माहीत नव्हते. उत्सुकतेने आत गेलो. पहिल्याच बोळीचे तोंड रेड्याने अडवले होते. पोरेठोरे गंमत पाहायला जमा झाली होती. बकालपणाची पहिली सलामी तर ठीक मिळाली. पुढे सगळी वाट—वाट कसली ? झोपड्यांच्या मधली जागा—घाणीनं भरलेली. मुडदुशी पोरे. झिंगत लोळणारे दारुडे. वा. वा. छान. वाचलेल्याची पावती मिळायला लागली तसे मन सुपाएवढे होऊ लागले. फोडासारख्या उगवलेल्या झोपड्या. पुवासारखे वाहणारे पाणी. जगण्याला कोडासारखी घट्ट चिकटून बसलेली माणसे. जीव गलबलला.

" काय आजोबा, कसे काय राहता इथे ?" ब्राह्मणी मराठीचा अभिजात आविष्कार.

" भडव्यांनु कश्याला यता हितं मराया. जावा नं आपापल्या म्हालात गुमान." अर्धांगानं लोळवलेल्या तोंडातून आवाजाचं गांडूळ. जखमेत घोंघावणाऱ्या माशा मारण्याची लुळी धडपड. तोंडात मारल्यासारखे पुढे निघालो.

मोडक्या थेटरात मांडलेल्या झोपड्यांना फरशी होती. शिरिमंतांच्या झोपड्या त्या. हाडकुळ्या कुत्रीला पिलं लुचत होती. जवळ गेलो तर बसकन् अंगावर आली. शेराचे झाड ओलांडून आत आलो. शेराच्या आडोशाला एक बाई पोर पाजीत बसली होती.

" तमाशा पघायलाशानी आला असताल न्हवं का ? लई मज्जा वाटूनशानी

राह्यली असल न्हाय का ? रांडिच्यांनु ह्ये बगा. ह्ये बगा." म्हणून किंचाळत तिने पदराचे चिठोरं भिरकावलं. उघडचा छातीवर तडातड हात मारत किंचाळली, "फुकटात मज्जा बगा. न्हाय तरी तुमच्या लोगानला उगडचा नागडचा बायका कुटं बगायला भेटनार ? बगता का ? ह्ये बगता का ?" आता ही बाई कमरेचे-देखील भिरकावते का काय, असे वाटायला लागले. आम्ही बुजलो. आजूबाजूचे टारगट तोंडातून हशा मुतले. शेरातून चीक गळत होता. भयंकर कानकोंडे झाले. बरोबर इतर तरुण विद्यार्थिनी. लाजल्यासारखे झाले. काय करावे हे कळेना.

"क्या तमाशा कर रही हो माईजी इन लोगों के सामने ? जाओ अंदर जाओ." शांत पण ठाम आवाज. रिंगमास्तरच्या आवाजासरशी वन्य श्वापद पिंजऱ्यात जावे तशी ती आत गेली. कुतूहलाने मागे पाहिले. पांढरा खादीचा लेंगा, सद्रा, उंच सडसडीत अंगकाठी, रापलेला पण हसरा चेहरा, उलटे व्यवस्थित बसवलेले राखी केस. साधारण चाळीशीचा इसम हसत उभा होता. मागे झोपडचांचे लँडस्केप. गंजलेल्या पत्र्यांचा रंग वेगळा. कुजलेल्या पोत्यांचा रंग वेगळा. वाकलेल्या भिंतीचा भुरकट रंग वेगळा. खूप वेगवेगळचा छटा. पण सगळचा काळवंडलेल्या. झोपडचांचे वेगवेगळे घनाकार, सगळे बुटके खुजट, कोसळते. उभ्या–आडव्या बांबूच्या रेषा. एकमेकांना मिळणाऱ्या, काटणाऱ्या, छाटणाऱ्या. छपराछपरांतून गळणारा धूर. प्रकाशालाही धूसर करणारा. सावल्यांचा धिंगाणा. प्रकाश गुदमरविणारा. सगळीकडे भरून राहिलेला दुर्गंध. अवघे अवकाश व्यापणारा, पोकळी अवगुंठित करणारा. या पार्श्वभूमीवर उभा होता प्रशादजी. ताठ, खणखणीत. खचलेल्या झोपडचा, वाकलेले बांबू. एकच आकृती उभी होती. सगळचा काळवंडलेल्या वातावरणात एकच आकृती पांढरी होती. एकच रेघ सरळ होती. किडकिडीत असून सगळं सगळं लँडस्केप तोलून धरत होती. सगळचा दुर्मुखलेल्या पार्श्वभूमीवर एकच आकृती हसरी होती. थडग्याजवळ राहून लिली हसत होती.

ही प्रशादजीची पहिली ओळख.

एके दिवशी रात्री अचानक प्रशादजी आला. मी दार उघडलं. एकदम हातात हात घेऊन म्हणाला, "शायद फिर कभी नहीं मिलूंगा" अन् नाहीसा झाला.

मी बेचैन झालो. सकाळी झोपडपट्टीकडे चौकशीसाठी निघालो. झोपडपट्टीच्या तोंडाशी थेटराच्या कट्ट्यावर चट्टेपट्टे फाटके कपडे घालून टोळकं बसलं होतं. नटीच्या पोस्टरवर पचापचा थुंकत होतं. थांबून विचारले, "प्रशादजी कुठे आहे ?"

"त्यो म्येला," हशाचा खदखदाट. माझ्या काळजाचे पाणी.

"काय झालं नीट सांगा. मेला म्हणजे काय ?"

"म्येला न्हाय तर मरू घातलाय. समदं येकच !"

"काय ?"

"अवं काय सांगावा डाक्टर. हितं समदे दारुडे अन् मटकाबाज. असले धंदे करन्यात जनम ग्येला आन् त्यास्नी ह्यो खुळा सांगतोय मटका लावू नगा. पिऊ बी नगा. आता आयकल का कुनी ह्या यडयाचे ? गुमान जावा का न्हाय आपल्या रस्त्याने तर म्हने आता मटक्याच्या अड्डयावर उपाशा बसूनशान न्हानार हाय. मरल फुकाचा."

काय घडतंय याची कल्पना आली तसा घाईने पुढे सरकलो. स्वतःला दामटत. मध्ये वृद्ध लोकांनी अडवले. एकदम हातापाया पडू लागले.

"डागदर म्हंजी द्येव म्हंतात त्ये काय रवाटं न्हाय !"

"काय रे काय झालं ?"

"अक्षी द्येवाजनू आला."

"अरे, पण काय झाले ?"

"डागदर, तुमीच सांगा प्रशादबावाला काय तरी. गांदी न्हेरूचं दिस ग्येले म्हनावं आता. हिते समदे यकापरीस एक डाकू आन ह्या त्यानला म्हंतोय मटका लावूनशानी नगा. आड्डयासमोर उपाशी बसलाय. तुमीच सांगा डागदर, काय तरी. तुमचं आयकलं तर आयकल. द्येवासारखं माणूस फुकाट मरल."

अड्डयाकडे निघालो. पुलाखाली अड्डा होता. नदीच्या पाण्याची डबकी साचली होती. कुजलेल्या पाण्याचा घाण वास. दलदल. डासांचे भण् भण् करीत उडणारे थवे. सगळीकडे साचलेले शेवाळ. अड्डयासमोर प्रशादजी उपाशी बसून होता. पुलावर गुलछडी फुलली होती.

खूप सांगितले. प्रशादजीने ऐकले नाही. फक्त हसला. शेवटी मी कळकळीने म्हटले, "प्रशादजी, जीव कशाला धोक्यात घालता ? मरायचे आहे का ?"

"नहीं."

"मग चला इथून."

"नहीं."

"जगायचे आहे ना ? मग चला इथून."

"नहीं आऊंगा !"


"का मृत्यूच्या सावलीत हिंडता ?"

"वही तो साथी है." प्रशादजी हसत म्हणाला.

रात्री अपेक्षित ते घडले. प्रशादजीवर हल्ला झाला. लोक त्याला रक्तबंबाळ बेशुद्ध स्थितीत हॉस्पिटमध्ये घेऊन आले. तीन दिवस प्रयत्नांची शिकस्त केली. शुद्धीवर आल्या आल्या प्रसन्नतेने हसला. म्हणाला, "बहुत शुक्रगुजार हूँ डॉक्टर बाबू. जिस दोस्तसे मिलने की, बचपन से मिलनेकी रवाहिश थी उससे लंबी लंबी मुलाकात हुई ! शुक्रिया."

थडग्याजवळ राहून लिली हसत होती. ■■

# पुस्तके



निशिकांत मिरजकर

मनवा । । । । । । । । । । । । । । । । । । ।

## रूपी अरूप दाखविणाऱ्या कथा

पु. शि. रेग्यांच्या पंधरा गोष्टी 'मनवा' मध्ये आहेत. त्यांतल्या दहा पूर्वी 'रूप कथ्थक' मध्ये आलेल्या होत्या. स्वतः रेग्यांनी या कथांचे काहीसे विश्लेषण प्रस्तावनेत केलेले आहे. त्यांत त्यांनी पुढील गोष्टी मांडल्या आहेत :–

१. यातील कथक एक मुक्त, पुष्कळसा भिडस्त (वाटल्यास भीरूही म्हणा) दुसऱ्याच्या मनाची, भावनांची अधिक कदर करणारा असा पुरुष आहे. तो एखादीच्या अगदी जवळ येतो. पण नंतर योगायोगाने किंवा स्वतःच्या शिस्तीने तसाच दूर जातो.

२. त्याला भेटलेल्या स्त्रिया (प्रत्येक गोष्टीतील कथक तोच समजला तर) वेगवेगळ्या वृत्तीच्या, वेगवेगळ्या भौगोलिक परिसरातील आहेत. त्या स्वतः काहीतरी एक विसरू पाहत आहेत, असे सारखे वाटत असते. कथकाशी त्यांचे संबंध चुटपुटते पण तितकेच अतूट, दोघांनाही कधीच न विसरता येण्यासारखे असतात. प्रत्यक्ष शरीरसंबंध न घडताही ती दोघे संबंधित झालेली असतात. दूर जाऊनही–राहूनही– ती एकमेकांना सतत काहीतरी देत असतात.

३. यामुळे या सर्वच गोष्टींत एक प्रकारची दुखऱ्या आनंदाची (tragic ecstasy) छाया सतत झिरपत असलेली दिसून येते.

४. या संग्रहातील आरंभीची 'गोष्ट' आणि शेवटाकडील 'साक्ष'...या दोहोंत प्रतीकात्मक पद्धतीने या संग्रहातील बहुतेक गोष्टींचे बीज दिसून येते...

५. या सर्वच गोष्टींत एक जिवंत ओघ आहे...यातील कोणतीच गोष्ट जिथे थांबते तिथे संपत नाही.

---

**'मनवा' – पु. शि. रेगे – मौज प्रकाशन – किंमत चार रुपये – पृष्ठे ८६**

---

याप्रकारे रेग्यांनी केलेले स्वत:च्या कथांचे विश्लेषण अचूक आहे, यात शंका नाही; परंतु रेग्यांच्या या कथांचे स्वरूप त्यातून पूर्णपणे स्पष्ट होते असे मला वाटत नाही: किंबहुना या कथा इतक्या तरल आहेत, इतक्या सहजसुंदर आहेत, आणि इतक्या अर्थगर्भ व आवाहक आहेत की त्यांचे स्वरूप असे सहजासहजी सांगता येणार नाही. एखादे शांत, निश्चल तळे असावे, वरचे आकाशातले नानारंगी मोहक मेघाकार त्याने आपल्या जळात साठवून ठेवावेत आणि आपल्या निर्व्याज मुलायमतेने नटवून ते रंगाकार पुन:पुन्हा आपल्या स्फटिकजळावर उमटवावेत, त्यातच रंगून जावे, भान हरपू द्यावे, तळ्याचे अलवार जलत्व आणि त्याला वेड लावणारे मोहक रंगाकार यांत फक्त एक पातळ जलपृष्ठाचा पडदा कळत-नकळत फडफडत राहावा; किंवा एखाद्या हळव्या संध्याकाळी, कातरवेळी कुठूनतरी बासरीचे जीवघेणे सूर ऐकू यावेत, ह्या सुरांनी झाकोळणाऱ्या आकाशाशी हिरवे नाते सांगावे, कुठल्याकुठल्या जन्मांच्या व्यथा पापणीच्या कडेला साचाव्यात–अशा तऱ्हेच्या या कथा आहेत. एका फार मोठ्या संवेदनाशील आणि सहनशील मनाच्या प्रांगणात टाकलेले हे कवडसे आहेत. रेखीव कवडसे. या कवडशांचे आकार वेगवेगळ्या स्त्रियांचे आहेत. विविध व्यक्तित्वांनी रेखलेल्या, ऋजू, झळझळीत स्त्रिया. सहनशील आणि सोशीक मनाची संवेदनाशील पार्श्वभूमी आणि कवडशांचा रेखीव झळझळीतपणा यामुळे एक मोहक गूढता त्या त्या ठिकाणी साचलेली आहे. छोट्याछोट्या तुकड्यांमध्ये केवढेतरी आशय सूचकतेने विसावलेले आहेत.

"प्रत्यक्ष शरीरसंबंध न घडताही ती दोघे संबंधित झालेली असतात," हे रेग्यांचे वाक्य फार महत्त्वाचे आहे. या सगळ्या कथातील स्त्रियांचे कथकाशी निरनिराळ्या प्रकारांनी संबंध आलेले आहेत. हे संबंध प्रत्यक्ष व्यवहाराच्या ठळक आखणीच्या पलीकडच्या धूसर प्रदेशातले आहेत. शरीरसंबंध, भावनिक जवळीक अशा विशेषणांत ते बद्ध होऊ शकत नाहीत. या स्त्रियांच्या शरीराचे आकर्षण कथकाला नाही असे नाही; परंतु तो फक्त या संबंधाचा एक अपरिहार्य भाग आहे. या संबंधांनाच एक गहिरे व्यक्तित्व आहे आणि ते शारीरिक आकर्षणात केंद्रित झालेले नाही. त्यामुळेच दूर राहूनही या सगळ्या स्त्रिया कथकाला सतत काहीतरी देत राहतात.

## दुखऱ्या आनंदाची कल्पना

'दुखऱ्या आनंदा'च्या कल्पनेला नीट समजून घेतले पाहिजे. या सगळ्या गोष्टींमध्ये रेखलेल्या या शब्दातीत गहिऱ्या स्त्रीसंबंधांत या आनंदाची उत्पत्ती आहे. ही एक तऱ्हेची देवाणघेवाण आहे. मात्र तिचे स्वरूप व्यावहारिक वा शारीरिक नाही. सुखदु:खांच्या, मनांच्या, व्यक्तित्वांच्या या देवाणघेवाणीचा हा आनंद प्रत्यक्ष निकट सान्निध्याची जोड मिळत न राहिल्याने दुखरा बनला आहे. जे मिळाले ते भरभरून मिळालेले आहे, पण आ–तृप्त नाही याची जाणीव आहे. पुन्हा

कथकाची मनोभूमी सहनशील व सोशीक असल्यामुळे अलभ्याच्या हव्यासाने त्याने मिळालेले विसकटून टाकलेले नाही. त्यात त्याला आनंदच आहे. काठोकाठ आनंद आहे. मात्र हा आनंद दुखरा आहे. झाकोळलेला आहे.

या गोष्टींतल्या स्त्री-संबंधांत शारीरिक आकर्षण केंद्रस्थानी नाही हे आणखी एका गोष्टीवरून जास्त स्पष्ट होते. कथकाने या सगळ्याजणींची जी चित्रे रेखलेली आहेत, त्यांत शारीरिक सौंदर्यवर्णनाला कुठेच विशेष स्थान नाही. शारीरिक सौंदर्यग्रहणाची वृत्ती कथकाजवळ नव्हती असे नाही. अशी वर्णने येतात. पण ती केंद्रस्थानी नाहीत. निवेदनाच्या ओघात सहजपणे आलेली आहेत. आणि ती फारशी विस्तृतही नाहीत.

" ती पाण्यात किती सुंदर दिसत होती आणि बाहेर आल्यावर मुळीच घाई न करता काही वेळ जेव्हा आंग्रेच्या ला सूर्ससारखी निश्चल उभी राहिली तेव्हा कशी अधिकच सुंदर दिसली– हे सारं मला त्या वेळी केवळ स्वप्नासारखं वाटलं."

" ओठ, डोळे, गाल, मानेवर मागे थोडीशीच दिसणारी अगदी सूक्ष्म पेन्सिली रेषा, वक्षांवरची ती घनावळी... सारं काही आळवलं होतं. पुन्हा आणि नव्याने. ओठ कधी कुणाला नव्हतेच इतकी त्यांची अपूर्वाई. डोळे तर जिवाशिवाच्या सोहळ्यात उजळलेल्या लाख दीपकळ्या...आणखी खूप काही. "

" कासवासारखे सारे पाय पोटात घेऊन एकदम अगदी निश्चल होऊन बसावं असं मला वाटलं... मात्र तिच्याकडं पुन्हा पाहिल्यावर कासवासारखं दगडी लोळागोळा होऊन राहणं अशक्य होतं.

" साधीभोळी, खूप बोलणारी, डोळे तरंगते ठेवून दुसऱ्याला नेहमी बुचकळ्यात पाडणारी. "

" भर उन्हाळ्याच्या दिवसांत दुपारी लाल पालवीनं फुटलेला पिंपळ जसा सळसळावा तशी ती दिसली. थोराड तितकीच नाजूक; अनघड आणि खुशाल."

" ती हसायची ती प्रथम डोक्यांच्या कडांपासून. मग एकाला एक छेदीत वर्तुळं उमटायची–थेट अगदी आपल्यापर्यंत स्वच्छ आणि लखलखीत. "

ही एवढीच शारीरिक सुंदरतेची वर्णने. पण त्यातही अभिलाषा नाही. हपापलेपणा नाही. नुसती रम्य सौंदर्याची निर्व्याज जाणीव आहे. संपूर्ण भावचित्र रेखताना या सौंदर्याच्या वळणदार रेषा आल्या आहेत इतकेच. तो फक्त भावचित्राचा एक अनुषंगिक भाग आहे. त्यात कथक कुठेही गुंतलेला नाही. आणि शरीराची सुंदरता, अवयवांचा रेखीवपणा यांना इथे महत्त्व नाहीच. एकसंध सौंदर्याची आकस्मिक संवेदनानुभूती कथकाला आली ती त्याने सांगितलेली आहे.

अशा तऱ्हेच्या कवडशांसारख्या, अनुभूतीचा एकसंध परिणाम देणाऱ्या या कथा असल्याने यांना सुरुवात, मध्य, शेवट नाही. घटनांचा अनुक्रम नाही. ती नुसती अनुभूतिचित्रे आहेत. म्हणूनच कथा जिथे थांबते तिथे ती संपत नाही. उदाहरणार्थ,

हिलीच कथा 'मनू' पाहावी. मनूचे हे शब्दचित्र आहे काय ? लेखकाचे हे स्वतःचे –भावदर्शन आहे काय ? ही एक गोष्ट आहे काय ? असे अनेक प्रश्न ही कथा वाचून मनात उभे राहतात आणि 'हे सगळे असूनही आणखी काहीतरी या कथेत आहे,' असे त्यांचे उतरही आपले आपल्यालाच मिळते. असे वाटते, की ही मनू म्हणजे निराकार संवेद्य सौंदर्य आहे. सर्व ऐंद्रिय संवेदनांना आकळूनही, त्यांच्या पलीकडून हुरहूर लावणारे शब्दांत गवसूनही शब्दांच्या पलीकडचे. "फुलाच्या अगदी गाभ्यात जाण्याचा प्रयत्न करता कामा नये. तिथे एक नुसती पोकळी असणार आणि ती तशी रहाणं यातच त्या फुलाचं सौभाग्य आहे. हा इशारा जसा रसिकाला तसाच तो फुला-लाही समजायला पाहिजे. फूल, त्या फुलाचं विश्व, हे सगळं ज्याच्या हृदयात नटून उभं आहे, त्याच्यासाठीच ही अनामिक पोकळी आहे." या 'मनू' मधील ओळी मी जेव्हा वाचल्या तेव्हाच त्या मनात खोल तळाशी जाऊन बसल्या. गुणगुणत राहिल्या. नंतर जाणवले की, 'मनू' या कथेचे, किंबहुना 'मनवा' मधील जवळजवळ सर्वच कथांचे स्वरूप या ओळींनी नकळत स्पष्ट केलेले आहे. यांतल्या स्त्रिया अशाच आहेत. फुलांसारख्या नाजुक, सुंदर, निष्पाप आणि तरीही एक सुगंधी पोकळी मनाच्या गाभ्यात जपणाऱ्या! यांतल्या कथकाने या पोकळीच्या जवळ जाण्याचा प्रयत्न न करताच ती जाणून घेतली आहे, तिच्याशी नाते जोडले आहे. तिच्या-भोवती स्वतःच्या अस्फुट भावनांचे अलवार विश्व नाजुकपणे गुंफले आहे. रेग्यांच्या या कथांचा आस्वाद घेताना रसिकानेही हीच वृत्ती ठेवली पाहिजे. नंतर जेव्हा याच ओळी मी पुस्तकाच्या मलपृष्ठावर चित्रांकित केलेल्या वाचल्या तेव्हा योजकाचे फार कौतुक वाटले.

यातल्या 'मनू'ला किंवा कुठल्याच स्त्रीला पूर्णांकाने चित्रित करण्याचा आव लेखकाने आणलेला नाही. तसा प्रयत्नच केलेला नाही. तशा त्याला या स्त्रिया सर्वार्थाने कळलेल्याही नाहीत. पेललेल्याही नाहीत. मात्र जेवढे त्याने पाहिले, तेवढ्यानेच तो अंतर्बाह्य सौंदर्याने भारावला आहे. याच्यावर कुठलेही भाष्य नाही. रंग दिलेला नाही. पण यातूनच खूपखूप कितीतरी आपोआप प्रतिबिंबीत झाले आहे. पाझरले आहे. त्या त्या स्त्रियांच्या निमित्ताने कथकाने आपल्याला दिसलेल्या जीवनाच्या, जगाच्या निरनिराळया सौंदर्यांना अगदी हळुवारपणे नुसता स्पर्श केलेला आहे. यातली हळुवारता कातर नाही. व्याकुळलेली नाही. पण हृद्य मात्र आहे.

## कथेतील हळूवारपणा

पहिली कथा वाचून वाटते की फूल आणि उमलणे, ढग आणि विहरणे, गीत आणि स्वर यांचे समवाय म्हणजे मनू आणि जीवनसौंदर्य. त्यामुळेच जगाच्या अथांग सौंदर्याविषयी अनावर आकर्षण असूनही मनू त्यापासून जितकी अलिप्त होती, तितका लेखक मनूविषयी अलिप्त राहू शकलेला नाही. तो मनूशी एकरूप होऊ पाहत आहे. थोडे अंतर अपरिहार्यपणे व आनंदाने ठेवूनसुद्धा. 'गोष्ट' ही कथा

वाचून झाल्यावर अगदी तरलपणे विहरत, परंतु निश्चितपण गडद होत जाणारी विष्पण्ण आतुर भाववृत्ती मनात उभी राहते. एक पत्र आणि एक स्मृती यांच्या माध्यमातून ती वृत्ती मनात पाझरते. "तू ही अशी; मी हा असा. अगदी तशीच तू. आणि मी? मी तिथं नव्हतोच. तिच्या रूपाला त्यानं आपला आरसा केला आणि मग ते रूप उरलंच नाही. आरसा तर कधीच नव्हता. तेही एक तिचंच रूप होतं. समोरासमोरच्या आरशांत मग किती रूपं आणि किती आरसे! आठवायला काही उरलंच नाही." ही या कथेची हुरहुरती प्रतिमा पूर्णपणे मनात दाटून येते. कथक, पत्र, स्मृती आणि गतातून खुणावणाऱ्या प्रीतीची अनुभूती यांच्या भावार्त संमेलाची पुरीपुरी ओळख होते. अशाच सगळ्या स्पष्टरेखीव, अरूप-कथा. 'बिंदो'च्या लहानशा व्यक्तीचित्रातून एक तेजस्वी चांदणी रेखीवपणे चमकून जाते, तर 'अमित्रा'ची कथा जे अस्फुटपणे जाणवले त्याच्याखाली एक जाड ठसठशीत रेघ ओढते. 'पल्लवी' च्या मृदू, सुखद, जिवंत रंगचित्रातून एक वेगळाच नमुना पुढे येतो. शेवटच्या 'साक्ष' मध्ये आगेमागे खूप इतिहास असलेली एक संवेदित मन:स्थिती सीमान्त प्रतीती देते. मनाला झालेली गाभुळ जखम दाखविते.


रेग्यांच्या या कथांत हळवा नसलेला हळुवारपणा आहे. कमलदलाते नेणता परागसेवन करणाऱ्या भृंगाप्रमाणे एक एक नाजुक ऋजू सौंदर्य अगदी अलगद रेखलेले आहे. कुठेही त्या रेषेची सहजता मोडलेली नाही. अगदी तीव्र, भडक प्रसंगांकडेसुद्धा हळुवार आपलेपणाने पाहिलेले आहे. त्यातले सौहार्द तेवढे टिपले आहे. (उदा. 'अनुराधा')

रेगे नुसती सूचक वाक्ये लिहून जातात. ही वाक्ये म्हणजे नुसते तरंग असतात. अस्पष्ट, नाजुक. त्यावरून आपण आकृत्या जुळवायच्या. आतल्या अथांगपणाचा गूढ निळेपणाचा नि फसव्या हिरवेपणाचा शेवाळी अंदाज घ्यायचा. आणि आपलेच मन व्याकुळ करून घ्यायचे. हुरहुरीमागचा अर्थ शोधायचा. "सावित्रीचं लग्न झालं आहे. का ते तिचं तिलाच कळलं नसेल. आज जर तिला विचारलं तर ती तो विषय टाळील. एका मागून एक आपत्ती याव्यात, कशालाच काही अर्थ उरू नये आणि मग नको तेच मुद्दाम नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी करून जावं तसं तिचं झालं असावं. हाही एक प्रकारचा हट्टच. त्याला हट्ट म्हणायचं एवढंच; त्यात अगतिकताच पुरेपूर असते." ('सावित्री')..."लगेच गाडीनं ती नदीपलीकडच्या शहरात जाणार असते. नद्या किती सोयीनं वाहतात!" – ('शेवट')..."बॅबिंग्टन-स्मिथ कमिटीच्या सर्व चलनविषयक सूचना माझ्यासमोरच्या पुस्तकांत दक्षाच्या नावाने चित्रीत झालेल्या असायच्या...भारतीय अर्थशास्त्र मी माझ्यापुरते तेव्हा असे सोपे करून टाकीत असे." ('दक्षा') अशीही हळुवार सूचक वाक्ये सगळीकडे विखुरलेली आहेत. कवी रेग्यांचे दर्शन घडवीत राहिलेली आहेत.

अशा या काठोकाठ भरलेल्या 'मनवा'तल्या कथा. अरूपाचे रूप शब्दांत साकार करू पाहणाऱ्या. मनस्वी.

■■

७ जून १९६९




---

२० सप्टेंबर १९६२
रात्री १०॥ ची वेळ
पुल क्रमांक दोन वरून
एका चिन्याने पहिली ग्रेनेड आपल्या हद्दीत फेकली.
भयंकर स्फोट झाला
आणि...भारत-चीन संबंधाचे पहिले पर्व संपले

---

तावांग ते लंपू हा खडतर प्रवास करून झाल्यानंतर मी लुंपू येथे एक दिवस विश्रान्ती घ्यायचे ठरवले, ह्यात मला जरासुद्धा संकोच वाटला नाही. आघाडी-वरच्या माझ्या जवानांच्याच हिताच्या दृष्टीने मी स्वतः माझी तब्येत सांभाळून राहणे हे अत्यंत आवश्यक होते. ब्रिगेड कमांडरच जर का थकलेला असेल, तर तो लढाई काय करणार ! एक कमांडर जर का आजारी पडला, तर त्याच्या जागी दुसरा कमांडर तावडतोब आणण्यासारखी आपली परिस्थिती नव्हती. नवीन कमां-डरला तिथल्या हवामानाची सवय व्हायलाच कमीत कमी ७–८ दिवस लागले असते. आपले जे ऑफिसर्स आणि जवान घाईघाईने धोलापर्यंत पुढे पाठवले गेले होते, त्यांपैकी कित्येक जण तिथे गेल्याबरोबर आजारी पडले आणि प्रत्यक्ष लढाईत भाग घेऊ शकले नाहीत. सुमारे ९,००० फुटांपेक्षा जास्त उंचीवर अस-लेल्या त्या प्रदेशात कसे राहायचे आणि कसा पायी प्रवास करायचा हे शिकायचे असेल तर तिथे सहज राहू शकणाऱ्या मोंपांचाच कित्ता गिरवावा लागेल. तिथले

लेखक — ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद — ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक — १४

मोंपा चालताना हळूहळू चालतात आणि सबंध दिवस प्रवास करून झाल्यावर मिळेल त्या ठिकाणी थोडी विश्रांती घेऊन मग पुढचा प्रवास करतात. सुदैवाने या गोष्टींचा मी नीट अभ्यास केला होता. उगाच का आज शेकडो वर्षे त्या प्रदेशात राहूनदेखील मोंपा तब्येतीने ठणठणीत होते ? तिथल्या हवामानाशी कसे जुळवून घ्यायचे याची आता मला चांगलीच सवय झाली होती; आणि त्यातली महत्त्वाची गुरुकिल्ली होती विश्रांती. लुंपू येथे एक दिवस थांबल्यामुळे माझा आणखी एक फायदा झाला. तावांग आणि डिव्हिजन येथील स्टाफशी मी संपर्क साधू शकलो. मला असे कळविण्यात आले की, चिन्यांना हुसकून देण्याच्या माझ्या मुख्य कामगिरीस मदत व्हावी म्हणून आणखी दोन बटालियन्स पाठविण्यात येत आहेत. G.O.C. कडून मला संदेश आला की, धोला प्रदेशाची पाहणी करण्यासाठी आणि लढाईची पुढील आखणी करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यासाठी ते स्वतःच शक्यतितक्या लवकर येत आहेत. मी त्यांना त्याच वेळी कळवून टाकले की, "तुमचा इकडे येण्याचा बेत थोडा लांबणीवर टाका. कारण ९/पंजाब या तुकडीला भेट दिल्याशिवाय, धोला प्रदेशाची नीट पाहणी केल्याशिवाय आणि इथल्या परिस्थितीचा काळजीपूर्वक अंदाज घेतल्याशिवाय तुमच्याशी चर्चा करून पुढचा बेत ठरवणे मला शक्य होणार नाही."

लुंपू या ठिकाणी जवानांचे अन्न विमानांतून, खाली टाकण्याचे काम मी प्रत्यक्ष पाहिले. मला आश्चर्य वाटले नाही; पण माझा हिरमोड झाला. जवळ जवळ ३० ते ४० टक्के हवाई छत्र्या (Parachutes) उघडल्याच जात नव्हत्या. पिशव्या भलतीकडेच पडत होत्या. अन्न फुकट जात होते. गेली कित्येक वर्षे जुनी पॅरॅशूटस वापरून आणि तीच पुन्हा परत मिळवून पुन्हा वापरण्यात आपली शक्ती हकनाक खर्ची करून घेत होतो. अशी भलतीकडेच पडलेली निकामी पॅरॅशूटस तिथेच महिना महिना पडून राहत. कधी कुणाला ती दिसलीच तर त्यांतले अन्न मिळावे म्हणून खेचरांवर घालून ती योग्य त्या ठिकाणी पोचवावी लागत. कधी कधी हे अंतर १०० मैलांचे असे ! काय उपयोग होता त्या पॅरॅशूटसचा ? आधीच कमी मिळत असलेली रसद आणखी ३०–४० टक्के अशी कमी होत होती ! यंदा अशी बिघडलेली आणि म्हणूनच काम न देऊ शकणारी

पॅरॅशूटस कदाचित मिळालीच तर ती दुरुस्त करून पुन्हा हवाई दलाकडे पाठवावी लागत. केवळ पॅरॅशूटस् जुनी होती म्हणून वेळ आणि शक्ती यांचा असा दुहेरी नाश होत होता. आधीच आपल्यापुढे असंख्य मोठे प्रश्न होते, त्यांतच हे असे प्रश्न नव्याने निर्माण होत होते.

धोला प्रदेशातले जवान सर्वस्वी 'वरून' टाकल्या जाणाऱ्या रेशनवर अवलंबून होते. त्यांना रसद पोचवण्याचा जमिनीवरचा मार्ग मोकळा नव्हता. जवान चिन्यांशी लढण्यासाठी म्हणून पुढे गेलेले; आणि त्यांना रेशन पोचवण्याची व्यवस्था ही अशी ! मला आश्चर्याचा दुसरा धक्का बसला तो हे पाहून की, वरून खाली टाकली जाणारी रॉकेलची पिंपे ही ४४ गॅलनची होती. ४ गॅलन ग्रहणशक्ती असलेले उचलायला सोपे असे एकही पिप नव्हते. ४४ गॅलनचे एक पिंप वाटेत अनेक वळणे आणि चढउतार पार करून १३,००० फूट उंचीवर असलेल्या जवानांना पोचवण्यात अडचणी येतील, याचा वाटप करणाऱ्या व्यक्तींनी विचारदेखील केला नव्हता.

१८ सप्टेंबरला मुसळधार पाऊस पडत असतानाच मी लुंपू सोडले आणि नामका-चूच्या दिशेने पुढे निघालो. लुंपू ते थाग-ला या १५ मैलांच्या अंतरात वाटेत कुठेही विश्रान्तीसाठी वसतिस्थान असे नव्हतेच. वाटेत मैलच्या मैल लांब पसरलेली गवताळ जमीन आणि मध्येच कुठे कुठे दिसणारी एखाद्या धनगराची झोपडी यांपेक्षा अधिक वस्ती तिथे नव्हतीच. पाऊस सतत पडत असल्यामुळे त्या कुरणातदेखील पाणी साचले होते. दलदल माजली होती. ज्या ठिकाणी पाणी फार साठत असे ती ठिकाणे ओलांडून जाण्यासाठी तिथले लोक लाकडाचे ओंडके टाकून त्यांवरून जात असत. १–२ माणसांना ओलांडून जाण्यासाठी लाकडी ओंडके ठीक होते, पण भारतीय सेनेच्या पायदळ तुकड्या त्या ओंडक्यांवरून गेलेल्या होत्या ! ते सगळे ओंडके पाण्याखाली बुडून जवळ जवळ दिसेनासे झाले होते. आता गुडघाभर चिखलात उतरून पाणी तुडवत पुढे जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. १०,००० फूट उंचीवर अत्यंत थंड पाण्यात उतरून, एकीकडे अवजड ओझे सांभाळीत, चिखल तुडवीत पुढे जाताना आम्हांला काय यातना झाल्या, त्या आमच्या आम्हांलाच ठाऊक ! १८ सप्टेंबरची रात्र आम्ही सरखिम (Serkhim) या ठिकाणी एका झोपडीत घालवली.

१९ सप्टेंबरला पहाटेच आम्ही पुढची वाटचाल सुरू केली. हाथुंग-ला खिंडीमार्गे (१३,४०० फूट उंच) आम्हांला पूल क्रमांक १ व २ हे पुढचे टप्पे गाठायचे होते. आता तर रस्ता आणखीनच खडतर होता. चिखल आणि दलदल तर पूर्वीपेक्षा जास्त होतीच, पण आता वाटेत भयानक चढ-उतार होते. साहजिकच आमची गती मंदावली. हाथुंग-लाच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत जायलाच २॥ तास लागले. नंतरचा उतार इतका फसवा होता की, तंगड्या गुडघ्यापासून मोडून पडतील की

काय, असे वाटायला लागले. मांड्या दुखायला लागल्या. पाण्यात दगडगोटे, त्यांच्यावर शेवाळे आणि दगडफुले माजलेली. एक पाऊल जरी चुकीचे टाकले गेले असते तरी पाय मुरगळला असता. सामानासकट तोल सांभाळून चालणे म्हणजे दिव्यच होते. ११,००० फूट उंचीवर आम्ही घनदाट बांबूंच्या बनातून रस्ता काढला. पूल क्रमांक १ वर मी पोचलो, तेव्हा मी शरीराने आणि मनाने पार खचून गेलो होतो. लुंपू ते नामका-चू हा सैतानी रस्ता मी प्रत्यक्ष तुडवीत आलो होतो. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांजवळ असलेल्या नकाशावर मात्र हे अंतर एका ढांगेचे दाखवले गेले होते. प्रत्यक्षात हे अन्तर चालून यायला ४ दिवस लागले होते. हवामान अतिशय थंड. वाटेत आसरा मिळालाच तर फक्त मूठभर माणसे राहू शकत. बाकीचे उघड्यावर ! हमालांना कपड्यालत्त्याबरोबर प्रत्येकाचे कमीत कमी ४ दिवसांचे अन्न वाहून न्यावे लागत होते. तळे राखील तो पाणी चाखील ! काही काही उलट्या काळजाचे हमाल तर जवानांसाठी म्हणून दिलेले अन्न वाटेत स्वतःच फस्त करीत.

पुढे गेलेल्या ९/ पंजाब या तुकडीबद्दल मला काळजी वाटू लागली. ८ सप्टेंबरपासून दुसऱ्यांदा माझ्या मनात शंकाकुशंकांचे काहूर माजले. अपुऱ्या अन्न-वस्त्रानिशी आणि तुटपुंज्या युद्धसामग्रीसह ते पुढे गेले होते. कसे पोसू शकणार होतो मी पंजाब्यांना ? ५०० जवानांना दररोज कितीतरी अन्न लागेल. लढाईसाठी अवजड तोफा, थंडी निवारणासाठी उबदार कपडे, जमीन खणण्यासाठी कुदळी, इतर असंख्य आवश्यक वस्तू. कशी होणार होती ही व्यवस्था ? आणि काय होणार आहे त्या तुकडीचे ? भवितव्य कठीण होते !

नामका–चू नदीच्या पूल क्रमांक १ जवळ मला कर्नल मिश्रा भेटले. भेटल्याबरोबर मी प्रथम त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. ज्या शिस्तीने आणि झपाट्याने तिथपर्यंत सुखरूप पोचण्याची मोठी कामगिरी त्यांनी बजावली होती ती खरोखरच कौतुकास्पद होती. माझ्या मते ९/ पंजाब ही एक पहिल्या दर्जाची पायदळ तुकडी होती. तिथेच खाली बसून आम्ही नकाशा उघडला. पूल क्रमांक १ समोरच दिसत होता. आमच्याजवळचा हा पाव इंच स्केलचा नकाशा अगदी जुना, अस्पष्ट आणि संदिग्ध होता. किती जुना ? १९१३–१४ मध्ये तिबेट आणि ब्रिटिश इंडिया यांच्यांतल्या सिमला कराराप्रमाणे मान्यता मिळालेल्या मॅकमोहन रेषेवरची ठिकाणे एका रेषेत आणण्यासाठी, एक खास ब्रिटिश ऑफिसर नकाशा काढण्यासाठी इथे पाठवण्यात आला होता. आमच्याजवळचा नकाशाही त्या मूळ नकाशाची छापील नक्कल होती. हा नकाशादेखील चुकीचा होता. थांबा ! एकदम भलता अर्थ काढू नका. तो प्रदेश आपलाच होता. फक्त दिशा चुकल्या होत्या. या नकाशात नामका–चू नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत गेलेली दाखवली होती. प्रत्यक्षात मात्र ही नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत होती. ही लहानशी चूक होण्याचे कारणही तितकेच नाजूक आणि गोड होते ! हिमालय, तपश्चर्या आणि अप्सरा यांचा संबंध

तुम्हांला ठाऊक आहेच. असे म्हणतात की, ब्रिटिश इंडिया–तिबेट सरहद्दीचा नकाशा काढण्याच्या महत्त्वाच्या कामासाठी आलेला तो ब्रिटिश सर्व्हे ऑफिसर तिथे आल्यावर एका भूतानी सुंदरीच्या प्रेमात पडला. त्याला ब्रिटिश सरकारने नकाशा काढण्यासाठी म्हणून जो कालावधी दिला होता, त्यातला बहुतेक वेळ स्वारीने तिच्या मागे भूतानमध्येच घालवला. शेवटी त्याच्या लक्षात आले की, आपण गव्हर्न्मेंट सर्व्हंट आहोत, प्रेम करायला फार वेळ मिळणार नाही ! मग नाइलाजास्तव प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते, असे म्हणून सर्व्हे ऑफिसरने घाईघाईने काम उरकायला सुरुवात केली. वेळ फार थोडा होता म्हणून हाडाचा गव्हर्न्मेंट सर्व्हंट शोभेल अशा तऱ्हेने नामका–चू नदी टाळून तो थेट निमजांग–चू (Nyamjang–chu) नदीवर गेला. ही नदी उत्तर–दक्षिण वाहत होती यावरून त्याने अंदाज बांधला की, नामका–चूसुद्धा उत्तरेकडून दक्षिणेकडेच वाहत असली पाहिजे. दाखवून टाकू नकाशावर तशीच ! तरी मला वाटलंच की, कुठंतरी चुकतंय. कारण हा नकाशा बघूनच दिल्लीत बसून योजना आखणाऱ्यांचा असा गैरसमज झाला असला पाहिजे की, ९/ पंजाब या तुकडीतल्या जवानांची तोंडे उत्तरेकडे नसून पूर्वेकडे आहेत.

त्या प्रदेशाचा दुसरा एक कच्चा नकाशा आमच्याकडे होता. मे १९६२ मध्ये गोला ही पोस्ट निर्माण करण्याची कामगिरी करणाऱ्या आसाम रायफल्सच्या एका लान्स-नाईकने हा नकाशा रेखाटला होता. पण हा नकाशा होता एका फार मोठ्या कागदावर. हाही नकाशा अचूक नव्हता. कारण आपला लान्स-नाईक जसजसा पुढे गेला तसतसे पुलांसारखी महत्त्वाची ठिकाणे एकमेकांपासून किती दूर आहेत हे त्याने अंदाजानेच रेखाटले होते. चिखल, बर्फ आणि घनदाट जंगले यांमुळे तंतोतंत अंतर तो मोजू शकला नव्हता. या नकाशातली एक चूक तर पुढे आपल्याला चांगलीच भारी पडली. कागद मोठा असल्यामुळे, तिथले लोक (Tsangle) या नावाने ओळखत असलेले ठिकाण ·एक झोपडी काढून डाव्या हाताच्या अगदी कोपऱ्यात दाखविले होते. त्याच्या स्केल प्रमाणे हे ठिकाण धोलापासून फार फार तर २–३ मैलांवर होते. पण प्रत्यक्षात धोलापासून Tsangle येथे जायला २–३ दिवस लागले असते. बरे, हे मी सांगून कुणाचा विश्वास बसत नव्हता. भारत सरकारच्या अधिकाऱ्यांपासून सेक्शन कमांडरपर्यंत प्रत्येकजण या नकाशाकडे बोट दाखवून विचारायचा की, ' हा नकाशा बघ ! तो कधी बदलतो का ? ' आर्मी हेड क्वार्टरचासुद्धा असाच गैरसमज झालेला. आघाडीवरचे कुठलेही नवे भीतिदायक प्रश्नच कुणी ऐकून घ्यायला तयार नव्हता.

याच संदर्भात आपण ज्याला पूल म्हणत होतो ते पूल होते तरी कसे हे सांगतो. ऑक्टोबर ६२ च्या लढाईत नामका–चू नदीवरच्या पुलांना सगळ्या जगात प्रसिद्धी मिळाली. ' पूल कबजात ठेवण्याचा प्रयत्न दोन्ही बाजूंनी चालू आहे ',

'चिन्यांनी भारताचे पूल उद्ध्वस्त करून टाकले!' अशी भाषा जगात बोलली जात होती. वस्तुतः हे पूल म्हणजे २–३ लाकडांचे ओंडके एकत्र बांधून नामका–चू नदीच्या अरुंद पात्रावर टाकलेली लाकडे होती. त्यांना लष्करी डावपेचांच्या दृष्टीने कवडीची किंमत नव्हती. हे मी एवढ्याचसाठी सांगितले की, भाषा किंवा शब्द हे नेहमी साधे वापरावेत म्हणजे परिस्थिती स्पष्ट होते. आपण कुठे आहोत आणि कोण आहोत हे इतरांना नाही तरी कमीत कमी आपल्याला तरी नीट समजते. खिशात अक्षरशः दोन पैसे असतील तर 'मी गरीब माणूस आहे' असे म्हणावे. 'आज मी दोन पैसे बाळगून आहे,' असा भलताच आव आणलात तर एखाद्या दिवशी तरी भ्रमाचा भोपळा फुटणारच!

नामका–चू नदी फार वेगानं वाहत असते. पात्रात गुळगुळीत दगडगोटे इतके आहेत की, पाण्याखाली ते मुद्दाम पसरून ठेवल्यासारखे भासतात. अगदी अरुंद ठिकाणी तिचे पात्र फक्त २४ फूट आहे आणि जिथे नदीचा जोर आहे, तिथे १२० फूट आहे. ही नदी पुढे किंझमानेमधून वाहत जाणाऱ्या निमजांग–चू (Nyamjang-chu) नदीला जाऊन मिळते. १४,००० फूट उंचीवर असलेल्या छोट्या छोट्या तळ्यांतून नामका–चू नदी उगम पावते. सुमारे १६ मैल प्रदेशात ती ८,००० फूट खाली उतरते. मुसळधार पाऊस पडत असला किंवा हिमालय पर्वतावरचे बर्फ वितळायला लागले तरच पाण्याचा प्रवाह जोरदार असतो. एरव्ही नामका–चू


मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

न्यू इरा
होमिओपॅथिक
फार्मसी

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई–२८

नदी म्हणजे फार मोठी अडचण नसते. सहज पायाने चालत नदीपलीकडे जाता येते इतके पाणी कमी असते.

कर्नल मिश्रांची आणि माझी १० सप्टेंबरपासून भेट झाली नव्हती. गेल्या ७–८ दिवसांतल्या घटनांसंबंधी त्यांना मला बरेच काहीसे सांगावयाचे होते. १५ सप्टेंबरला सकाळी ८-३० वाजता आपली ९/ पंजाब ही तुकडी ज्या वेळी पूल क्रमांक २ जवळ पोचली, त्या वेळी चिनी सैनिक नामका–चू नदीच्या दोन्ही तीरांवर उभेच होते. त्यांच्याबरोबर एक चिनी मुलकी अधिकारी होता. आपल्या जवानांना पाहून चिनी चक्क हिन्दीत ओरडले, " नामका–चूपासून मागे जा. ही नदी चिन्यांच्या हद्दीत येते. " नामका–चू नदीला ते त्यांच्या भाषेत काचिलेंग (Kachileng) म्हणत होते. मुद्दाम, चुकून की प्रामाणिकपणाने? नंतर आवाज जरा खाली आणून ते पंजाब्यांना म्हणाले, " तुमची आणि आमची आजपर्यंत अखंड दोस्ती आहे. सरहद्दीवरच्या एखादा क्षुल्लक प्रकारदेखील मैत्री विघडवून टाकू शकतो. कशाला उगाच भानगडी करता? आता हेच पाहाना, आम्ही काही चिनी सैनिक नाही. आम्ही फक्त चिनी सरहद्दीचे पहारेकरी आहोत–फ्रॉंटियर गार्डस् आहोत. आणि भारतानं मात्र इथं लष्कर पाठवलंय. असे का करता तुम्ही? त्यापेक्षा एखादा मुलकी अधिकारी पाठवा. आम्ही पण आमचा मुलकी अधिकारीच फक्त इथं आणलाय! दोन्ही अधिकारी एकत्र बसून शांततापूर्ण वाटाघाटी करतील आणि सरहद्द एकदा निश्चित ठरवतील. गोळीबार आणि रक्तपात टाळून शक्यतो आपण सन्माननीय तडजोड करू!"

चिन्यांची इतक्या डावपेचाने पोपटपंची करणारी ती माणसे म्हणे त्यांची फ्रॉन्टियर गार्डस होती. चिनी सैन्याशी (People's Liberation Army of China) त्यांचा काही एक संबंध नव्हता!

मी कर्नल मिश्रांना म्हटले, "अरे, ५९ मध्ये लोंगजू आणि किझमानेमध्ये चिन्यांनी हाच प्रकार केला होता. इथंही तेच. अजून त्यांनी त्यांच्या पद्धतीत बदल केलेला दिसत नाही. बरं मग. तुमच्या तुकडीनं पुढं काय केलं?"

"पुढं काय करणार? भारत सरकारचा मला हुकूम असा होता की, आत्मसंरक्षणाखेरीज एरव्ही कधी गोळीबार करायचा नाही! चिन्यांनी भारताची भूमी सोडून जायला नकार दिला तर ते जिथं बसतील त्यांच्यासमोर आपण बसायचं. पूल क्रमांक १ आणि २ जवळ आपले जवान उभे करून ठेवले आणि माझा रस्ता अडवून उभ्या असलेल्या चिनी सैनिकांना वळसा घालून आणखी काही जवानांसकट पूल क्रमांक ३ आणि ४ पर्यंत पुढे गेलो. कारण धोला हे ठिकाण पूल क्रमांक ३ जवळ होते. चिनी सैनिकांनी आमचा पाठलाग मात्र केला नाही." मिश्रा म्हणाले.

घोला या ठिकाणी कर्नल मिश्रा दुपारी पोचले. कर्नल मिश्रा आणि त्यांचे शूर जवान यांनी युद्धातली पहिलीच कामगिरी उत्तम बजावली होती. घोला आता आपल्या कबजात होते. चीन आणि भारत यांच्या सेना समोरासमोर उभ्या होत्या.

वस्तुतः सबंध थाग-ला प्रदेश आपला होता. पण...पण घोलापासून पुढे थाग-ला प्रदेशात चिनी प्रचंड संख्येने उभे होते. त्यामुळे नामका-चू नदीवरील पूल क्रमांक १ ते ४ ही आपली लष्करी सरहद्द बनली. ९/ पंजाब ही तुकडी चिन्यांच्या नजरेच्या टप्प्यात होती. युक्तीची लष्करी व्यूहरचना करायला आता वाव नव्हता. समोरून ते सगळे बघताहेत ना ! ९/ पंजाबला दुसऱ्या कुठल्या तुकडीची मदत नव्हती. हातात फक्त ३ इंची बंदुका; तर शत्रूच्या हातात मशिनगन्स ! आणि समोर तोफखाने ओळीने लावून ठेवलेले.

कर्नल मिश्रांच्याबरोबर या सुखदुःखाच्या गोष्टी बोलून झाल्यानंतर मी त्यांच्या-बरोबर नामका-चू नदीवरच्या पूल क्रमांक २ वर निघालो. सुदैवाने पूल व्यवस्थित होता. आम्हांला येताना पाहून तिथे बसलेले दोन लालबुंद चेहऱ्यांचे आणि चेहऱ्या-वरून मंगोलियन वाटणारे, १३ ते १९ वयाचे दोन चिनी सैनिक ताड्कन उभे राहिले. त्यांचा गणवेष आणि त्यांच्या हातातली हत्यारे इतकी झक्क होती की यार हम तो देखते ही रहे ! अॅटोमॅटिक रायफल ! त्यांनी त्यांच्या अॅटोमॅटिक राय-फलची नळी माझ्या कपाळावर रोखली. मी त्यांच्याशी हिंदीतून बोलण्याचा प्रयत्न केला मात्र, त्याने हातातली बंदूक हवेत मागे हलवून मला इशारा दिला की, 'मागे जा ऽऽ !'

इथे गोष्ट प्रामाणिकपणे कबूल करतो की, त्या चिनी सैनिकांना नुसते पाहूनच मला त्यांचा हेवा वाटला. वाटलं, याला म्हणतात सैनिक; कशी झकास तब्येत आहे ! आणि हातात शस्त्रसुद्धा किती छान आहे. अॅटोमॅटिक !

पुढे माझे हे मत मी G.O.C ला मुद्दाम कळवले. कारण, महू येथे १९६२ च्या मध्यावर इन्फट्री कमांडर्स कॉन्फरन्समध्ये बोलताना जनरल कौल म्हणाले होते की, "चिनी दाखवतात तेव्हढी त्यांची तयारी चांगली नाही आहे !"

आणि हेच मत भारतीय सैन्यात पसरत होते. मी आता हे प्रत्यक्ष पाहिले होते की, फ्रांटियर गार्ड आहे म्हणून सांगणाऱ्या चिन्यांकडे अॅटोमॅटिक रायफल आहे, मग लष्करात असलेल्या सैनिकांकडे काय असेल ?

नंतर मला चिन्यांकडून सांगण्यात आले की, १९ सप्टेंबरला मी नामका-चू नदी-वर आलो होतो. ही बातमी चिन्यांना टाकोटाक कळली होती. मी तुरुंगात असताना एके दिवशी एक चिनी स्टाफ ऑफिसर मला भेटायला आला. तो मला ४ थ्या पायदळ तुकडीचा डेप्युटी कमांडर समजत होता. माझ्याकडे रोखून पाहत तो म्हणाला, "१९ सप्टेंबरपासूनच वादग्रस्त टापूत यायची तुला काय जरूर होती ? चीनवर हल्ला करायचाच बेत होता ना ? एरव्ही तुझ्यासारखा कमांडर तिथे

कशाला आला असता ? सरहद्दीचा क्षुल्लक प्रश्न होता पण तू तिथे आल्यामुळे मोठे युद्ध पेटले ! या लढाईची जबाबदारी व्यक्तिशः तुझ्यावर आहे, तू जबाबदार आहेस सगळ्या गोष्टींना !"

१९ सप्टेंबरला नामका-चू नदीवर आलेला कमांडरच आता तुरुंगात आहे, हे या स्टाफ ऑफिसरला कसे कळले याचे मला आश्चर्य वाटले. कदाचित बाकीच्या कैद्यां-कडून त्याला माझ्याबद्दलची माहिती मिळाली असेल किंवा त्यांनी मला त्याच वेळी नीट पाहून ठेवला असेल. पण...पण तिसरीही एक शक्यता होती. जसजसा विचार करू लागलो तसतशा बारीकसारीक गोष्टी आठवायला लागल्या आणि मग डोक्यात प्रकाश पडला की, ही माहिती भारतीय हद्दीत घुसलेल्या चिनी हेराने पुरवली असली पाहिजे !

मला चांगलं आठवतंय. नामका-चू नदीपर्यंत रस्ता दाखवण्यासाठी म्हणून आमच्या-बरोबर दिला गेलेला वाटाड्या जरा जरुरीपेक्षा जास्त हुशार वाटत होता. तो सोपा वाटतच नव्हता. मला त्याच वेळी त्याचा संशय आला होता. पुढे त्याच्या-बद्दलचा माझा संशय जास्तच बळावला; कारण आम्ही पूल क्रमांक १ पर्यंत पोहो-चल्यावरोबर तो अचानक नाहीसा झाला. आमचा वाटाड्या चिन्यांचा हेर असला पाहिजे, ही माझी शंका मी माझ्या इंटेलिजन्स ऑफिसरजवळ बोलून दाखवली. त्यावर ते म्हणाले, " छे: छे: ! तसं काही नाही. त्याची गुरं वाट चुकून थाग-ला प्रदेशात गेलीत म्हणून त्यांना शोधण्यासाठी तो चिन्यांच्या बाजूला गेलाय. उलट येताना तो तिथली खबर काढून आपल्याला कळवील !"

तो वाटाड्या हेर म्हणून दोन्हींकडून काम करीत होता काय ? पुरावा नसताना उगाच कुणाची नालस्ती करण्याची माझी इच्छा नाही. पण एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, ७–८ ऑक्टोबरला जनरल कौल धोला प्रदेशाला भेट देण्यासाठी आले होते, तेव्हादेखील त्यांना रस्ता दाखवण्यासाठी हाच वाटाड्या त्यांच्याबरोबर गेला होता. अशा बाबतीत किती जागरूक राहावे लागते हे कळावे म्हणूनच मी हा प्रसंग सांगितला. एखादा संशयास्पद वाटाड्यादेखील आपले फार मोठे नुकसान करू शकतो.

चिनी पहारेकऱ्यांशी पहिली सलामी झडल्यावर आम्ही कमांडिंग ऑफिसर्सच्या कमांड पोस्टवर परत आलो. आल्याबरोबर ८ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर या काल-खंडात दिल्या गेलेल्या जास्तीत जास्त चमत्कारिक अशा एका हुकमाची नक्कल माझ्या हातात ठेवली गेली. हा हुकूम मिलिटरी ऑपरेशन्स डिरोक्टरेटच्या ज्या फाईलमध्ये होता त्या फाईलचा नंबर इतक्या वर्षांनंतरदेखील आज माझ्या लक्षात आहे. पण काही खास कारणास्तव तो मी इथे देत नाही. चीफ ऑफ आर्मी स्टाफ-कडून आम्हांला मिळालेल्या हुकमाचा मुख्य भाग असा होता :

"9/ Punjab will capture Thagla, contain Yumtsola and

Karpola II by 19 th September."

तिथल्या परिस्थितीचा नीट विचार करता हा हुकूम चुकीचा ठरत होता. हे काम पार पाडता येण्यासारखे नव्हते. या लष्करी हुकमात राजकारणच जास्त होते. जनरल थापर आता भारत सरकारला सांगायला मोकळे झाले होते की, थाग-ला प्रदेशातून चिन्यांना बाहेर हुसकावून लावण्याचा हुकूम मी दिलेला आहे. आपल्या आवाक्याबाहेरची कामे लष्करी अधिकाऱ्यांनी करावीत, अशी राजकारणी लोकनियुक्त प्रतिनिधींची अपेक्षा नसते. तशी अपेक्षा त्यांनी केलीच तर राजीनामा देणे हे सेनापतीचे कर्तव्य असते. कारण सेनापतीच्या राजीनाम्याला महत्त्व असते. राजकारणी मुखंड काय समजायचे ते समजून थंड होतात. जनरल थापर यांनी देशाच्या हिताच्या दृष्टीने हे करायला हवे होते.

नंतर ज्या वेळी जनरल थापर यांना आपला पराभव झाल्याबद्दल दोष दिला जाऊ लागला, तेव्हा जनरल थापर यांनी त्यांच्या चुकीचे खापर आघाडीवरच्या जवानांच्या माथ्यावर फोडले. मार्शल जोफच्या (Joffre's) सुप्रसिद्ध शब्दांत ते म्हणाले, "आपल्या तुकड्यांकडून आक्रमक वृत्तीच्या ज्या गुणांची अपेक्षा होती ते त्यांनी रणांगणावर दाखवले नाहीत."

जनरल थापर यांचा हा हुकूम हे एक गूढच आहे. कारण, चिन्यांच्या तुरुंगातून सुटून स्वदेशी परत आल्यानंतर, पूर्वीच सांगितल्याप्रमाणे जनरल जे. एन्. चौधरी यांना भेटण्याचा मला हुकूम देण्यात आला. दिल्लीमध्ये जनरल चौधरी यांनी मला विचारले की, "पूर्वीच्या चीफने 'चिन्यांना हुसकून द्या!' असा हुकूम तुम्हांला कधी दिला होता का?"

मी तावडतोब जनरल चौधरींना, जनरल थापर यांच्याकडून आलेला तो हुकूम जशाचा तसा घडाघडा म्हणून दाखवला. जनरल चौधरींनी त्यानंतर मान हलवली. त्या हुकमातला शब्दन् शब्द अजून माझ्या लक्षात आहे, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यावर मी जनरल चौधरींना म्हटले की, "तो हुकूमच इतका हास्यास्पद होता की, मरता मरतासुद्धा मी तो म्हणून दाखवू शकेन इतका लक्षात राहावा!"

हा हुकूम दिला गेला तेव्हा पंतप्रधान आणि अर्थमंत्री परदेशांत होते. आपले संरक्षणमंत्री परदेशांत जाण्याच्या तयारीत होते. CGS जनरल कौल काश्मीरच्या मस्त हवेत मजा करीत होते. दिल्लीतली महत्त्वाची टेबलं रिकामी होती! मग हा हुकूम का आणि कसा दिला गेला?

१७ सप्टेंबरला जनरल सेन म्हणाले की, "थाग-ला प्रदेशात आपली एक ब्रिगेड नेण्यासाठी अजून काही काळ लागेल. (त्यांचा पूर्वीचा १० दिवसांचा अंदाज चुकीचा होता तर!) आपल्या बचावाच्या दृष्टीने पाहणी करून झाल्यानंतर थाग-ला प्रदेशाच्या दक्षिणेकडे आपण ताबा मिळवण्याचा प्रयत्न करू."

संपूर्ण थाग-ला प्रदेश चिन्यांनी गिळंकृत केला होता आणि आता कुठेही आपल्याला

ताबा मिळायला संधीच नव्हती. पण जनरल सेन यांच्या या वक्तव्यावरून ए गोष्ट स्पष्ट होते की, हे ठाऊक असल्यामुळेच 'चिन्यांनी भारतीय भूमी सोडू जायला नकार दिला तर त्यांच्यासमोरच बैठक मारा' अशी योजना जनरल कौलनी आखली असली पाहिजे.

वर दिलेला चमत्कारिक हुकूम सोडण्यापूर्वी जनरल थापर यांनी पुढील लष्कर वस्तुस्थितीकडे डोळेझाक केली. आपल्यासमोर चिनी सैन्याच्या दोन कंपन्या उभ्य होत्या आणि त्यांच्या मदतीसाठी मागे प्रचंड चिनी सैन्य तयार होते. थाग-ला प्रदेशा तून चिन्यांना हुसकून देण्याइतपत ताकद ९/ पंजाब या एकमेव तुकडीत नव्हती.

९/ पंजाब ही आपली तुकडी चिनी सैनिकांच्या बरोबर समोर उभी होती. जाग बदलल्याशिवाय त्यांना शत्रूवर चढाई करता येणे शक्यच नव्हते. कारण, शत्रू पाह असताना चढाईच्या हालचाली कधी करता येत नाहीत. पूल क्रमांक १ ते ४ ह प्रदेशदेखील लढाई करण्याच्या दृष्टीने योग्य नव्हता. चिन्यांच्यावर हल्ला करायच तर ९/ पंजाबला नामका-चू नदी पार करून पलीकडे जावे लागले असते. पली कडच्या तीरावर जय्यत तयारीत आरामशीर उभे असलेले चिनी काय नुसते बघत राहिले असते ? त्यांनी कत्तल केली असती आपल्या जवानांची. तिथला प्रतिकूल निसर्ग हादेखील चीनइतकाच भयंकर शत्रू होता. आपल्या जवानांकडची शस्त्रास्त्र जुनाट, खायला अन्न आज मिळाले तर उद्या मिळेल की नाही, ही पंचाईत. सामान वाहून न्यायला आपल्याकडे हमाल नव्हते. १३,४०० फूट उंचीवरची खिंड पार करून शेकडो मैल चालून आपला जवान आधीच थकलेला. तो काय लढणार ? या उलट चिनी सैनिकांची प्रत्येक बाबतीत चंगळ होती. थोडेसे बॉम्बस् आणि फक्त दोन तोफखाने हा आपला सरंजाम तर, '१,५०० तोफखाने आघाडीवर आणलेले हा त्यांचा सरंजाम ! खंदक खणण्यासाठी आणि झाडे तोडण्यासाठी लागणारी हत्यारे आणि करवती यांचा आपल्याकडे तुटवडा होता. एवढे करून पहिल्याच चढाईत आपण पुढे धडक मारली असती तरी अखेर हरलोच असतो. कारण, लढाईत हल्ला म्हटला म्हणजे प्रतिहल्ला आलाच. चिन्यांनी जोरदार प्रतिहल्ला करून आपला धुव्वा उडवला असता. लढाईला केव्हाही, कसेही वळण लागते. लढाईच्या सुरुवातीला जोरदार धडक मारून आपण पुढे जाऊ शकलो तरी जोरदार प्रतिहल्ल्याला तोंड देऊ शकलो नाही तर पूर्वी होतो त्याहीपेक्षा जास्त मागे हटावे लागते. ९/ पंजाबला मागून कुणाचीही मदत नव्हती. मदत म्हणून पाठवण्यात येणाऱ्या दुसऱ्या तुकडीला ९/ पंजाबला येऊन मिळण्यासाठी कमीत कमी आणखी १५ दिवस लागले असते. अविचाराने आणि उताळेपणाने आपण जर प्रथम चिन्यांवर हल्ला केला असता तर मोठी झटापट होऊन चिन्यांनी भारतीय हद्दीत लुंपूपर्यंत आघाडी मारली असती. ९/ पंजाब या तुकडीचा विध्वंस झाला असता. पुढचा मागचा विचार न करता 'थाग-ला प्रदेशातून चिन्यांना हुसकून द्या... !' असा हुकूम दिला गेला. काय हा वेडेपणा !

आणि म्हणूनच हा हुकूम पाळायचे मी नाकारले. देशाच्या आणि लष्कराच्याच हितासाठी मी तो हुकूम ठोकरून दिला आणि त्याप्रमाणे डिव्हिजनल हेड क्वार्टरला कळवले. नशीब एवढेच की डिव्हिजनल हेड क्वार्टर माझ्याशी सहमत झाले आणि ईस्टर्न कमांडकडे त्यांनी हट्ट धरला की, 'या हुकमात बदल करा!' त्याच वेळी मी GOC ना इशारा दिला की, "रणक्षेत्राची पाहणी करून, नीट विचार करून काही आराखडा मनाशी निश्चित करण्यापूर्वीच जे जे हुकूम मला मिळतील, त्यातला एकही मी पाळणार नाही!" मी बाहेरच्या आणि आतल्या अशा दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी अशा तऱ्हेने लढत होतो. मी मिश्रांनाही बजावून ठेवले की, वरून येणाऱ्या हुकमांकडे दुर्लक्ष कर. फक्त मी काय सांगेन ते कर. भारतीय जवान आज्ञाधारक आणि शिस्तप्रिय आहेत. लढताना जिवाची पर्वा न करता ते लढतात याचा अर्थ त्यांना वाटेल तो हुकूम सोडावा हे मला सहन होत नव्हते.

घाईघाईने जेवण उरकून मी आणि मिश्रा 'चिन्यांना हुसकून द्या!' हा हुकूम कसा काय पाळता येईल याचा विचारविनिमय करण्यासाठी बसलो. चर्चेत एक गोष्ट स्पष्ट झाली की, मिश्रांच्या बटालियनला प्रचंड चिनी सैन्याला टक्कर देता येणे शक्यच नाही. त्यानंतर आम्ही आमच्या कंपनीला भेट द्यायला बाहेर पडलो. पूल क्रमांक २ जवळ कंपनी सेकंड–इन्–कमांड सुभेदार प्रतापसिंग यांची नि माझी भेट झाली. त्यांना आघाडीवर पाहून मी आश्चर्याने थक्क झालो. सुभेदार प्रतापसिंग या उमद्या आणि शूर इसमाने भारतीय सैन्यात एकूण २८ वर्षे नोकरी केली होती. त्यांपैकी बहुतेक काळ त्यांनी दुसऱ्या महायुद्धात आघाडीवर गाजवला होता तर स्वातंत्र्य मिळाल्यावर सेवानिवृत्तीचा काळ येईपर्यंत भारताच्या अवाढव्य सीमेचे ते संरक्षण करीत होते. ते सेवानिवृत्त झाले म्हणून तावांगमध्ये त्यांचा निरोप समारंभ पार पडला, तेव्हा मी स्वतः हजर होतो. एवढेच कशाला? मिसमारी रेल्वे स्टेशनवर ते मीरतला जाणाऱ्या गाडीची वाट पाहत उभे असतानादेखील त्यांची माझी गाठ पडली होती. असा पेन्शनीत गेलेला हा म्हातारा एकदम आघाडीवर कसा काय? मला राहवेना. मी त्यांना विचारले, "हे काय? तुम्ही मीरतला ना जाणार होता? तुम्ही आता इथे कसे काय?" यावर काय उत्तर द्यावे प्रतापसिंगांनी? सुभेदार प्रतापसिंग म्हणाले, "साहेब! ही काय वेळ आहे का पेन्शनीत जायची? माझी बटालियन युद्धात गुंतण्याची शक्यता असताना मी काय घरी स्वस्थ बसू?" सेवानिवृत्त झाल्यानंतरदेखील सुभेदार प्रतापसिंग स्वखुशीने परत लष्करात आले होते. एवढेच नव्हे, त्या वयात शेकडो मैल चालत जाऊन ते नामका–चूपर्यंत आघाडीवर गेले होते. देशभक्ती आणि कर्तव्यदक्षता यांचे सुभेदार प्रतापसिंग हे चालते बोलते उदाहरण आहे.

दुसऱ्या एका पोस्टवर मी चहा पिण्यासाठी थांबलो. चहा मला स्वतःला नको होता. जवानांबरोबर कमांडरने चहा घेतला तर वातावरण चांगले निर्माण होते.

त्यांच्याबरोबर चहा घ्यायला मिळावा म्हणून मी थांबलो. मला एक पेलाभर साखरेचा चहा दिला गेला. मला अभिमान वाटला ! कारण मला ठाऊक होते की गेले कित्येक दिवस त्या जवानांना साखर पुरवली गेलेली नाही. ते जवान इतके दिवस मिठाचा चहा पिऊन दिवस काढत होते. तरीदेखील कुणी तक्रार करीत नव्हता. ' मागणे लई नाही ' ही भारतीय जवानाची वृत्ती असते आणि तो जे काही थोडे मागतो तेदेखील जरी त्याला मिळाले नाही तरी त्याला चिंता नसते ! असेल ते पुरवून केवळ दिवसच नव्हे तर सणदेखील साजरा करतो बिचारा. याच गुणाचा नालायक स्टाफ ऑफिसर्स गैरफायदा उठवतात. जवान तक्रार करीत नाही ना ? मग राहू दे तो उपाशी ! याच पोस्टवर मी हेही पाहिले की काही पंजाबी भात शिजवताहेत. वस्तुतः, भात हा पंजाबी आणि डोग्रा लोकांचा आवडीचा पदार्थ नव्हे. उत्तर हिंदुस्थानातल्या लोकांना चपात्या लागतात. साहजिकच मी चौकशी केली त्यावर सरदारजींनी मला जबाब दिला की "पोळ्या करायच्या म्हणजे तवे आणावे लागले असते. कशाला उगाच एका माणसाची शक्ती फुकट घालवायची. तोच मनुष्य त्यापेक्षा एखादी दारूगोळा भरलेली पेटी जास्त आणू शकेल." ९/ पंजाबचे पंजाबी पहिले ५ दिवस अक्षरशः फक्त मीठ-भातावर होते. देशासाठी ज्यांनी वासना मारून हिमालयासारख्या प्रदेशात हाल सोसले ते पंजाबी खरोखरच धन्य होत !

१८ सप्टेंबरला भारत सरकारचा एक अधिकारी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना माहिती देत होता की "नेफामधून चिन्यांना हुसकावून देण्याचा हुकूम भारतीय सेनेला देण्यात आलेला आहे." आघाडीवरची परिस्थिती, आपली ताकद आणि आपली साधनसामग्री यांबद्दल बेपर्वा राहून आपले सरकारी अधिकारी, मंत्री आणि आर्मी चीफसुद्धा चिन्यांशी आपण तुल्यबल सामना करू शकतो की नाही याचा विचार न करता भराभर निर्णय घेत होते. ज्यांना आघाडीची चांगली माहिती होती, आपल्या लष्करी ताकदीची पूर्ण कल्पना होती, अशा जुन्या आणि जाणत्या लष्करी अधिकाऱ्यांशी या बाबतीत चर्चा करण्याची कुणाला आवश्यकता वाटत नव्हती.

दोन महान देशांच्या सेना आता समोरासमोर उभ्या होत्या. मधून फक्त नदी वाहत होती. आज ना उद्या ठिणगी पडून युद्धाचा वणवा पेटणे अपरिहार्य होते. भेसूर पार्श्वभूमीवर एक अभूतपूर्व आणि अनैसर्गिक परिस्थिती लढाईच्या क्षणाची वाट पाहत उभी होती. भारतीय प्रदेशात जिथे जिथे म्हणून चिनी दिसतील तिथे तिथे त्यांच्यासमोर जाऊन उभे राहा, या हास्यास्पद रचनेचा हा भयंकर परिणाम होता. लोंगजू आणि किझमाने या ठिकाणी चिन्यांनी भारतीय जवानांना जसे नुसतेच ढकलून दिले होते, तसाच प्रकार ते इथे करणार होते ? वादळापूर्वीची शांतता होती ती. आपण सावध राहून प्रत्येक पाऊल विचाराने टाकायला हवे होते. त्यावर लढाईचे भवितव्य अवलंबून होते.

२० सप्टेंबरला मी माझ्या रणक्षेत्राची पाहणी करण्याच्या कामातली शेवटची फेरी मारली. आणखी चिखल तुडवीत मी पूल क्रमांक ३ व ४. जवळ गेलो. वाटेत मोठमोठे उतार होते. जपून चालावे लागत होते. सामानासकट तोल सांभाळणे हा एक पराक्रमच होता. पूल क्रमांक १ ते पूल क्रमांक ३ हे अंतर एक दिवसाच्या वाटचालीचे आहे. म्हणजे लुंपू या आपल्या रसद खाली टाकण्याच्या ठिकाणापासून पूल क्रमांक ३ हा ३ दिवसांच्या अंतरावर होता. हमाल मिळवायचे कसे आणि शक्यतो लवकर जवानांना अन्न पोचवायचे कसे हा प्रश्नच होता.

घोला या ठिकाणी मेजर चौधरी, कमांडर ऑफ पंजाब कंपनी आणि घोलाचा ज्युनियर कमिशंड ऑफिसर या दोघांना भेटलो. आसाम रायफल्सला आधार देऊन त्यांचे नीतिधैर्य वाढविणे हे पंजाब कंपनीचे प्रमुख काम होते. ८ सप्टेंबरला घोला येथे घडलेला प्रकार व JCO कडून आलेला संदेश याबाबतीत मी JCO (ज्युनियर कमिशंड ऑफिसर) कडे विचारणा केली. त्याने लगेच कबुलीजबाब दिला की, " लवकर मदत मिळावी म्हणून त्याने आत घुसलेल्या चिनी सैनिकांच्या संख्येत वाढ करून सांगितली असण्याची शक्यता आहे. "

JCO पुढे म्हणाला, " ६०० ते १२०० असा आकडा सांगेन तेव्हा त्याचा काहीतरी परिणाम होऊन मदत मिळेल असे मला वाटले. सुरुवातीलाच मी फक्त ६० चिनी घुसलेत असे सांगितले असते तर मला आणखी कुमक मिळाली नसती. उलट आहेत ते जवान बरोबर घेऊन मलाच एकट्याला लढायचा हुकूम मिळाला असता. "

JCO ने चिंतेत पडावे याला दुसरेही एक कारण होते. चिनी प्रचंड संख्येने येऊन गडबड करतील या शंकेने त्याच्या मनात घर केले होते. आठवड्यापूर्वी त्याचे काही जवान घोलाहून किंझमाने या ठिकाणी पगार घेण्यासाठी म्हणून जात होते. वाटेतच चिनी सैनिकांनी गाठून त्यांना दमदाटी केली होती की " थाग-ला हा प्रदेश चिनी हद्दीत येतो. इथून चालते व्हा. नाहीतर जबरदस्तीने फेकून देऊ तुम्हांला भारतीय प्रदेशात !" हा प्रसंग JCO च्या मनात ताजा असतानाच ८ सप्टेंबरला चिनी सैनिक घोलावर चाल करून आले. साहजिकच JCO ला वाटले की चिनी त्यांची धमकी पूर्ण करण्यासाठीच आले. आता बहुतेक ते आपला फडशा पाडणार. मी JCO ला दोष देत नाही. मला त्या बिचाऱ्याची दया आली. त्यालाच कशाला? कुणाचीही मदत नसताना मी जरी असा एकटा पडलो असतो आणि समोरून ६०–७० चिनी एकदम येताना पाहिले असते तर माझीसुद्धा तशीच घांदल उडाली असती.

जमिनीची पाहणी करीत असतानाच माझ्या लक्षात आले की घोला हे ठिकाण लष्करी दृष्ट्या यूसलेस आहे. तिथे लढणे चिन्यांना अधिक सोपे आहे. आपले जवान मात्र उंदरांनी सापळ्यात जावे तसे आत शिरलेले आहेत. आवाज व्हायची खोटी ! चिनी टिपून मारतील एकेकाला. घोला या ठिकाणी जायला रस्ता चांगला

नव्हता. प्रतिहल्ला जोरदार आला असता लुंपूपर्यंत चिनी सहज धडक मारू शकणार होते. कारण आपली तटबंदी अभेद्य नव्हती. पण ते काही जरी असलं तरी धोला हे ठिकाण प्रतिष्ठेचे बनले होते. फॉरवर्ड पॉलिसीखाली तिथे पोस्टस निर्माण झाली होती...आणि काहीही करून धोला चिन्यांच्या कबजात जाऊ देऊ नका, असा हुकूम सुटला होता. धोला आहे त्या परिस्थितीत लढवणे या शिवाय दुसरा कुठला पर्यायच आमच्यासमोर नव्हता.

आत आलेल्या चिन्यांवर हल्ला करण्याची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीनेदेखील धोला हा प्रदेश अयोग्य होता. एकापाठोपाठ एक उभ्या असलेल्या चिनी सैनिकांचे तीन थर मला स्पष्ट दिसत होते. चिनी सैनिकांची पहिली रांग होती ती नामका–चू नदीच्या पलीकडच्या काठावर, आपल्या जवानांच्या बरोब्बर समोर! त्यांच्या पाठीमागे थाग-ला प्रदेशात जिथे थोडासा उतार होता त्या उतारावर त्यांची दुसरी रांग होती आणि त्यांच्यामागे थाग-ला प्रदेशात उंचावर चिनी सैनिकांची तिसरी रांग होती. जिला मी रांग असा शब्द वापरालाय त्या प्रत्यक्षात रांगा होत्या. प्रत्येकाच्या हातात मशिनगन्स होत्या. मागच्या कमी वृक्षाच्छादित प्रदेशात तोफा लावून ठेवलेल्या दिसत होत्या तर त्यांच्या तोफा 'थंड' करण्यासाठी आपल्या जवानांजवळ हातातल्या जुन्या बंदुका सोडल्या, तर दुसरे काहीच नव्हते. ज्या ठिकाणी माणसे धडपणे जाऊन पोचायची मारामार तिथे प्रचंड तोफखाना न्यायचा कसा ?

आपले सांगधर (Tsangdhar) हे ठिकाण लढाईच्या दृष्टीने त्यातल्या त्यात बरे होते. थाग-लाच्या दक्षिणेकडे ३,००० ते ४,००० यार्डांवर असलेल्या या ठिकाणी उंचावर ५०–६० यार्ड रुंद आणि १२० यार्ड लांब असा सपाट प्रदेश होता. कर्नल मिश्रांनी मला सांगितले की, डाकोटा विमानाने त्या सपाट पट्ट्यावर रसद टाकता येईल. पुढे त्यांनी मला विनंती केली की, लुंपू या ठिकाणी टाकली जाणारी रसद जवानांना आघाडीपर्यंत आणून पोचवणे एकतर त्रासाचे आहे आणि शिवाय त्यासाठी ७ दिवस लागतात. वेळ आणि कष्ट वाचवण्यासाठी सांगधर या ठिकाणीच विमानाने रसद टाकली जाईल, यासाठी तुम्ही खटपट करा.

कर्नल मिश्रांनी सरळपणाने आणि निष्पाप मनाने केलेल्या विनंतीचा भलताच अर्थ लावला जाईल, असा विचारदेखील माझ्या मनात आला नाही. आशावाद ज्यांच्या मनात दृढमूल झाला होता अशा प्रत्येक व्यक्तीची या विनंतीने गैरसमजूत करून दिली की, सांगधर या ठिकाणी कशीही रसद टाकली तरी ती जवानांना मिळेल. नेहमीप्रमाणे घाईघाईने चुकीचे आदेश दिले गेले. विमानांतून खाली टाकली जाणारी रसद फेअर चाइल्ड पॅकेटस वापरण्याची (Fair child Packets) C 119 एअर फोर्सवर सक्ती केली गेल्यामुळे दरीत जाऊन पडली आणि अशा खोल दरीत की तिथून ती पॅकेटस परत आणता येणे शक्य नव्हते.

बंदुका आणि दारूगोळा जवानांना मिळण्याऐवजी दऱ्याखोऱ्यात जाऊन पडला. मी अस्वस्थ झालो. एअर ड्रॉप्स आहेत की वाइल्ड ड्रॉप्स आहेत, असा मला प्रश्न पडला. समोरून चिनी ते ड्रॉप्स बघत होते. त्यांचा पक्का समज, म्हणजे गैरसमज, झाला की, भारताची चांगलीच तयारी चालू आहे ! आजूबाजूला दऱ्या असताना पिशव्या खाली टाकताना फार काळजी घ्यावी लागते. आपण कसाही माल फेकला तरी जवान तो वाचवतील या भरंवशावर राहण्यात अर्थ नसतो.

लुंपू येथे परत जाण्यापूर्वी पूल क्रमांक १ जवळ मी एक रात्र वस्ती केली. कर्नल मिश्रांनी तिथला प्रदेश, हवामान, चिनी सैनिकांची मांडणी, तुलनात्मक बलाबल या बाबी स्पष्ट करणारा साद्यंत अहवाल लिहून काढला.

२० सप्टेंबर १९६२ ! रात्रीचे १०।। वाजले असावेत. पूल क्रमांक २ पासून अवघ्या काही यार्डांवर असलेल्या आपल्या चौकीवर पलीकडून एका चिन्याने ग्रेनेड फेकली. स्फोट झाल्याचा आवाज ऐकल्याबरोबर आपल्या जवानांनी गोळीबार सुरू केला. नामका-चू नदीच्या पलीकडच्या तीरावरून चिनी सैनिकांनीदेखील गोळीबार सुरू केला. दोन्हीकडून गोळागोळी सुरू झाली. आपले पाच जवान जखमी झाले तर चिन्यांपैकी २ ठार झाले आणि २ जखमी झाले.

चीन-भारत संबंधांचे पहिले पर्व संपले होते. २० सप्टेंबरपासून दुसऱ्या अंकाला सुरुवात झाली होती. दोन लष्करी शक्तींचा झालेला हा सरळ सरळ सामना आणि गोळीबार म्हणजे ' सरहद्दीवरचा प्रकार ' नव्हता. थाग-ला प्रदेशातून चिन्यांना हुसकावून देता येणे शक्य नाही हे ठाऊक असून आपल्याला त्यांना हुसकून द्यायचा प्रयत्न करायचा होता. उलट चिनी भारतीय जवानांवर आरोप करीत होते की, ' तुम्ही चीनच्या हद्दीत घुसला आहात. मागे जा ! ' हे असे फार काळ चालू शकणार नव्हतेच. २० सप्टेंबरच्या गोळीबाराने इशारा दिला की, आता फार मोठी लढाई अटळ आहे.

२२ सप्टेंबरला दुपारी १ वाजता मी लुंपूला पोचलो. तिथे माझे मित्र पोलिटिकल ऑफिसर श्री. मोंगिया यांची आणि माझी गाठ पडली. मोंगिया मला म्हणाले की, " थाग-ला प्रदेशात भारतीय हद्दीत चिन्यांनी जे अतिक्रमण केलं आहे त्या बाबतीत चिनी मुलकी अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी म्हणून मी खरा इथं आलो होतो. पण चिन्यांची उद्धट वृत्ती पाहून ' वाटाघाटी करू नको ' असा हुकूम मला देण्यात आला आहे. "

श्री. मोंगिया हे पूर्वी लष्करी अधिकारीच होते. नेफा फ्रँटियरवरची ही नोकरी त्यांनी म्हणूनच पसंत केली होती. १९४७ ते ४९ मध्ये इंडियन मिलिटरी अॅकेडेमीत मी इन्स्ट्रक्टर असताना ते माझे विद्यार्थी होते. आमचे संबंध अतिशय चांगले होते. त्यांनी मला एक आनंदाची बातमी सांगितली की, जवानांच्या सोयीसाठी सुमारे ५०० हमाल मिळवण्यात ते यशस्वी झालेले आहेत. कारण लष्कराच्या मागण्यांच्या

कामांना हल्ली अग्रहक्क दिला जातो. आमच्या दोघांच्या चर्चेत शेवटी असे ठरले की, आता प्रत्यक्ष गोळीबाराला सुरुवात झालेली असल्यामुळे सर्किम (Serkhim) च्या पुढे या हमालांना नेणे शहाणपणाचे नाही.

माझ्या परतीच्या प्रवासात वाटेत अनेक ठिकाणी आपल्या आघाडीवरच्या बटालियनला जाऊन मिळण्यासाठी चाललेले ९/ पंजाब या तुकडीचे जवान भेटले. मिसमारीपासून ते स्वयंस्फूर्तीने चालत आलेले होते. त्यांचे कॅनव्हासचे बूट फाटलेले होते. रबराचे तळवे निसटून खलास झाले होते. कुणी तक्रार करीत नव्हता. उलट प्रत्येक तशाही स्थितीत आनंदी आणि उत्साही दिसत होता. त्यांना हे खरोखरच भूषणास्पद होते. मला त्यांचा अभिमान आणि कौतुक वाटले. त्यांची जरा थट्टा करावी म्हणून मी त्यांना गमतीने म्हटले, " रजा रद्द करून घेऊन जाण्याइतके थाग-ला हे ठिकाणं काही चांगलं नाही ! " त्यावर त्या हजरजबाबी जवानांनी त्याच थट्टेच्या स्वरांत मला उत्तर दिले की, " तुम्हीसुद्धा तुमची रजा रद्द करून थाग-लाला जाऊन मजा मारून आलात ! आता आम्ही जाऊन बघतो जरा कसे काय वाटते ते ! "

आपल्या जवानांच्या कर्तव्यदक्षतेची आणि उत्साहाची ती पावती होती. त्यांच्याकडे कौतुकाने बघत बघत त्यांच्यापासून दूर जात असताना आपल्या जवानांवर केल्या जाणाऱ्या दुष्ट आरोपांपैकी, ' आपले जवान चांगले लढत नाहीत, ' असली बेताल बडबडीची वाक्ये इच्छेविरुद्ध माझ्या कानांत गुणगुण करू लागली. माझ्या कटुस्मृती चालवल्या गेल्या. मनात म्हटले, ' कशाला जवानांबद्दल बोलून तोंडाची वाफ दवडलीत ? इथे, या आणि प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहा आपले जवान कसे आहेत ते ! '


२० सप्टेंबरलाच आर्मी कमांडरने भारत सरकारला कळवले होते की, " २४ सप्टेंबरपर्यंत धोला प्रदेशात आपली दुसरी बटालियन पोचेल. आणि २९ सप्टेंबरपर्यंत तिसरी बटालियन तिथे पोचली की आपली एक ब्रिगेड तयार होऊन त्या प्रदेशात आवश्यक ती जमवाजमव करण्याचं काम पूर्ण होईल. "

आर्मी कमांडरने सरकारला दिलेल्या या आश्वासनाबाबत मला मात्र काहीच कल्पना त्या वेळी नव्हती.

(क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

# हा प्रश्न मुळींच
# "गुंतागुंतीचा" नाहीं..!



"प्रकाशचें माक्याचें तेल" हा त्यावर साधा, सरळ आणि खात्रीचा उपाय आहे. तें नियमित वापरण्यास सुरुवात करा आणि पहा .... हा प्रश्न कधीं उद्‌भवलाच नाहीं, असें आपणांस वाटेल! केंस गळावयाचें तर थांबतिलच, शिवाय तजेलदार, निरोगी नि लांबसडक केशसंभार आपल्या सौंदर्यांत मोलाची भर घालील.

## प्रकाशचें
# माक्याचें तेल



**प्रकाश ट्रेडिंग कंपनी**
गोखले रोड (नॉर्थ) दादर, मुंबई २८

कुठल्याशा खेडेगावामधली एक जत्रा.

गडबड...गरगर...गर्दी...गोंगाट...

त्या गोंगाटातूनच प्रथम अत्यंत अस्पष्टपणे ऐकू येतात ते सारंगीचे स्वर. आसावरी रागातले. आणि नकळत गोंगाटाचा विसर पडतो. सारंगीचे स्वरच तेवढे काळजाला जाऊन बिलगतात. नजर गर्दीवरून सरकत सरकत किंचित दूरवरच्या एका डेरेदार वृक्षाकडे येते. झाडाखाली लोकांचे एक कोंडाळे. ध्यानात येते की, देहभान विसरायला लावणारी सारंगीची सुरावट इथूनच येतेय्. आणि अचानक नजरेला पडते, ती त्या तल्लीन कोंडाळयात सारंगीच्या सुरावर स्वतःला विसरून नाचणारी सात–आठ वर्षांची एक गोड छोकरी...

कोवळी...निष्पाप आणि अतीव निरागस...

तिचे पदन्यास आणि सारं नृत्यच सारंगीच्या सुरांत विरघळून गेलंय्. गीतांचे शब्द नृत्याशी एकरूप झालेत. 'नाही कान्ता, ना मी दुहिता, अनुजा मी कोणाची, मीरा गिरिधर गोपाळाची.'

स्वर, शब्द, भाव, लय, छायाप्रकाश या साऱ्यांचा कसा एक सुंदर गोफ विणला जातोय्, आणि म्हणूनच नकळत प्रेक्षकांच्या तोंडून 'आहा'ची दाद निघून जातेय् आणि असं हे कमालीचं सुंदर आणि कलापूर्ण दृश्य आहे, 'रंगू बाजारला जाते' या चित्रपटामधलं. अगदी प्रारंभाचेच–

म्हणजे या निर्मात्यांची कमालच आहे. ग्रामीण नृत्यसंगीतप्रधान म्हणून गाजावाजा केलेल्या चित्रांचा प्रारंभ इतका सुरेख ! इतका कलापूर्ण ! ! खरे म्हणजे अशा चित्रपटाची सुरुवात ही खाण्खाण् वाजणाऱ्या हलगीच्या नाहीतर ढोलकीच्या आवाजावर झाली पाहिजे, असा मुळी कायदाच या क्षेत्रातील बुजुर्गांनी पास करून

# चित्रपट



## रंगू बाजारला जाते

अजय ब्रह्मनाळकर



भैरूच्या तमाशात नाचणारी रंगू (सुषमा)

ठेवलाय. पण हे सारे विचार, त्या कोवळ्या मुलीच्या निरागस नृत्यांत विरून जातात खरोखर दृष्ट लागावी इतक्या सहजपणाने ही चिमणी मीरा–सारंगी–नाचत असते. आणि लागतेच. सारंगीच्या नृत्यकौशल्याला भैरूची विषारी नजर लागते। फडा काढून उभ्या राहिलेल्या नागासारखा भैरू कोंडाळ्यात उभा असतो. ही पोरगी मोठी झाल्यावर तमाशात किती फाकडू नाचेल या कल्पनेने तो हरखून जातो आणि पाळत ठेवून, रात्रीच्या वेळी भैरू तिला पळवून नेतो. वाढवतो. नाच-गाणे शिकवतो. आसुडाच्या फटक्याच्या तालावर सारंगीचे नृत्य सुरू होते. आणि भैरू तमाशाचा फड उभा करतो.

भैरूच्या तमाशात नाचणारी ही रंगू आता तमाशात पदार्पण करते. जगाच्या दृष्टीने तमाशातली 'रंगू' असणारी ही मुलगी, अंतर्यामी अजून सारंगीच असते. लहानपणीच्या आठवणी, पित्याच्या सारंगीमधून स्रवणारे प्रेमळ सूर तिने या तमाशाच्या धांगडधिंगाण्यातही काळजाशी जपून ठेवले आहेत. पित्याच्या ताटातुटीचे दुःख अजून तिच्या काळजाला चरचरून यातना देत आहे. आणि तरीही ती ओठांतून लावणीचे स्वर उधळीतच आहे. भैरूच्या धारदार फरशीच्या आणि त्याहून धारदार नजरेच्या जरबेने, तिची पावले बोर्डावर नाचताहेत. एखाद्या कळसूत्री

बाहुलीसारखी... असहायपणे ...

आणि एक दिवस स्वतःशीच विचार करीत पाणवठ्यावर चालली असताना, तिची आणि नुकत्याच गावात येऊन दाखल झालेल्या श्रीरंग पाटील ह्या उमद्या देखण्या तरुणाची नजरानजर होते. एकाएकी तारा झंकारतात. या कळसूत्री बाहुलीत अचानक जीव येतो. रंगूच्या निष्प्रेम, निष्प्राण जीवनाला एक नवा अर्थ येतो.

रंगू श्रीरंगाच्या प्रेमात आकंठ बुडून जाते.

आणि हे ध्यानात येताच भैरू मांगाची विषारी फरशी श्रीरंगाच्या दिशेने सरसावते. पण प्रत्यक्षात जेव्हा गुंडांनिशी भैरू श्रीरंगावर हल्ला चढवतो, तेव्हा भैरूच आपल्या सगळ्या भाडोत्री साथीदारांसकट घायाळ होतो. रक्तबंबाळ अवस्थेत तो दवाखान्याच्या दारात येतो. पण साथीदारांची नजर चुकवून रक्तबंबाळ अवस्थेत तो नाहीसा होतो. साथीदार बोभाटा करतात, श्रीरंगाने भैरूचा खून करून त्याच्या प्रेताचाही निकाल लावला. अर्थात श्रीरंगावर फौजदारी पकडवॉरंट सुटते. अशा आणीबाणीच्या प्रसंगांतही श्रीरंगाचा मामा एखाद्या डोंगरासारखा त्याच्या पाठीशी उभा राहतो. रंगू तमाशात नाचणारी पोरगी आहे हे माहीत असूनही, तो श्रीरंगाचे रंगूशी लग्न लावून देतो. पोलिसांच्या पकडवॉरंटाची धाड चालून येत असल्याच्या छायेतच हे लग्न लागते आणि दुसऱ्याच क्षणी श्रीरंगाच्या नशीबी फरारी होणे येते. जंगलाच्या जाळीतून आणि डोंगराच्या घळीतून पोलिसांचा पाठलाग चुकवीत तो पळत राहतो.


फरारी होण्यापूर्वी रंगूला अंबराईमधल्या एका बंगलीत ठेवण्याची श्रीरंगाने व्यवस्था केलेली असते. पण त्यामुळेच सगळी अंबराई आता पोलिसांच्या रोखल्या बंदुकांनी वेढली जाते. आणि तरीही एखाद्या ढाण्या वाघाच्या बेडरपणाने आणि चित्त्याच्या चपळाईने श्रीरंग रंगूला भेटून जातच असतो. मेला म्हणून समजला गेलेला, पण डूख धरून लपून राहिलेला भैरू, एक दिवस रंगूला डंख करण्यासाठी जंगलातून सरपटत अंबराईतल्या बंगलीत येतो. श्रीरंगाची वाट पाहत रंगू एका खिडकीशी उभी असते. तिच्या पाठमोऱ्या आकृतीच्या दिशेने भैरूची कुऱ्हाड उंचावली जाते. त्याच क्षणी रंगूला भेटण्यासाठी आलेल्या श्रीरंगाच्या बंदुकीतून निघालेल्या गोळीने भैरू अचूक टिपला जातो. आणि हा सारा प्रकार घडतो, तोही नेमका श्रीरंगाच्या पाठलागावर आलेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या नजरेसमोर. श्रीरंगाभोवतीच्या कायद्याच्या शृंखला गळून पडतात. आणि भैरूच्या विषारी पंजातून मुक्त झालेली रंगू श्रीरंगासकट गाडीत बसून अंबराईबाहेर निघून जाते. पण आता बाजाराला नव्हे तर आपल्या श्रीरंगाबरोबर नांदायला ! एका मागोमाग कोसळलेल्या संकटाचे विष पचविलेली ही मीरा अखेर आपल्या श्रीरंगाशी एकरूप होते. आणि...

... आणि चित्रपट संपतो.

तसे पाहिले तर चित्रपटाची कथा काहीशी पारंपरिक आणि चाकोरीमधलीच.

पण शिवकान्त पवार आणि मोहन कुंभोजकर या दोन तरुण आणि नव्या उमेदीच्या दिग्दर्शकांनी अशा काही सफाईने आणि ताजेपणाने ती पडद्यावर सादर केली आहे की, सध्या बाजारात चालू असणाऱ्या असंख्य ग्रामीण लावणी-पटांहून हा चित्रपट एकदम वेगळा वाटावा. काही तरी चांगले, कलात्मक पाहत असल्याची जाण प्रत्येक प्रसंगातून होत राहावी.

संगीत दिग्दर्शक श्री. बाळ पळमुले यांच्या भावपूर्ण स्वररचनेने चित्रपटामधल्या अभंगापासून लावण्यांपर्यंत सर्वच गाण्यांना एक आगळीच मजा आली आहे. ऐन लावणी गीतांनादेखील त्यांनी मधून मधून शास्त्रीय संगीतातील मधुर सुरावटीचा साज चढविला आहे. म्हणूनच इतरत्र एकसुरी आणि कर्णकर्कश वाटणारी 'लावणी' 'रंगू...'त एक वेगळेपण दाखवून जाते. वाईट इतकेच वाटते की, या गुणी आणि प्रतिभासंपन्न स्वररचनाकाराला, आपल्या सुरेल स्वरवेली फुलविण्यासाठी शब्दांचा


बृन्हमुंबईकरिता वितरक

मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को., १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स, १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

मांडव मिळावा तसा मोहोरदार मिळाला नाही. संपूर्ण चित्रपटामधील 'मी मीरा गिरिधर गोपाळाची'. हा एक अभंग सोडला तर इतर सर्व गीतांची रचना अत्यंत सामान्य वाटते; तरीही पळसुल्यांनी अशा ताकदीने एकजात सगळ्या गीतांना धून दिली आहे, की शब्दांचा विसर पडून गाणी मनाला धुंद करून सोडतात.

कथेमधल्या व्यक्तिरेखा जिवंत करणाऱ्या मंडळींत वसंत शिंदे, जयशंकर दानवे आणि बर्चीबहाद्दर ही तीन नावे सोडली तर एकजात सगळे कलावंत नवे आहेत. (पण म्हणूनच असेल कदाचित) या नव्या चेहऱ्यांची करामत बघताना खूप टवटवीतपणा जाणवतो. 'सुषमा' या गुणी मुलीचे नायिका म्हणून पडद्यावरचे पहिलेच पाऊल, पण तिने ते इतक्या सहजपणाने आणि तरीही आत्मविश्वासाने टाकले आहे की, ही नटी निदान मराठी चित्राचे क्षेत्र लौकरच पादाक्रांत करणार यात कुणाला शंकाच वाटण्याचे कारण नाही. आपल्या वाट्याला आलेली भूमिका केवळ तमाशातल्या नाचणारणीची नाही, तर मूळच्या एका खानदानी कलासक्त मुलीची नाइलाजाने नाचणारीण झालीय्, याचे भान या नटीने कुठेही नजरेआड केले नाही.

नाना सांबारे (शिवराममामा) आणि अरुण नाईक (श्रीरंग) या नव्या उमेदीच्या दोन नटांनी आपापल्या भूमिका कमालीच्या तडफेने आणि नेटकेपणाने उभ्या केल्या आहेत. कुठे कुठे तर ही नवी माणसे जुन्या जाणत्यांच्या पारंपरिक सांकेतिक अभिनयाला मागे टाकून जातात. विशेषतः, श्रीरंगाच्या भूमिकेने अरुण नाईक (–सरनाईक नव्हे) यांनी मराठी चित्रपटाला एक नवा ग्रामीण हीरो दिला आहे.

चित्रपटाची तांत्रिक बाजूही उल्लेख करण्याजोगी निर्दोष आणि सुरेख वाटते. बहुतेक सर्वच दृश्यांचे चित्रीकरण सरळ सरळ उघड्यावर केलेले. नदीचा पाणवठा म्हणजे खराखुरा नदीचा पाणवठा. शहराचा बाजार, खेड्यातला वडाचा पार, चावडी या साऱ्या दृश्यांवरून जयवंत मोईटे आणि बी. मिरजकर यांचा कॅमेरा कमालीच्या सहजपणाने फिरला आहे. कुठेही खास कोन साधण्याचा अट्टाहास नाही. त्यामुळेच संपूर्ण चित्रपटात खोटेपणा कुठेही जाणवत नाही.

गंगाराम माथेफोड यांचे संकलन मूळ दिग्दर्शनाला संपूर्ण साथ करणारे. त्यामुळे संपूर्ण चित्रपट पाहताना एक कमालीचा ईझ मनाला आणि डोळ्यांना जाणवतो.

तसे चित्रपटात दोष नाहीत असे नाही. कथानकाची बंदिश याहून चांगली व्हायला अवसर होता; तरी पण एकूण चित्रपटाच्या आशयाच्या आविष्काराचा टवटवीतपणा मनाला अशी भुरळ घालून जातो की, उणिवा जाणवूनही तिकडे दुर्लक्षच होते.

आणि चित्रपट संपवून थिएटरबाहेर पडताना वाटते, चांगल्या चित्रपटांचा जुना जमाना संपला, प्रभातचे विनायकांचे युग नाहीसे झाले, म्हणून हळहळणे काही खरे नाही. नव्या नव्या माणसांमधली टॅलेंट धडपडत पुढे येतेय्. कुणी सांगावे, या नव्या टॅलेंटमधूनच एखादा नवा 'माणूस' साकार होईल. ■■

# वन्ना पार्टी रंडा कॉफी !

पान ३६ वरून

---

काय, पेपरवेटशिवाय काम होत नाही. पेपरवेट नसेल तर कागद उडून जातात. कॉंग्रेसच्या राज्यात पेपरवेट नसत अशातली बात नाही. पण त्यांचे काम सारे At the higher level चाले. सामान्य माणसास त्याची झळ प्रत्यक्ष कधी लागत नसे. कॉंग्रेसच्या अधिवेशनात दहावीस लाख खा, एखादा बंध बांध व त्यात एखादा लाख उकळ, कोणास कॉंट्रॅक्ट देवव व त्यातून असे मोठे कमिशन खा—असले प्रकार पूर्वी चालत. आज कम्युनिस्टांच्या राज्यात विधायक कामे होतात कुठे ? साराच विध्वंस. सारेच कंगाल. किती खाऊ अन् कसे खाऊ अशी घाई झाली आहे सर्वांना. जे शंभर, दोनशे सुटले ते खरे. पक्षाचे नाव अन् व्यक्तीची सोय. काय नंबुद्रीपाद रडणार तेथे सांगा मला ! हळूहळू नंबुद्रीपादही घ्यायला नाही लागले म्हणजे मिळविली ! जांभई, लघवी व लाच हे सामाजिक साथीचे रोग चटकन् पसरणारे आहेत म्हणून ही भीती व्यक्त केली.

एका कम्युनिस्ट मंत्र्यास मी म्हणालो, " अमेरिकेनं वेस्ट जर्मनीमध्ये डॉलर्स ओतून मार्शल प्लॅननुसार युरोपमध्ये आपली शोकेस उघडली. जपान अमेरिकन मदतीशिवाय आजच्या स्थितीपर्यंत येणं अशक्य होतं. चीन १९६० पर्यंत रशियानं केलेली मदत विसरू शकत नाही. रशिया किंवा चीन हे केरळचं जपान वा प. बर्लिन करू शकत नाहीत. याचा अर्थ केरळच्या लोकांतच काहीतरी चूक असावी. परदेशस्थ कम्युनिस्ट भारतात एक कम्युनिस्ट मॉडेल स्टेट करावे, यासाठी ही सुवर्ण संधी सोडण्याइतके निश्चित मूर्ख नाहीत. "

" खरं आहे तुमचं निदान. केरळ राजकीय दृष्टीनं त्यांना अस्थिर वाटतो ! "

सुशिक्षित लोक विचार करू शकतात हा एक मोठा शाप आहे. फार विचार करणारी माणसे कृतिशील होऊ शकत नाहीत. त्यांची स्थिती करू का नको असे म्हणणाऱ्या हॅम्लेटप्रमाणे होते. एका नंबुद्रीपादास विरोध करणारे दहा लोक त्यांच्या पक्षात आहेत. कोणी लाल, कोणी फिक्कट लाल तर कोणी गुलाबी. सारे स्वार्थी आहेत, एवढा कॉमन फॅक्टर. गौरी ही तेथील झाशीची राणी. अशी जहाल फटाकडी बाई आज जनसंघात नाही. कॉंग्रेसमध्ये तारकेश्वरी सिंहा दोन-चार तरी दिसतात.

ही गौरी थॉमस या नवऱ्यापासून वेगळी राहते. दोघेही लग्नाच्या बेडीने बांधलेले मंत्री " Peaceful co-existence " करू शकत नाहीत, इतरांची तर काय कथा सांगावी ? त्यामुळे फायदा एवढा होतो की, कोणाची गुपिते म्हणून शिल्लक राहत नाहीत. पक्षातले सहकारीच तुमची अंडीपिल्ली भर विधानसभेत बाहेर काढतात ! काँग्रेस पक्षाशी केवढे साम्य आहे या बाबतीत !

युनायटेड फ्रंटला काही अर्थ नाही असे चक्क दिसते. मार्क्सिस्ट, उजवे कम्यूनिस्ट, रेव्होल्युशनरी सोशालिस्ट, संयुक्त सोशालिस्ट, थोझीलाली, केरळ सोशालिस्ट पक्ष व मुस्लीम लीग या आठ घोड्यांचा हा जगन्नाथाचा रथ पुढेही जात नाही किंवा मागेही सरकत नाही. सारे घोडे खिकाळत आहेत. हिंदु महासभा व रामराज्य परिषद यांनी मनात आणले, थोडासा पैसा ओतला व समाजवादी धोरण जाहीर केले तर त्यांचाही ह्या मंत्रिमंडळात समावेश होईल अशी हमी मी देतो. गुण न आल्यास पैसे परत ! स्वतंत्र व जनसंघ यांनाही वांधा नाही. फक्त त्यांचे वारू काँग्रेसच्या उजव्या बैलांबरोबर बांधले जातील ! तूर्त सबुरीचा सल्ला. 'मोपलास्तान' ही तर जनसंघास वाहती गंगा मिळाली आहे. जनसंघाचा प्रचार लीग करीत आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. लीग थंडावली तर उजव्या जनसंघास मात्र बरेच जड जाईल या दरिद्री प्रांतात ! म्हणून जनसंघासाठी तरी 'मोपलास्तान झिंदाबाद' म्हटलेच पाहिजे.

केरळच्या डाव्या बिमारीवर मग औषध कोणचे ? औषध सोपे आहे पण वाघिणीच्या दुधाप्रमाणे ते मिळवून आणणे मुष्कील आहे. तेथे सर सी. पी. रामस्वामींसारखा कोणी पठ्ठ्या पाहिजे, इतर गबाळ्यांचे ते काम नोहे. पट्टम थाणू पिल्ल्यांसारखा कडक मुख्य मंत्री आज पुन्हा मिळणे मुष्कील. त्यांच्या आमदानीत मोपल्यांनी थोडी दादागिरी केली. पट्टम थाणू हा क्षत्रिय वंशीय. सूर्याचा वंशज. त्यांनी मशिनगनने उत्तर दिले. आज त्यांचे हाडूकदेखील सापडू शकलेले नाही. सारं समुद्रस्तुप्यन्तु ! आणि हे साहेब सेक्युलर व लोकशाहीच्या शांततेच्या मार्गाने जाणारे ! डॉ. लोहियांसारख्या घरच्याच समाजवाद्याने त्यांना पाठीत वार केल्यावर ते पिसाळून राजपाल होतील नाही तर काय करतील ?

केरळच्या रोगावर उपाय एकच. शंभर कारखाने उघडा. बेकारी नष्ट करा. लोकांना भरपूर भात व नारळ खायला द्या. आणि मग केरळचं सांस्कृतिक वैभव पाहून घ्या. " जपान किंवा जर्मनीपेक्षा जास्त विकास घडवून आणण्याचे कसब केरळात आहे. साहेब काही देव नाही. आम्ही साहेबापेक्षा बिलकूल कमी नाही. पंजाबचे उदाहरण नाही का डोळ्यांसमोर ? आणि गुजराथ ? आणि महाराष्ट्र ?

मला डॉ. राधाकृष्णन् आठवतात अशा वेळी. ते मला सांगत होते, " सुशिक्षित माणूस सैतानाचा अवतार असतो. त्याला सारखे कामात गुंतवा, नाहीतर बाटलीत अडकवून ठेवा. नाहीतर ? साक्षरो भवति राक्षसः ! "

आज नंबुद्रीपादांची मोठी दयनीय अवस्था झाली आहे. इतर काम नाही म्हणून घोषणा, मोर्चे, घेराव, संप. तेथील विधानसभेसमोर रोजच सत्याग्रह होतात, म्हणून तेथ आज सत्याग्रहींसाठी कायमची पक्की शेड बांधण्यात आली आहे. जगात असे दुसरे उदाहरण नाही ! सारेच विद्वान, साऱ्यांनीच 'दास कॅपिटल' कोळून प्यालेला. पण या वैयक्तिक मतामतांच्या गलबल्यात केरळात आज औद्योगिक धोरण नक्की होऊ शकत नाही.

केरळात वीज भरपूर आहे. पाणी दोन पावसाळे असल्यामुळे कमी पडत नाही. मनुष्यबळ ? नाहीतर दूर मुंबईत शिवसेना निर्माण का झाली असती ? ऑफीसातसुद्धा झोपायची तयारी आहे मल्याळी माणसाची ! आणि तरीही केरळात औद्योगिक विकास का नाही ? औद्योगिक विकासासाठी आणखी काय लागते ?

पैसा !

नंबुद्रीपाद व तेथील उद्योग मंत्री थॉमस मला सांगत होते, " केंद्र सरकार आम्हांस पैसा देत नाही. "

आणि खाजगी उद्योग यांच्या ' दास कॅपिटल 'च्या बांधणीत राहू शकत नाहीत !

मॅटर्निटी होम्स व त्यापुढे शाळा-कॉलेजे हे खरे केरळचे दोन मुख्य धंदे असे कोणीसे विनोदाने म्हटले आहे. विनोद सोडला तर केरळचे मुख्य धंदे तीन : हातमाग, काजू व काथ्या यांचे कारखाने. कम्युनिस्ट म्हणजे सारे वाचीवीर. त्यांना कारखानदारीचे बिलकूल ज्ञान नाही. मजुरांच्या हिताच्या घोषणा करणे म्हणजे उद्योग वाढविणे नव्हे. स्टालिनने सुरुवातीला हंटर मारून काम करवून घेतले मजुरांकडून तेव्हा कुठे आज रशियात औद्योगिक युग उगवले आहे. सत्ता टिकविण्यासाठी कम्युनिस्ट पुढारी आकाशातील चंद्र सोडून मजुरास सर्व काही द्यावयाची भाषा करतात, पण प्रत्यक्ष कारखाने नीट कसे चालतील, उत्पादन कसे वाढेल व विक्री कशी जास्त वाढेल, यांकडे जराही लक्ष देत नाहीत. दुर्दैवाने त्यांना ती दृष्टी आलीच नाही. ' मजूरदेवाय नमः ' खरे असले तरी ' यंत्रदेवाय नमः ' असे नमन केले हे पाहिजे. यंत्राकडे दुर्लक्ष केल्यास कुठला मजूर अन कुठले औद्योगिक विकासाचे मनोरे !

काजूच्या कारखान्यांचे उदाहरण घ्या. या उद्योगात कच्च्या मालाचा पुरवठा आफ्रिकेहून होतो. पक्का माल आपण परदेशी धाडतो. राष्ट्रीयीकरणाच्या धोरणामुळे आफ्रिकन राष्ट्रांनी कच्चा काजू भारतास धाडण्याचे बंद करावयाचे ठरविले आहे. इटालियन सरकारपासून आफ्रिकन देशांनी अद्ययावत् यंत्रसामग्रीदेखील विकत घेतली आहे. याचा अर्थ, केरळातील काजूच्या धंद्यावर पुढील वर्षा-दोन वर्षांत कायमची संक्रांत येणार ! काथ्याचा धंदा असाच मंदीत आहे. या उद्योगात पाच लाख माणसे काम करीत आहेत. नवीन लिनोलियमच्या टिकाऊ, आकर्षक व रंगीबेरंगी चटया वा सतरंज्या बाजारात येऊ लागल्यावर काथ्यास कोण विचारतो?

केरळमध्ये खुद्द भोर इंडस्ट्रीजचा माल जास्त खपतो ! सेल्स् प्रमोशन केले तर नॉव्हेल्टी म्हणून अमेरिकेत खपेलही हा माल. पण लक्षात कोण घेतो ? मी थॉमस साहेबांना विचारले, " रशिया का घेत नाही आपला काथ्या ?" त्यांना माझ्या प्रश्नाची खोच लगेच ध्यानात आली पण त्यांनी चूप बसायचे ठरविले. " नव्या सरकारने तीस निरनिराळे कारखाने उघडण्याचे ठरविले आहे, खाजगी उद्योगपतींची मदत घेऊन, " अशी त्यांनी माहिती पुरविली. त्यावर एका काँग्रेसी पुढाऱ्याचे भाष्य : " पण ते खाजगी उद्योगपती काँग्रेसचे राज्य केरळात यावयाची वाट पाहत आहेत ! "

हातमागाच्या धंद्यात असेच अस्थिर धोरण आहे. अमेरिकेत एके काळी ' ब्लीडिंग मद्रास ' हे कापड फार गाजले. पण अमेरिकेत फॅशन्स नटीच्या नवऱ्याप्रमाणे चार-पाच महिने टिकतात. सिनेमाप्रमाणे Next Change काय आहे हे आपण डोळ्यांत तेल घालून बघावयास नको काय ? पण हे कोणी करावयाचे ? Incentive शिवाय व्यापार वा उद्योग वाढू शकत नाही. दुर्दैवाने कम्युनिस्टांनी मजुरास डोक्यावर चढवून ठेवल्यामुळे मालकास मजुराची शिरजोरी आता नकोशी वाटू लागली आहे. धंद्यात व्याज साधारणतः दहा ते बारा टक्के सुटते. त्यापेक्षा फिक्स्ड् डिपॉझिटमध्ये पैसा गुंतवून सात टक्के व्याज खाल्ले तर काय वाईट ? निदान डोकेदुखी व ब्लड प्रेशर वाढण्याची शक्यता तरी कमी !

सारांश काय तर या मार्क्सच्या बच्च्यांना खाजगी व सरकारी उद्योगधंद्यांत काय करावे म्हणजे उत्पादन व विक्री वाढेल हे कळेनासे झाले आहे; पण शेतीत तरी त्यांनी काय दिवे लावले आहेत ? तेथेही अशीच बोंबाबोंब आहे. शेतकरी व कामगारांच्या उद्धाराची भाषा काढणारे हे साम्यवादी पुढारी ! शपथ आहे त्यांना शेतीची अक्षरओळख असेल तर ! उगीच का माओने प्रोफेसर्स लोकांना वर्षातून दोन महिने खेडेगावी हाकलले होते ?

स्वातंत्र्योत्तर काळात अद्ययावत पद्धतीने शेती केली तर शेतीचे उत्पादन तिपटीने वाढते. पंजाबपासून राजस्थानच्या रेगीस्थानाचा अनुभव ताजा आहे. केरळमध्ये तर पावसाचे कोण वैपुल्य ! तरीही साम्यवादी अमलात शेतीचे उत्पादन का वाढत नाही बरे ?

पहिले कारण, केरळचा नगरकॉईल हा Rice Bowl १९५७ सालापासून पुनर्रचनेमुळे मद्रास प्रांतात गेला. सध्या या विभागात भातशेतीची एका वर्षातून तीन-तीन पिके काढतात ! कन्याकुमारीस जाताना बस या विभागातून जाते तेव्हा भाताची हिरवी-हिरवीगार शेते पाहून तब्बेत खूष होते ! या भाताच्या ऐश्वर्यावर कामराज येथून परवा हमखास निवडून आले, हे सांगणे नलगे.

दुसरे कारण, वाढते मजुरीचे दर. नवीन पद्धतीने शेती केल्यास एकदम खूप संख्येने मजूर लागतात. याचा अर्थ एका वेळी खूप मोठी मजुरी द्यावी लागते.

खताचा खर्च, पाण्याचा खर्च व बियाणांचा खर्च यांतच शेतकऱ्यांचा पैसा संपून जातो. तो एकदम एका वेळी एवढी मजुरी कोठून देऊ शकणार ? मोठा जमीनदार असला तर त्यास सारे शक्य होईल. पण कम्युनिस्ट राजवटीत जमीनदारी ? कसे शक्य आहे ? एक वेळ पीक नाही आले तरी चालेल पण जमीनदारी ? मार्क्स म्हणतो, जमीनदार म्हणजे कुळाचे रक्तशोषण करणारा प्राणी. आज मार्क्स भारतात आला व त्याने सरकार, मजूर जनतेचे रक्तशोषण कसे करीत आहेत हे पाहिले तर तो खचित निराळे 'दास कॅपिटॉल' लिहील !!

तिसरे कारण लहान लहान शेते. आजच्या युगात ट्रॅक्टर्सच्या साहाय्याने हजारो एकर जमीन नांगरून एकाच वेळेस लागवडीखाली आणली तर ते पीक अत्यंत फायदेशीर ठरते. अशी सुरुवात झाली अमेरिकेतील प्रेअरी विभागात. त्यांचे रेकॉर्ड आमच्या लुधिआनातील शिखांनी गेल्या वर्षी मोडले. पण हे केरळमध्ये कसे शक्य आहे ? मला भीती वाटते पुढील दोन पिढ्यांनंतर जमिनी चौरस इंचात मापल्या जातील ! या बाबतीत इंग्लंड–अमेरिकेची पद्धत वाखाणण्यासारखी आहे. शेतीची जमीन राज्याप्रमाणे फक्त पहिल्या म्हणजे थोरल्या मुलाकडेच जायची ! केरळचा शेतकरी अत्यंत कष्टाळू आहे. पीक येणार असेल तर पर्वतावर पाणी हातांनी वर चढविण्याची त्याची तयारी आहे. पण जमिनीवर लोकसंख्येचा असा काही दाब आहे की छोटया छोटया जमिनीत बरकत येणे मुष्किल आहे.

अर्थशास्त्रात Poverty in the midst of plenty म्हणतात, तसला प्रकार केरळात आज दिसून येतो. वाईट वाटते हा देखावा पाहून. देवाने सारे सारे दिले आहे या प्रांतास. पण स्थैर्य नाही, शांति नाही व म्हणून आर्थिक वाढ नाही. तेथील शेतकऱ्यांनी मला सांगितले, "आमच्यावर इन्कम् टॅक्स् मोरारजीभाईंनी लावला तर आम्ही पार मरून जाऊ !" आज 'कसेल त्याची शेती' हा नियम आहे. त्यामुळे साऱ्या बुद्दू अडाणी व आळशी लोकांच्या हाती जमिनींचे छोटे छोटे तुकडे गेले आहेत. या लोकांपासून वसुली कशी करायची हा मोठा प्रश्न आहे सरकारसमोर ! शेतकरी कामगार यांचे हे साम्यवादी सरकार रक्षक पडले. त्यामुळे धड बोलताही येत नाही या आळशी लोकांविरुद्ध. आपलेच दात आणि आपलीच जीभ. कांय बोलणार आणि बोलून उपयोग काय ? म्हणून या सरकारांत नुसत्या आपापसात मारामाऱ्या आहेत ! बरे, ही पुढारी मंडळी तरी निष्कलंक आहेत का ? कोठून असतील ? कलंक मिटविण्यासाठी तर बऱ्याच जणांनी कम्युनिस्ट पक्ष पत्करला आहे ! दुसऱ्या बायकोस official recognition मिळावे म्हणून इस्लाम धर्म कवटाळतात ना, त्याप्रमाणे.

हे या गुंडाचे आपापसातील झगडणे कुठवर चालणार ? पक्षीय वा राष्ट्रीय हित कोणी बघणार काय ? इथ वेळ कोणाला आहे अशा फालतू गोष्टींकडे लक्ष द्यायला ? केरळमधील आठ पक्षांच्या कडबोळ्याचा एकत्र संसार हा किती दिवस

असाच चालणार ? त्यांच्या सरकारची लाचलुचपत कधी तरी कमी होईल काय ? केरळात, डोळे, कान उघडे ठेवून हिंडले की, वरील प्रश्नांची उत्तरे एका मिनिटात मिळतील. दारिद्रय, ईर्षा व स्वार्थ या रोगांनी किडलेल्या केरळचे राजकीय जीवन हे असेच सडत राहणार. कसली कपाळाची आली आहे क्रांती ? क्रांतीसाठी पेटलेली मने पाहिजे असतात. येथे पेटलेली मने आहेत, पण ती स्वार्थाने, ईर्षेने पेटलेली आहेत आणि जनता मूक, थंड व आळशी होत चालली आहे. वॉशिंग्टन आयर्वीनने पूर्वी म्हणून ठेवले होते. "Much paper and much poverty may co–exist."

रशिया व चीनला हे दिसत आहे. सडत असलेल्या भागाची दुर्गंधी सर्वत्रच सुटते. सोविएट वा चिनी नाकापर्यंत ती का जाऊ नये ? म्हणून ही साम्यवादी राष्ट्रे जपून जपून केरळच्या साम्यवाद्यांना मदत करतात. सद्गृहस्थ ओळखींच्या व प्रेमाच्या परस्त्रीस भाऊबीज म्हणून वर्षाकाठी थोडी रक्कम देतो ना, त्या थाटात. नाहीतर अमेरिकेने वेस्ट बर्लिन जशी युरोपमध्ये शोकेस बनविली, तशी लाल साम्यवादी शोकेस भारतात व आफ्रो–आशियात या साम्यवादी देशांना बनवायला कोणची हरकत होती, हा प्रश्न मी पुन्हा पुन्हा केरळच्या बऱ्याच मंत्र्यांना व विरोधी पुढाऱ्यांना विचारला. पण त्यांच्याजवळ त्या प्रश्नाचे उत्तर नव्हते.

मला सर्वांत आनंद झाला ते एका नव्या विचाराच्या जन्माच्या हर्षाने. अनेक कम्युनिस्ट व्यक्तींनी त्यांची "जळजळ" प्रच्छन्न शब्दांत मजजवळ व्यक्त केली. "डॉक्टरसाहेब, जगातील साम्यवादी राष्ट्रे चोर आहेत. जो तो आपापला स्वार्थ बघतो. भारताने आता आपला 'स्वतंत्र' भारतीय साम्यवाद जन्मास घातला पाहिजे. त्यास भारतीय अध्यात्माचा टच असला पाहिजे. आमची खात्री आहे, जगास आमच्या मागे यावे लागेल. आमचे पुढारीपण पत्करावे लागेल."

माझ्या मनात आले," महात्माजीदेखील स्वतःस कम्युनिस्ट म्हणवून घेत असत. सुभाषबाबूंनी आपल्या आत्मचरित्रात अगदी हा स्वतंत्र भारतीय समाजवादाचा विचार पंचवीस तीस वर्षांपूर्वी मांडून ठेवला आहे. पण लाचलुचपत, स्वार्थ व ईर्षा यांनी ज्यांची मने पीडलेली आहेत त्यांना हा नवीन विचार जगास देण्यासाठी आवश्यक ती शक्ती, आवश्यक तो आत्मविश्वास या जन्मी मिळेल काय, प्राप्त होईल काय ! समजा ती शक्ती, तो समय प्राप्त झाला तर – ? आपण "क्रांती" "क्रांती" म्हणत आहोत ती हीच वैचारिक क्रांती भविष्यात असू शकेल काय ?"

■■

# पुरंदऱ्यांची नौबत


ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे २

७ जून १९६९ 

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचाय

७ ते १२ जून १९६९

**मेष** : तुमच्या कर्तृत्वाला आणि निर्धाराला आव्हान देणारी ग्रहरचना निर्माण झाली आहे; आणि असे प्रसंगच तुमच्या कर्तृत्वाला उधाण आणू शकतात. गेल्या काही दिवसांत तुम्हांला खूप परिश्रम करावे लागले, पण अपयश चुकूनही पदरी घेतले नाही.

या महिन्यात तुम्हांला अधिक अनुकूल ग्रहस्थिती निर्माण होत आहे. आता सहसा माघार घेण्याचा प्रसंग उद्‌भवणार नाही. या आठवड्यात अनेक कामे आपणांस हातावेगळी करावी लागणार आहेत. तुमची धावपळ–धडपड चुकणार नाहीच, पण यश पूर्वीपेक्षाही चांगले पदरी पाडून घेता येईल. यांत्रिक, विद्युत क्षेत्रांतील व्यक्तींना हा एक विशेष प्रगतीचा काल जाणवेल.

दि. १० ते १२ सारी कामे गती घेऊ लागतील.

**वृषभ** : मानसिक ताण थोडाफार कमी झाल्यासारखा वाटेल, पण संपूर्ण स्वास्थ्याची अपेक्षा करता येईल, अशी स्थिती अजूनही आलेली नाही. अशा काली संयम आणि शांतता यांची नितांत गरज भासेल. भावनेच्या भरात काही बोलून जाल आणि पश्चात्ताप करण्याचा प्रसंग मात्र ओढवेल. प्रत्येक गोष्टीत जुळते मिळते घेतलेत तरच निभाव लागेल.

नोकरीधंद्याचे तंत्र थोडेफार बदलणे भाग पडेल. इष्टमित्रांच्या सहकार्याची फारशी आशा करावयास जागा नाही. सारी कामे जातीनेच करावी लागतील.

नव्या व्यवसायधंद्याचे विचार आपणांस या वेळी तरी मानवणार नाहीत. मंगल-कार्याचे काही काल पुढे ढकला.

दि. ८ ते ११ थोडाफार अनुकूल काल.

**मिथुन** : सूर्य-मंगळ प्रतियोग होऊन गेला आणि तुम्हांला थोडेफार स्वास्थ्याचे दिवस दिसू लागले. संपूर्ण अनिष्टता ओसरली नसली तरी, ह्या आठवड्यापासून

सर्वत्र थोडेफार आशादायक वातावरण दिसू लागेल.
सांपत्तिक अडचणी पूर्वीप्रमाणेच जाणवू लागतील, नोकरीधंद्यातील पेचप्रसंग थोड्याफार प्रमाणांत दूर झाले तरी मानसिक स्वास्थ्य लाभण्यासारखा काल अजूनही आलेला नाही.
या आठवड्यात तरी साहसाची कामे करावयास उद्युक्त होऊ नका. व्यापारधंद्यात प्रत्येक पाऊल जपून टाकावे लागेल.
दि. १० ते १३ एवढाच काल थोडेफार यश पदरी टाकू शकेल.
**कर्क :** सध्या आपणांस अनेक ग्रहांचे पाठबळ आहे. सूर्य-बुधांचे अधिक साहाय्य लाभणार असल्यामुळे सध्याचे दिवस आपणांस प्रत्येक गोष्टीत अपेक्षेबाहेर यश देणारे जाणवतील.
कित्येक दिवसांनंतर इतका चांगला काल आपल्या वाट्यास येत असल्यामुळे या वेळी आपण प्रगतीकडे झेप घेऊ लागाल. संपत्ती, प्रतिष्ठा, यश अमाप लाभेल. सहजासहजी काही कराल आणि ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल, असाच क्षणोक्षणी प्रत्यय येऊ लागेल.
सामाजिक क्षेत्रात तर कधी मिळाला नसेल एवढा मान या काली लाभेल. सांपत्तिक लाभ अपेक्षेबाहेर उठवाल.
दि. ११ ते १३ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा.
**सिंह :** मंगळ चतुर्थात असेपर्यंत अवास्तव कल्पना मनात बाळगून वाटेल ते करण्यास प्रवृत्त होऊ नये. गेल्या पंधरवड्यापेक्षा हे दिवस काहीसे अनुकूल जाणवले तरी सर्वच गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडतील, अशी अपेक्षा बाळगण्यात मुळीच अर्थ नाही. शुक्र भाग्यात आणि सूर्य दशमात यांचा आपल्या व्यवसायधंद्यावर इष्ट परिणाम–थोडाफार अनुकूल परिणामही–घडेलही. पण तुमची धावपळ–धडपडकाही चुकणार नाही.
रेंगाळलेली कामे हातावेगळी करण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. अनेकांचे साहाय्य घेतल्याशिवाय स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण होऊन बसेल. मार्गी बुधाचा काहीसा उपयोग होईलच.
दि. १० ते १२ या काली आपले प्रयत्न यशस्वी ठरावेत.
**कन्या :** सूर्य-बुधे भाग्यात आणि बुधाची मार्गी स्थिती, यांचा आपल्या व्यवसायधंद्यावर फार चांगला परिणाम घडेल. अनेक अशक्य वाटणारी कामे याच काली यशस्वी करून दाखवली जातील. बढती-बदलीचे योग कोणत्याही क्षणी दृष्टिक्षेपात येतील. मंगलकार्याचा अवघड प्रश्न सहजासहजी सुटेल. कित्येक दिवसांच्या स्थगित कार्यांना याच वेळी वेग येऊ लागेल.
तुमच्या अलीकडच्या काळात इतका चांगला काल आपण क्वचितच अनुभवला असेल. शास्त्रीय संशोधनात भर घातली जाईल. साहित्याच्या प्रांतात प्रतिष्ठेचे

स्थान लाभेल. तुमच्यापैकी कित्येकांना परदेशास जाण्याचीही संधी लाभेल.
दि. १० ते १३ या कालाची नोंद घ्या.

**तूळ :** मंगळ धनस्थानी तर गुरू व्ययस्थानी. या दोन्हीही ग्रहांनी तुमची कोंडी केलेली दिसते. निर्धाराच्या खड्गानेच ही कोंडी आपण फोडू शकाल. कोणत्याही बिकट परिस्थितीतून चातुर्याने मार्ग कसा काढावा, याचे उपजत ज्ञान तुमच्यापाशी असल्याने अशा वेळीही तुमचे सहसा कुठे नडेल असे मला वाटत नाही.

सांपत्तिक बाबतीत फार मोठ्या अपेक्षा बाळगण्यासारखा हा काळच नाही. सामान्य जीवन जगण्याला हे दिवस तसे ठीक आहेत. भव्य दिव्य असे काही घडेल असे मात्र नाही.
जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती सतत ठेवलीत तरच काही गोष्टींत यश लाभावे.
दि. १० ते १२ या वेळी आपले प्रयत्न अगदीच वाया जाणार नाहीत.

**वृश्चिक :** बुध–गुरू त्रिकोण आणि बुधाची मार्गी अवस्था एवढा एक योगही आता तुमच्या साऱ्या अपेक्षा सफल करण्यास समर्थ ठरेल. मंगळाची अनिष्टताओसरल्या सारखी जाणवेल. सहसा कोणत्याही अडथळ्यांनी तुमचा प्रगतीचा मार्ग अडवला जाणार नाही.
यांत्रिक–विद्युत क्षेत्रांतील तंत्रज्ञांना या कालाइतका सर्वांगाने विकासाचा काल यापूर्वी क्वचितच आला असेल.
याच काळात आपले राजकीय महत्त्वही वाढीस लागेल. उद्योगधंद्याचे तंत्र सुधारेल, इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य लाभेल आणि सांपत्तिक लाभही फार मोठ्या प्रमाणावर पदरी पडू शकेल.
दि. १०–१२–१३ सर्वोत्तम यश देणारा काळ.

**धनू :** व्ययस्थ मंगळ म्हणजे असह्य डोकेदुखीच. केवळ पैशासंबंधीच नव्हे तर सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अपयश, अपेक्षाभंग असे अनेक प्रकार निर्माण करणे हेच या मंगळाचे कार्य. गुप्त शत्रुत्व आणि अनारोग्य यांचीही त्यात भर. तात्पर्य, हे दिवस फारसे चांगले व समाधानाचे दिसत नाहीत. दशमांतील गुरूही ही अनिष्टता फारशी रोखू शकेल असे दिसत नाही.

स्थावराचा प्रश्न चिघळेल. नोकरीधंद्यातील कटकटी वाढू लागतील. इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य लाभेनासे होईल. थोरांची नाराजी कोणत्याही क्षणी निर्माण होईल.
दि. ८–१०–१२ अल्पसे यश पदरी पडू शकेल.

**मकर :** नैराश्य, उदासीनता, माघार, अपयश हे सारे शब्द आपण आता विसरू शकता. आता तुम्हांला कोणतीही गोष्ट अशक्य, अवघड वाटू शकणार नाही. पूर्वी शिकस्तीच्या प्रयत्नांनीही जी गोष्ट होऊ शकली नाही ती आता सहजासहजी घडून येऊ लागेल.

नोकरीधंद्यातील अनेक अपेक्षा अपेक्षेबाहेर सफल होतील. उद्योगधंद्यात प्रचंड उत्क्रांती घडून येईल, मंगल कार्याचे निश्चित ठरेल, सांपत्तिक प्रश्न तर कोणत्याही क्षणी सुटू शकेल. साहित्य–संशोधन क्षेत्रात तर तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल. आगामी १५–२० दिवसांत अनंत प्रगत घटना भराभर घडून येतील.

दि. ८–१०–१२ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** आजवर ग्रहस्थिती फारशी चांगली नव्हती. आता अनुकूलतेकडे ती वाटचाल करू लागल्याचा प्रत्यय येऊ लागेल. याच आठवड्यात स्थानांतर, स्थित्यंतर घडेल. नोकरीधंद्याचे स्वरूप अधिक आकर्षक दिसू लागेल.

राहण्याच्या जागेची विवंचना मिटेल, उद्योगधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरू लागल्याचा प्रत्यय यायला लागेल.

कला–क्रीडा क्षेत्रात नवा विक्रम करून दाखवाल, चित्रपटव्यवसायातील व्यक्तींना नव्या साहसास उद्युक्त करण्यास या वेळचे ग्रह प्रवृत्त करतील.

सांपत्तिक योग सर्वसामान्यपणे ठीक असले तरी सहसा तुमचे कुठेच नडणार नाही. अनेकांच्या सहकार्यामुळे नवा व्यवसाय धंदा उभारण्यात यशस्वी ठराल.


दि. १० ते १२ अनुकूल दिवस.

**मीन :** बुध–सूर्य पराक्रमात एवढाही योग अपेक्षित यश लाभण्यास पुरेसाआहे. आता तुम्हांला कोणत्याही गोष्टीबद्दल माघार घेण्याचा प्रसंगच उद्भवणार नाही. आगामी महिन्याभरात तरी आपण आपली साडेसाती विसरू शकता.

स्थावराची विवंचना मिटेल. वाहनाची काळजी नाहीशी होईल. या आठवड्यात दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवाल. नवे व्यवसायधंदे संपूर्णपणे यशस्वी ठरतील. प्रकृती, पैसा, प्रतिष्ठा या बाबतींत चुकूनही काळजी करण्यासारखा प्रसंग उद्भवणार नाही.

ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे. थोडाफार प्रयत्न केलात तरी आपल्या अपेक्षा सफल होतील.

दि. ११–१२–१३ अपेक्षासाफल्याचा काळ. ■■


पत्रें लवकर पेटींत टाका
कामाच्या शेवटच्या तासांत, संध्याकाळीच जास्ती पत्रे टपाल पेटयांत टाकली जातात. ही टपाल-कचेऱ्यां-पुढील एक मोठी समस्या आहे. त्यामुळ डाकेची गर्दी होते व विलंबही संभवतो.
टपालात पत्रे लवकर टाकल्याने तीं त्याच दिवशीच्या डाकेने रवाना होण्याची खात्री असते. तसे केल्याने इष्ट स्थळी ती उशीर न होता पोहचतात.
पत्रे आताच टाका, संध्याकाळपर्यंत कशाला थांबता ?
भारतीय टपाल व तार खाते
davp 69/19

लेनिनला नकोसा झालेला स्टॅलिन

स्टॅलिनच्या मूर्तिभंजनात धन्यता मानणारा ख्रुश्चेव्ह

ख्रुश्चेव्हला अज्ञातवासात ढकलणारे ब्रेझनेव्ह–कोसिजीन

प्रत्येकजण आपणच लेनिनचे सच्चे वारसदार आहोत

असे उच्चरवाने सांगत होते, सांगत आहेत.

लेनिनपंथाला लाभलेली ही दांडगी लोकप्रियता

लेनिनच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचाच पुरावा आहे.

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या

जीवनकार्याचे समग्र दर्शन

## व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५